# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 28) 1st April 2003 ( No : 2


# A G E N D A

**of the General Body Meeting of**
**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**
**to be held at 12.00 noon on *SUNDAY, the 27th April, 2003 at* Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani .**

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association to be held at 12.00 noon on Sunday, the 27th April, 2003 at Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani is as follows :-

## ITEM NO. 330 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

TO CONFIRM the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 29th September, 2002 at Shri. Pandharinath Arts & Commerce College, Narkhed

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 81 to 86 of 2002 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 29th September, 2002 at Shri. Pandharinath Arts & Commerce College, Narkhed, vide No.CIM/13 Dated 16th December, 2002 published on page 81 of 2002 NUTA Bulletin. No correction was received..*

## ITEM NO. 331 :
## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

TO CONSIDER AND TO APPROVE the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2002.

***Notes*** *: (i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.2 of 2003) and is to be placed for the approval of the General Body. (ii) The Copy of the Annual Report is circulated in this NUTA Bulletin on page 25 &26 (iii) Prof. E.H.Kathale, Secretary will present the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 332 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

TO APPROVE the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2003.

***Notes*** *: (i) Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, will present the Budget on behalf of the Executive Committee. (ii) The copy of the Budget is circulated on page No.18 of 2002 NUTA Bulletin.*

## ITEM NO.333 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

TO CONSIDER AND TO APPROVE the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2003 namely :-

**"C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas" Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2003"**

***Note*** *: (i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association.'' (ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 4 of 2003) which is now placed before the General Body for its approval. (iii) Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee, will move the resolution.*

## विषय क्रमांक. ३३४ :
## *प्रा.बी.टी.देशमुख यांच्या अभिनंदनाचा ठराव*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. एकनाथ कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

"महाराष्ट्र विधानपरिषदेचे ज्येष्ठ सदस्य व नुटाचे अध्यक्ष मा. आ. प्रा. बी. टी.देशमुख यांची सुप्रतिष्ठीत अशा कै.माधवराव लिमये स्मृतिप्रित्यर्थ

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

**MEETING NOTICE : 2**

**Date : 30. 03. 2003**

From
**Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 Noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **Dr. E.H.Kathale**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***

**at 12.00 Noon on, Sunday, the *27th April, 2003***

**at Lokmanya Tilak Mahavidyalaya, Wani .**

दिल्या जाणाऱ्या पहिल्याच "कार्यक्षम आमदार" पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल ही सभा प्रा.बी.टी.देशमुख यांचे मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे. नाशिक येथील १६२ वर्षाची परंपरा लाभलेल्या सार्वजनिक वाचनालयातर्फे सुरू करण्यात आलेल्या या पुरस्काराचे प्रा.बी.टी.देशमुख हे पहिले मानकरी ठरले आहेत. स्वातंत्र्य संग्राम सैनिक व माजी आमदार कै. माधवराव लिमये यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सुरू करण्यात आलेल्या या पुरस्काराचे स्वरुप ५०,०००/- रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे असून, ८ फेब्रुवारी, २००३ रोजी नाशिक येथे एका विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व समाजवादी नेते श्री. दत्ता ताम्हणे यांच्या हस्ते प्रा.बी.टी.देशमुख यांना हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

आ.प्रा.बी.टी.देशमुख यांची विधीमंडळातील कारकीर्द अतिशय अभिमानास्पद असून सलग चार वेळा महाराष्ट्र विधानपरिषदेवर ते निवडून आले आहेत. सांसदीय आयुधांचा वापर करून शिक्षक व पदविधरांच्या प्रश्नांसोबतच लोकांच्या प्रश्नांची विधीमंडळाच्या सभागृहात सोडवणूक करण्याची प्रा.बी.टी.देशमुख यांची शैली व हातोटी वाखाणण्यासारखी आहे. एक जागृत, अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ख्याती असून विधीमंडळातील त्यांच्या अभ्यासू कार्यशैलीचा गौरव म्हणून १९९६ साली राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेचा पहिला "**उत्कृष्ट संसदपटू**" हा पुरस्कारही प्रा.बी.टी.देशमुख यांना प्राप्त झाला होता, ही आम्हा सर्वांसाठी गौरवाची बाब आहे.

प्रादेशिक असमतोलाबाबतचा प्रा.बी.टी.देशमुख यांचा अभ्यास व आकलन अतिशय सखोल असून या क्षेत्रातील त्यांची कामगिरी स्पृहणिय आहे. जलसिंचन अनुशेषावर त्यांची अभ्यासपूर्ण प्रकाशने प्रसिद्ध झालेली आहेत. शिक्षक, प्राध्यापक, शेतकरी, शेतमजूर, पदवीधर, पेन्शनर, विद्यार्थी अशा सर्वच क्षेत्रातील लोकांचे प्रश्न अतिशय तळमळीने प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडलेले आहे व अनेक प्रश्नांच्या बाबतीत न्याय मिळवून देण्यात ते यशस्वी झाले आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख यांच्या विधी मंडळाच्या कामकाजातील सहभागाबद्दल बोलतांना "चातुर्य शहाणे झाले व प्रमेय रुचीला आले" असे गौरवोद्‌गार खुद्द सभागृहामध्ये मा. जयंतराव टिळकांसारख्या सभापतींनी काढले होते. शिक्षकांचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी प्रा.बी.टी.देशमुख यांचे प्रयत्न अतिशय मोलाचे ठरले आहेत. सर्व शिक्षकांचे ते आदराचे स्थान आहेत. शिक्षकी व्यवसायातून महाराष्ट्राच्या विधी मंडळात गेलेले प्रा.बी.टी.देशमुख हे सर्व शिक्षकांसाठी एक मानबिंदू आहेत. प्रा.बी.टी.देशमुख यांना प्राप्त झालेला हा पुरस्कार संपूर्ण शिक्षक वर्ग आणि शिक्षण क्षेत्रासाठी एक गौरवाची बाब आहे. अशा या कर्तृत्ववान, अभ्यासू व शिस्तप्रिय नेत्याच्या अभिनंदनाचा ठराव ही सभा सर्वानुमते पारित करित आहे."

### विषय क्रमांक. ३३७ :
### *संघटनेचे लहानसे ग्रंथालय उभारण्याच्या कामास सुरुवात करणे*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. डॉ. एकनाथ कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

*"संघटनेच्या अध्यक्षांनी आपल्या दिनांक ८ मार्च २००३ च्या पत्रान्वये* (क्रमांक स/ग्रं/१) केलेली विनंती स्विकारतांना या सभागृहाला आनंद होत आहे. एका बाजूला संघटनात्मक कामकाजाशी संबंधित असलेली ग्रंथसंपदा व दुसऱ्या बाजूला प्रादेशिक असमतोलाशी संबंधित असलेली ग्रंथसंपदा यांचा समावेश असलेले लहानसे ग्रंथालय उभारण्याच्या कामाला आपण सुरुवात करावी असा निर्णय घेण्यात येत आहे.

उपरोक्त पत्रान्वये उपलब्ध झालेल्या ४० हजार रुपये निधीच्या जोडीला संघटनेतर्फे ६० हजार रुपयाची जोड देवून केवळ याच कामासाठी असा १ लक्ष रुपयाचा दिर्घ मुदती ठेवीत गुंतविलेला कायम राखीव निधी (corpus)) संघटनेच्या अर्थबळामध्ये उभा करावा. अशा कायम राखीव निधीतून येणाऱ्या उत्पन्नातून दरवर्षी किमान ८ ते १० हजार रुपयाची पुस्तके या लहानशा ग्रंथालयामध्ये जोडता येतील. याशिवाय त्या त्या वर्षीच्या वार्षिक अर्थबळातून जादा तरतुद करणेची गरज आहे असे वाटल्यास त्या त्या वर्षीच्या अंदाजपत्रकात तरतुद करणेबाबत कार्यकारी मंडळाला निर्णय घेता येईल."

*(संघटनेच्या अध्यक्षांचे दिनांक ८ मार्च २००३ चे पत्र क्रमांक स/ग्रं/१ या* बुलेटीनच्या पृष्ठ २३ व २४ वर प्रसृत करण्यात आले आहे.)

## BUDGET FOR THE FINANCIAL YEAR - 2003-2004

OFFICIAL ACCOUNTING YEAR OF THE TRUST : 2003-2004 (AS PER SCHEDULE VII-A OF THE B.P.T.A. 1950)

***Name of the Trust*** **: NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.**

Regn. of the Trust : B.P.T.A. Regn. No. F-1594 & Soc. Regn. Act. Regn. No. MAH-15-73(NGP)

| ESTIMATED RECEIPTS | RS. P. | ESTIMATED DISBURSEMENTS | Rs. P |
|---|---|---|---|
| **I. OPENING BALANCE :** | | **A) NON-RECURRING :** | |
| i) Cash in hand ... ... | ... .. | i) Major Repairs or rebuilding of the assets etc. ... | .. . .. |
| ii) Cash in Bank ... ... | 15,000 00 | ii) Net purchase of immovable property ... | ... .. |
| **II. ESTIMATED RECEIPTS :** | | **B) RECURRING :** | |
| **(A) NON RECURRING** | | i) Rents, rates taxes etc. ... | 4,000.00 |
| i) Ordinary Donations to be received for specific earmarked objects (permanent subscription to NUTA Bulletin) ... ... | ... .. | ii) Administrative Expenses ... | ... .. |
| | | a) Stationery, Typing , Cyclostyling & Printing . ... | 2,25,000.00 |
| | | b) Travelling Expenses . ... | 50,000.00 |
| ii) Ordinary Donations... | ... .. | c) Postage and Telephone. ... | 10,000.00 |
| | | d) Misc. expenses ... | 4,000.00 |
| **(B) RECURRING :** | | e) Bank commission ... | 400.00 |
| i ) Rent etc. on immovable property | ... .. | f) Legal Expenses ... | 1,000.00 |
| ii) Interest on Fixed Deposits | 2,00,000 00 | g) Audit fees ... | 1,500.00 |
| iii) Dividend shares etc... | 1,00,000 00 | h) Affiliation fees ... | |
| iv) Income from Agri. land ... | ... .. | i) MFUCTO ... | 4,000.00 |
| v) Other revenue Receipt ... | ... .. | ii) AIFUCTO ... | 7,000.00 |
| vi) Legal Aid Fund ... | ... .. | iii) Contribution to public trust\ admn. Fund ... | |
| **III. REALISATION FROM DISPOSAL OF ASSETS :** | ... .. | vi) Books Library | 8,000.00 |
| | | iii) Payment of Salaries ... | 2,400.00 |
| | | iv) Transfer of Depreciation Fund | |
| **IV EXCESS OF EXPENDITURE OVER INCOME :** ... | 12,300 .00 | v) Special & Current repairs of building Furniture etc ... | 10,000.00 |
| | ... .. | vi) Excess of income over expenditure ... | |
| **TOTAL Rs.** | **3,27,300 00** | **TOTAL Rs.** | **3,27,300 00** |

**NOTE** : Estimated enrolment of members during the year is expected to be 10. On this account the Association will receive an estimated amount of Rs. 40,010/- However this amount cannot be included in the estimated receipts because this amount is to be invested in fixed deposit receipts or any other Govt. Securities as per Artcle III of the Constitution . - Sd. **S. A. Tiwari**, Treasurer.NUTA

**विषय क्रमांक. ३३६ :**
***डॉ. जनार्दन वाघमारे समितीचा अहवाल***

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. अनिल ढगे हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

**(अ)** राज्यशासनाने नियुक्त केलेल्या शिक्षणविषयक अभ्यासगटाने राज्याच्या शिक्षण विषयक सद्यस्थितीचे परिशिलन करून अहवाल तयार करण्यात आल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर २००१ मध्ये या अभ्यासगटाचा अहवाल प्रकाशित केला. त्यात शिक्षणाच्या गुणात्मक विकासासाठी सुचविलेल्या महत्वपूर्ण उपाय योजनांमध्ये **काही अत्यंत नकारात्मक आणि विषारी अशा शिफारशी दिसून येतात. या संदर्भात ........**

**(ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाविषयीच्या पुढील शिफारशी पाहण्यासारख्या आहेत :-**

१. गळतीबाबत व शिक्षणाच्या दर्जाबाबत संबंधित शिक्षकास जबाबदार धरणे आवश्यक आहे. यशापशाची जबाबदारी व उत्तरदायित्व शिक्षकावर टाकल्याशिवाय शिक्षणाचा गुणात्मक विकास साधणे शक्य होणार नाही.

२. नियमित वेतन श्रेणीतील नियुक्त्यामुळे शिक्षकांमध्ये शैथिल्य येते.

३. भविष्यात वेतन आणि कार्यक्षमता (पे ॲण्ड परफॉर्मन्स) एकमेकांशी निगडीत करण्यात यावेत.

४. वैश्विकीकरणाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेतील मूल्य निर्धारणाचे कार्य,मागणी व पुरवठ्याच्या माध्यमातून "बाजार" हा घटक करणार आहे. सेवाक्षेत्रातही या घटकांच्या आधारावरच मुल्यनिर्धारण होणार आहे. ही भूमिका विचारात घेवून कायम विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षकांचे वेतन शासनाने निश्चित करण्याची आवश्यकता नाही, असे अभ्यासगटास वाटते.

५. वेतनविषयक खर्चात कपात करण्याच्या संदर्भात शासनाने सविस्तर धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे.

६. कायम विनाअनुदान तत्वावर शाळा उघडण्यासाठी ज्या व्यक्ती/संस्था पुढे येतील, त्यांना शासन स्तरावरुन परवानगी (Permission) देण्याची आवश्यकता असू नये. संबंधित संस्थांना नोंदणी करणे मात्र अनिवार्य करण्यात यावे.

७. सरसकट सर्वांना मोफत शिक्षण असे धोरण अवलंबून शिक्षणाचे उच्चतम ध्येय साध्य होतेच असेही म्हणता येणार नाही.

८. खाजगी शाळांमधून शिकणाऱ्या मुलामुलींच्या संदर्भात पालकांचे उत्पन्नगट निश्चित करुन, फी आकारणीचे धोरण अवलंबिण्याची जोरदार शिफारस अभ्यासगट करीत आहे.

९. शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे समतोल वाटप होण्याच्या दृष्टीने महानगरपालिका क्षेत्रात माध्यमिक शिक्षणावरील खर्चाचाही भार राज्य शासनाने टप्प्याटप्प्याने ७५ टक्क्यांपर्यंत कमी करावा व 'अ' व 'ब' प्रवर्गाच्या नगरपालिकांमध्ये ८० टक्के पर्यंतच अनुदान देण्यात यावे. ग्रामीण भागाच्याबाबतही हे अनुदान जास्तीत जास्त ८० टक्क्यांपर्यंत असावे.

१०, आतापर्यंत भरण्यात आलेल्या पदांवरील निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागी यापुढे कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

११. प्रशिक्षणातून व्यक्तिमत्व विकास घडतो. काळाच्या प्रवाहात स्वतःची उपयोगिता टिकवावयाची असेल तर, विविध स्वरुपाचे प्रशिक्षण प्रत्येक व्यक्तीने आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रशिक्षणावरील खर्च त्या व्यक्तींकडूनच उभारल्यास ते अधिक संयुक्तिक व फलप्रदायी ठरेल.

१२. कोणत्याही शाळेस हे अनुदान जास्तीत जास्त शाळा अनुदानावर आल्यापासून पहिली १० वर्षे देण्यात यावे. त्यापुढे वेतनेतर अनुदान देण्यात येवू नये. शाळेच्या विकासासाठी आवश्यक निधी संबंधित शाळांनी उभा करावा.

१३. कारखान्यात ज्याप्रमाणे मुख्य उत्पन्नाबरोबर दुय्यम उत्पन्न (by product) घेऊन कारखान्याचा नफा वाढविण्यात येतो. त्याचपद्धतीने शिक्षण क्षेत्रातही आर्थिक संसाधने उभी करता येतील.

१४. अनेक जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचा गुणात्मक दर्जा खालावलेला दिसतो. त्या शाळा प्रायोगिक तत्वावर खाजगी व्यवस्थापनाकडे देण्याबाबतीत विचार व्हावा.

**(क) उच्च शिक्षणाविषयीच्या या अभ्यास गटाच्या पुढील काही शिफारशी पाहण्यासारख्या आहेत. :-**

१. उच्च शिक्षणासाठी अधिक अनुदान उपलब्ध करुन देणे यापुढे शक्य होणार नाही असे दिसते.

२. वेतनेतर अनुदानाऐवजी संबंधित महाविद्यालयांना प्रत्येक विद्यार्थ्यामागे विकास निधी (Maintenance Grant) घेण्याची परवानगी देणे कालसुसंगत ठरणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या स्तरावर विविध योजना राबवून निधी उभा करणे आवश्यक आहे.

३. विषयांचे एकत्रिकरण करण्यात यावे. त्यातून मोठी आर्थिक बचत साध्य होईल.

४. काही महाविद्यालये सोडली तर विस्ताराचे कामही महाविद्यालयाकडून दुर्लक्षित होत आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या विस्ताराचा समाजाच्या विकासाशी संबंध जोडून अधिव्याख्यात्यांना संशोधन व विस्ताराचे काम करणे बंधनकारक करावे. हा त्यांच्या कामाचाच भाग मानण्यात यावा.

५. विस्तार कार्याचा प्रत्येक अधिव्याख्यात्याच्या नेमणूकपत्रामध्ये त्याचा कामाचा भाग म्हणून स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाप्रमाणे प्रत्येक अधिव्याख्यात्याने आठवड्यातून ४० तास अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यासाठी महाविद्यालयाच्या परिसरात उपस्थित राहणे आवश्यक आहे. या आठवड्याच्या ४० तासात त्यांनी केलेल्या कामाची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

७. त्यासाठी विद्यापीठाने भरारी पथके/गुणवत्ता नियंत्रण पथके निर्माण करावित व या पथकानी महाविद्यालयास अचानक भेटी देवून विद्यार्थ्यांची/शिक्षकांची उपस्थिती तपासावी. उपस्थिती कमी आढळल्यास संबंधित महाविद्यालयावर नोटीस बजावून अनुदान कपातीची कार्यवाही करावी.

८, विद्यापीठात चालणारे संशोधन केवळ संशोधनाच्या पातळीवर न राहता त्याला व्यावहारिक परिमाण देण्यात यावे. उद्योगधंद्यांना आवश्यक असणारे संशोधन विद्यापीठांनी करुन समुपदेशाच्या माध्यमातून (कन्सलटंसी) निधी उभारुन आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे.

९. कमवा व शिका या योजनेंतर्गत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांऐवजी महाविद्यालयात गरजू मुलांची नियुक्ती करावी.

**(ड) प्राथमिक शिक्षणाविषयीच्या या अभ्यास गटाच्या पुढील काही शिफारशी पाहण्यासारख्या आहेत :-**

(१) शिक्षकांच्या कामाचे मूल्यमापन (Assesment) विद्यार्थी, मुख्याध्यापक, व्यवस्थापनाबरोबरच इतर बाह्य माध्यमातून होण्याची आवश्यकता आहे.

(२) शाळेच्या परिक्षेत्रातील प्रत्येक घरातील मुले शाळेत येतात किंवा नाही, याचे सर्वेक्षण शिक्षकांनी करुन त्यांना शाळेत आणण्याचे कार्य करावे. हा त्यांच्या विस्तारीत सेवेचाच भाग आहे.

**(ई)** अत्यंत अशैक्षणिक अशा या उपरोक्त शिफारशींचा व यासारख्या या अहवालातील अनेक शिफारशींचा हे सभागृह तिव्र निषेध करीत आहे. केंद्रिय किंवा राज्य स्तरावर नेमण्यात आलेल्या कोणत्याही आयोगाचा या शिफारशींना आधार नाही. आज पर्यंत राष्ट्रीय पातळीवर स्थिर झालेल्या शैक्षणिक विचार

**RULES FOR PROPOSING AMENDMENTS**
**( Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin )**

1. Any proposal before the meeting may be amended

(a) by leaving out a word or words or

(b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or

(c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall :

(a) not constitute a direct negative to the original resolution :

(b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

मंथनाला पूर्णपणे लाथेखाली तुडविणाऱ्या या शिफारशींना इतर सर्व स्तरावरील शिक्षक संघटनांशी सहकार्य करुन सर्व शक्तीनिशी विरोध करण्याचा व त्या शिफारशी हाणून पाडण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक. ३३७ :**
***वेतन अनुदानात कपात***

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. सुभाष गवई हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

शाळा महाविद्यालयाची वेतनेत्तर अनुदाने विलंबाने देणे, अनेक वर्षाची थकबाकी अदा करण्यात टाळाटाळ करणे, या बाबींनी शैक्षणिक क्षेत्राला ग्रासून टाकले असतांना काटकसरीच्या उपाययोजना म्हणून टप्प्याटप्प्याने सन २००५ पासून अनुदानीत प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, ही बाब उघड होते न होते, तोच सकल राजकोषीय व महसूली तुट कमी करण्यासाठी पाच प्रमुख शहरातील महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतन अनुदानांत २० टक्के कपात करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती बाहेर आली आहे.

१९९४-९५ मध्ये १५ ते २० हजार कोटी रुपयाचे कर्ज असलेल्या महाराष्ट्र शासनाने, सन १९९९ पर्यंत ३० ते ४० हजार कोटी रुपये कर्ज उभे केले व आता २००३ मध्ये हा कर्जाचा बोजा ८० ते ९० हजार कोटी रुपयाच्या वर गेल्याचे सांगितले जात आहे.

राजकीय खिरापत वाटण्याच्या प्रयोजनासाठी कोट्यावधी रुपयाची उधळण करणाऱ्या शासनाने शिक्षणासारख्या क्षेत्रात वेतन अनुदानात कपात करावी या कृत्याचा तिव्र निषेध करण्यात येत असून राज्य शासनाच्या या शिक्षणविरोधी धोरणाला सर्व शक्तीनिशी विरोध करण्याचा व हे प्रतिगामी धोरण हाणून पाडण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक. ३३८ :**
***पाचव्या वेतन आयोगाच्या थकबाकी वाटपात झालेला भेदभाव***

कार्यकारी मंडळाच्यावतीने प्रा. अनिल सोमवंशी हे पुढील प्रस्ताव मांडतील:-

"वेतन थकबाकीपोटी महाराष्ट्र शासनाला केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळालेले असतांना सुद्धा अमरावती विद्यापीठाच्या विविध विभागात कार्यरत निम्म्याहून जास्त शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाची थकबाकी अजून पर्यंत मिळालेली नाही. सदर अन्याय पत्राद्वारे संचालक, उच्च शिक्षण यांना वारंवार लक्षात आणून देऊनही त्याची त्यांनी दखलही न घेणे, पत्राचे उत्तर सुद्धा न देणे हे दुर्दैवाचे आहे. अमरावती विद्यापीठांतर्गत संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षकांची थकबाकी पूर्णपणे अदा करण्यात आलेली असतांना शिक्षण संचालकांच्या कार्यालयातर्फे अमरावती विद्यापीठातील शिक्षकांच्या बाबतीत होत असलेल्या या भेदभावपूर्ण वागणूकीचा तिव्र निषेध करण्यात येत आहे."

# 'फिडर केडर'वरील निर्णयाने विपरितरित्या प्रभावित झालेल्या शिक्षकांची सभा

महाविद्यालयीन प्राध्यापकांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीप्रमाणे वेतनश्रेणी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. No.NGC-1296/(4619)UNI/4 ११ डिसेंबर १९९९ नुसार लागू करण्यात आल्यात. त्यानुसार नवीन वेतनश्रेणीचा लाभ १.१.१९९६ पासून तसेच वरिष्ठ व निवडश्रेणीच्या स्थाननिश्चितीचा (करिअर ॲडव्हान्समेंट) लाभ २७.७.९८ पासून लागू करण्यात आला. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीप्रमाणे वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी मध्ये स्थाननिश्चिती करतांना एम्.फिल्. वा पी.एच.डी. शैक्षणिक गुणवत्ता नसलेल्या प्राध्यापकांना अनुक्रमे ६ अधिक ५ वर्षे, एम्.फिल् गुणवत्ता धारकांना ५ अधिक ५ वर्षे व पी.एच.डी. गुणवत्ता धारकांना ४ अधिक ५ वर्षे सेवाकालावधी असावा असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

परंतु ज्या प्राध्यापकांची स्थाननिश्चिती चवथ्या वेतन आयोगाप्रमाणे वरिष्ठ श्रेणीमध्ये झालेली आहे. व पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे २७.७.१९९८ नंतर निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करावयाची आहे, परंतु ज्यांची वरिष्ठ श्रेणीमध्ये पाच वर्षे सेवा झालेली नसेल त्यांना त्याचा संपूर्ण सेवाकाळ विचारात घेवून पुढील स्थाननिश्चिती देण्यात यावी अशी तरतुद करण्यात आलेली आहे. ती खालील प्रमाणे :- "If number of years required in a feeder cadre are less than those stipulated in this notification, thus entailing hardship to those who have completed more than the total number of years in their entire service for eligibility in the cadre, may be placed in the next higher cadre after adjusting the total number of years. This situation is likely to arise as, in the earlier scheme, the number of years required in a feeder cadre were much more than those envisaged under this notification" असे असतांनासुद्धा उच्च शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सहसंचालक, उच्च शिक्षण हे वरील तरतुदींचा विचार न करता संबंधित प्राध्यापकांनी वरिष्ठ श्रेणीमध्ये पाच वर्षे पूर्ण केल्यानंतरच निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करीत आहेत. त्यामुळे असंख्य प्राध्यापकांवर अन्याय होत असून शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन होत आहे.

**वरील अन्यायाविरुद्ध निश्चित उपाययोजनांचा विचार करण्यासाठी उपरोक्त स्वरुपाच्या निर्णयाने विपरितरित्या प्रभावित झालेल्या प्राध्यापकांची सभा खाली दिलेल्या स्थळी, वेळी व दिवशी बोलाविण्यात आलेली आहे.**

सभेचा दिवस व दिनांक :- शनिवार, दिनांक ३१ मे, २००३

वेळ :- दुपारी ३.०० वाजता

स्थळ :- शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती

नागपूर व अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील अशा सर्व प्राध्यापकांनी या सभेला उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

आपला स्नेहांकित
(डॉ.इ.एच. कठाळे)

**सूचना** :- निर्णयामुळे विपरितरित्या प्रभावित झालेल्या प्राध्यापकांनी खालील कागदपत्रांच्या छायाप्रती सोबत आणाव्यात. १) प्राध्यापकांविषयी माहिती :- नांव, महाविद्यालयाचे नांव, विषय, नियुक्तीची तारीख, शैक्षणिक गुणवत्ता, वरिष्ठ श्रेणी मिळाल्याची तारीख, सेवेचा कालावधी. २) स्थान निश्चिती समितीने शिफारस केलेली स्थाननिश्चितीची माहिती. ३) मा. सहसंचालकांनी केलेली स्थाननिश्चितीची प्रत.

**विषय क्रमांक. ३३९ :**
***जिल्हा बैठकांचा कार्यक्रम***

डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील शिक्षणविषयक अभ्यास गटाच्या अहवालावर, वेतन अनुदाने व वेतनेत्तर अनुदाने बंद करण्याच्या शासनाच्या धोरणावर, इतर संघटनात्मक बाबीवरील चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा बैठकांच्या कार्यक्रमाची नोंद घेणे.

कोणत्या जिल्ह्याची बैठक कोणत्या शहरी, कोणत्या दिवशी, ठिकाणी व वेळी होईल हे नमुद असलेला तक्ता याच बुलेटीनच्या पृष्ठ २२ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.

**विषय क्रमांक. ३४० :**
***'फिडर केडर'वरील निर्णयाने विपरितरित्या प्रभावित झालेल्या शिक्षकांची सभा***

'फिडर केडर'वरील निर्णयाने विपरितरित्या प्रभावित झालेल्या शिक्षकांच्या आयोजित करण्यात आलेल्या सभेची नोंद घेणे.

महाविद्यालयीन प्राध्यापकांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीप्रमाणे वेतनश्रेणी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. No.NGC-1296/(4619)UNI/4 ११ डिसेंबर १९९९ नुसार लागू करण्यात आल्यात. त्यानुसार नवीन वेतनश्रेणीचा लाभ १.१.१९९६ पासून तसेच वरिष्ठ व निवडश्रेणीच्या स्थाननिश्चितीचा (करिअर ॲडव्हान्समेंट) लाभ २७.७.९८ पासून लागू करण्यात आला. पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसीप्रमाणे वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी मध्ये स्थाननिश्चिती करतांना एम्.फिल्. वा पी.एच.डी. शैक्षणिक गुणवत्ता नसलेल्या प्राध्यापकांना अनुक्रमे ६ अधिक ५ वर्षे, एम्.फिल् गुणवत्ता धारकांना ५ अधिक ५ वर्षे व पी.एच.डी. गुणवत्ता धारकांना ४ अधिक ५ वर्षे सेवाकालावधी असावा असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

परंतु ज्या प्राध्यापकांची स्थाननिश्चिती चवथ्या वेतन आयोगाप्रमाणे वरिष्ठ श्रेणीमध्ये झालेली आहे. व पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे २७.७.१९९८ नंतर निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करावयाची आहे, परंतु ज्यांची वरिष्ठ श्रेणीमध्ये पाच वर्षे सेवा झालेली नसेल त्यांना त्याचा संपूर्ण सेवाकाळ विचारात घेवून पुढील स्थाननिश्चिती देण्यात यावी अशी तरतुद करण्यात आलेली आहे. ती खालील प्रमाणे :- "If number of years required in a feeder cadre are less than those stipulated in this notification, thus entailing hardship to those who have completed more than the total number of years in their entire service for eligibility in the cadre, may be placed in the next higher cadre after adjusting the total number of years. This situation is likely to arise as, in the earlier scheme, the number of years required in a feeder cadre were much more than those envisaged under this notification" असे असतांनासुद्धा उच्च शिक्षण संचालकांच्या आदेशावरुन सहसंचालक, उच्च शिक्षण हे वरील तरतुदींचा विचार न करता संबंधित प्राध्यापकांनी वरिष्ठ श्रेणीमध्ये पाच वर्षे पूर्ण केल्यानंतरच निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करीत आहेत. त्यामुळे असंख्य प्राध्यापकांवर अन्याय होत असून शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन होत आहे.

वरील अन्यायाविरुद्ध निश्चित उपाययोजनांचा विचार करण्यासाठी उपरोक्त स्वरुपाच्या निर्णयाने विपरितरित्या प्रभावित झालेल्या प्राध्यापकांची सभा आयोजित करण्यात आली असून या सभेची सुचना या बुलेटीनच्या पृष्ठ २० वर प्रसृत करण्यात आली आहे.

## ITEM NO. 341 :
***CAREER ADVANCEMENT SCHEME***

Prof. A.S.Rahate will move the following resolution :-

"The general body meeting of NUTA hereby Resolves to request Amravati University and Nagpur University to take the issue of Non-Implementation of Career Advancement Scheme in their serious concern & set up a mechanism to force the Non-Aided private Colleges of Engg. and Tech. for immediate & proper implementation of CAS and further requests to initiate stringent action against those colleges who avoid the proper implementation. This mechanism be evolved & implemented within a month, from the date of adoption of this resolution."

**विषय क्रमांक. ३४२ :**
***अभ्यास मंडळाच्या निवडणूकीत मतदान***

डॉ. निलकण्ठ ब. भुसारी हे पुढील प्रस्ताव मांडतील :-

"अभ्यास मंडळाच्या निवडणूकीत मतदान करणेचा अधिकार, कायम स्वरूपी किमान १० वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेल्या महाविद्यालयीन सर्व शिक्षकांना मिळावा."

## ITEM NO. 343 :
***IMPLEMENTATION OF THE FEEDER CADRE BENIFIT***

Dr. Bashisth Choubey will move the following resolution :-

"At this juncture NUTA is unanimously requested either to pressurize the government and the concerned authorities for the implementation of the feeder cadre which has already been approved by the Government of Maharashtra and the UGC by their letters No. विपआस -1098/-144/(4564)/विशि-4 dated 1 March, 1999 and letter No. NGC-1298/(4619)/UNI-4 dated 11 December,

1999 and the UGC clarification letter No. F-3-1/ 2000 (PS) dated 4 April, 2002 or to challenge the matter in the court of Law so that the concerned teachers can get justice."

******

## CHANGE OF ADDRESS
## ACKNOWLEDGEMENT NO.19

Requests for changes in address for the purpose of mailing and correspondence, have been reaching us frequently from the members'. So to record these changes in Life Member's Register systematically, and to follow up these changes effectively, steps have been taken by The Treasurer.

2. We hereby acknowledge the receipt of the requests for change in address from members whose Life Membership Numbers and changed addresses are included in Twentyfourth List of Changed Addresses of Life Members of NUTA. Details of the said list are as follows:-

TWENTYFOURTH LIST:- Serialized Nos : of the changed Addresses from 1074 to 1136 (Notified in 2003 Ex. File on Pages 10 to 12) The Life membership Numbers of those requesting members are as follows :-

166, 181, 233, 356, 389, 389, 389, 400, 0762, 879, 1049, 1242, 1284, 1550, 1630, 1633, 1657, 1815, 1822, 2100, 2194, 2354, 2719, 2819, 2821, 2906, 2942, 2957, 2973, 3031, 3300, 3440, 3467, 3483, 3522, 3528, 3582, 3589, 3670, 3708, 3753, 3774, 3779, 3878, 3894, 3944, 3944, 3973, 3973, 4066, 4081, 4109, 4118, 4146, 4158, 4310, 4359, 4462, 4536, 4540, 4551, 4645, 4646 = Total 63

3. No separate and individual acknowledgement shall be issued in this regard.

4. Hereafter requests for change in address shall be sent only to me. (Prof. S.A. Tiwari, Treasurer NUTA, 42, Shankar Nagar, Amravati-444 606.)

5. Members may please note that such requests sent to any other office bearer of NUTA Executive may not be speedily and effectively followed up. We hope that the members shall continue to cooperate with us to serve them better.

6. List No. 23 containing address changes from 972 to 1073 was published as Acknowledgement No. 18 on page No.15 of 2002 NUTA Bulletin.

30.03.2003 S.A. Tiwari
Treasurer NUTA

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

# जिल्हा बैठकांचे आयोजन : सूचना

(१) शिक्षण विषयक डॉ. जनार्दन वाघमारे अभ्यासगटाच्या अहवालाचा शिक्षण क्षेत्रावर होणाऱ्या विपरित परिणामांची चर्चा करण्यासाठी नुटाच्या कार्यकारी मंडळाने जिल्हा बैठकांचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. कोणत्या जिल्ह्याची बैठक कोणत्या शहरी, कोणत्या दिवशी, ठिकाणी व वेळी होईल हे खालील तक्त्यामध्ये नमुद केलेले आहे.

(२) या जिल्हा बैठकांमध्ये मुख्यत्वेकरून पुढील कामकाज होईल. :- १. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील शिक्षणविषयक अभ्यास गटाच्या अहवालावर तपशिलवार चर्चा. २. वेतन अनुदाने व वेतनेत्तर अनुदाने बंद करण्याच्या शासनाच्या धोरणावर तपशीलवार चर्चा. ३. इतर संघटनात्मक बाबीवरील चर्चा.

(३) या बैठकीला नुटाचे अध्यक्ष व संघटनेचे अन्य पदाधिकारी उपस्थित राहतील. त्या त्या जिल्ह्यातील सर्व प्राध्यापकांनी या जिल्हा बैठकांना उपस्थित रहावे अशी त्यांना विनंती आहे.

आपला विनित,
**प्रा.एकनाथ कठाळे**, सचिव 'नुटा'

**तक्ता**

# जिल्हानिहाय बैठकांचा कार्यक्रम

| अ.नं. व जिल्ह्याचे नाव | बैठकीचा दिवस व दिनांक | बैठकीची वेळ | बैठकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. बुलढाणा | बुधवार, १४.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा. |
| २. अमरावती | गुरुवार, १५.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | भारतीय महाविद्यालय, अमरावती. |
| ३. वर्धा | शुक्रवार, १६.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. |
| ४. नागपूर | शनिवार, १७.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | बॅ.वानखेडे शिक्षण महाविद्यालय, नागपूर. |
| ५. अकोला | बुधवार, २१.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला. |
| ६. यवतमाळ | गुरुवार, २२.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ. |
| ७. वाशिम | शुक्रवार, २३.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | राजस्थान आर्यन कॉलेज, वाशिम. |
| ८. भंडारा व गोंदिया | शनिवार, २४.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा. |
| ९. चंद्रपूर व गडचिरोली | रविवार, २५.०५.२००३ | सकाळी ११.३० वा. | एस.पी. कॉलेज, चंद्रपूर. |

1. The office bearers of the Local Units, Taluka Units and the District Units of NUTA are requested to actively function at their respective levels to make the arrangements of these meetings.

2. The NUTA Bulletin is despatched and the members shall receive the same. However the office bearers of the Local Units shall circulate special notices inviting all the teachers for the meetings.

प्रेषक :
**प्रा.बी.टी.देशमुख,** अध्यक्ष 'नुटा'
विधानपरिषद सदस्य,
३, सुबोध कॉलनी,
विदर्भ महाविद्यालयाजवळ, अमरावती.

८ मार्च २००३
क्रमांक स/ग्रं/१

प्रति,
**सचिव,**
नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ (नुटा)

विषय :- संघटनेचे आपले स्वतःचे लहानसे ग्रंथालय उभारण्याचे काम हाती घेणेविषयी.

प्रिय डॉ. कठाळे,
स.न.वि.वि.

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाचे आपले स्वतःचे लहानसे ग्रंथालय उभारण्याच्या कामाला संघटनेने सुरुवात करावी, यासाठी मुद्दाम हे पत्र आपणास लिहीत आहे. गेल्या अनेक वर्षाच्या संघटनेतील कामाच्या अनुभवावरून आपणा सर्वांनाच ही गोष्ट अतिशय जवळून ठावूक झालेली आहे की, शिक्षक संघटनेच्या एकंदर कामकाजात योग्य वेळी योग्य पुस्तकातील, अहवालातील, शासन निर्णयातील योग्य संदर्भ हाताशी असला तर प्रश्नोक्त बाबीवर होत असलेल्या किंवा होवू घातलेल्या निर्णयाचा इतिहासच बदलून जातो.

२. याची अनेक उदाहरणे नमूद करता येतील. माझ्या अनुभवात असलेले याबाबतचे महत्वपूर्ण उदाहरण हे निवडश्रेणीबाबतचे आहे. दिनांक १३ जानेवारी १९८९ रोजी सह्याद्रि अतिथी गृहात राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांशी चर्चा चालू असतांना महाराष्ट प्राध्यापक महासंघासमोर राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने एक प्रस्ताव ठेवला होता. त्या प्रस्तावाच्या परिच्छेद २ मध्ये असे नमूद होते की,

"In the proposed pay revision in the scale of Lecturer, there are three grades i.e. Lecturers, Lecturers (Senior Scale) and Lecturers (Selection Grade). The Govt. of India has proposed promotion from one grade to another after a period of eight years in each grade subject to the fulfilment of conditions like publication of research papers, attendance in in-service training programmes and satisfactory performance record. It is proposed to accept the three grades and for promotion purposes from one grade to another, the ratio of 50 : 25 : 25 should be fixed. Promotion would not be automatic but will be subject to availability of vacancies in higher grades." *(१९८९ नुटा बुलेटीनचे पृष्ठ ४ पहा)*

शासनाचा हा प्रस्ताव काही तासांच्या आतच संघटनेने फेटाळून लावला. अंतिमतः मान्य झालेल्या मतैक्य पत्रातून पुढील व्यवस्था अस्तित्वात आली.:-

"13. Every Lecturer, Library and Physical Education staff in the senior scale will be eligible for promotion, to the post of Lecturer (Selection Grade) Reader/Deputy Librarian/Deputy Director of Physical Education in the scale of pay of Rs. 3700-5700 if he she has :-

(a) Completed 8 years of service in the senior scale provided that the requirement of 8 years will be relaxed if the total service of the Lecturer is not less than 16 years." (१९८९ चे नुटा बुलेटीन पृष्ठ २० पहा)

हा जो बदल घडवून आणता आला याचे फार मोठे श्रेय बाहेर संघटनेच्या नेतृत्त्वाखाली आंदोलन जोरात सुरू होते या गोष्टीला आहे हे तर खरेच पण त्याचबरोबर आर.सी.मेहरोत्रा समितीचा मूळ अहवाल, केंद्र शासनाच्या १७ जून १९८७ च्या व २२ जुलै १९८८ च्या आदेशाच्या मूळ प्रतीमधून आवश्यक ते संदर्भ बिनचुकपणे काढून शासनासमोर काही मिनिटांतच आम्हाला ठेवता आले या गोष्टीला सुद्धा आहे हेही खरे. संदर्भ सुलभतेची ही व्यवस्था त्यावेळी संस्थात्मक पातळीवर स्थापीत झालेली नव्हती तर ती वैयक्तिक पातळीवर होती. फार काळ अशी स्थिती चालू रहाणे योग्य आहे असे मला वाटत नाही.

३) नेटसेट ग्रस्त शिक्षकांच्या बाबतीत १९८९ चा शासननिर्णय निघाल्या पासून तर आजपावेतो शासनाने वेळोवेळी स्वीकारलेले व वेळोवेळी बदलविलेले धोरण हे कोणत्याही मूळ आधारावर बांधलेले नव्हते आणि त्यामुळेच शासनाला त्या कामी अपयश येत गेले व एक एक पाऊल मागे घ्यावे लागले. "३१ मार्च १९९४ पर्यंत पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीची मुदत फारच कमी होत असल्यामुळे ती वाढवून देण्यात यावी" अशी सर्वत्र मागणी होत असतांना "हा मुदत वाढवून देण्याचा प्रश्नच नाही. जे सेवेत भरती झालेले आहेत त्यांना ही पात्रता लागू नाही. 'उमेदवारा'साठी असलेल्या अटी 'शिक्षकां'साठी लागू करता येणार नाहीत" अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली व शेवटपर्यंत त्या भूमिकेमध्ये बदल करण्याची वेळ संघटनेवर आली नाही याचे कारण ही भूमिका "मूळ अहवाल, केंद्र शासनाचे मूळ शासननिर्णय" यांच्या बिनचुक अभ्यासावर बांधलेली होती. याबाबतची संदर्भ सुलभता ही आमची संस्थात्मक व्यवस्था नव्हती, तर त्याबाबतच्या व्यवस्था ह्या व्यक्तिगत पातळीवर उभ्या करण्यात आलेल्या होत्या. अशी कितीतरी उदाहरणे याबाबत नमूद करता येतील.

४) "संदर्भ सुलभतेची संघटनात्मक व्यवस्था" याबाबीचे शिक्षक चळवळीमध्ये जेवढे महत्त्व आहे तेवढेच अनुशेष निर्मूलनाच्या चळवळीमध्ये सुद्धा आहे हे मान्यच करावे लागेल. "१९९६-९७ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र" दिनांक ३० जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर झाले. त्या विवरण पत्राच्या पृष्ठ ६३ वर पाटबंधारे विभागाची एक "लहानशी" मागणी (बाब क्रमांक ८४) नमूद आहे. या मागणीच्या स्पष्टीकरणात्मक शासकीय निवेदनामध्ये पाटबंधारे मंत्र्यांनी असे नमूद केले आहे की :-

"कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकरण निवाड्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. कृष्णा नदीचे पाणी उपयोगात आणणे या मुख्य उद्दिष्टासह या प्रदेशाच्या पाटबंधारे प्रकल्पाचे (मोठे, मध्यम, लहान व जलविद्युत) प्रचालन व प्रवर्तन त्याचप्रमाणे लाभक्षेत्रविकास प्राधिकरण व पूर नियंत्रण यासारखे इतर संलग्न कार्यक्रम महामंडळामार्फत हाती घेण्यात येतील. उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत खात्री करून घेण्यासाठी रु. ७,१०० कोटीच्या वित्तीय सहाय्याचा लाभ करून घेणे महामंडळाच्या दृष्टीने आवश्यक असेल. यापैकी राज्य शासन, पाच वर्षाच्या कालावधीमध्ये रु. ३,५०० कोटी एवढ्या रकमेची तरतूद करील. भाग भांडवली अंशदान म्हणून राज्य शासनाने ही रक्कम मंजूर करण्याचे ठरविण्यात आले आहे. महामंडळाच्या उर्वरित वित्तीय गरजा खुल्या बाजारातील कर्ज उभारून भागविण्यात येतील. आस्थापना, कामकाज, परतफेड दायीत्व आणि इतर अनुषंगिक खर्च यामुळे होणारा महामंडळाचा एकूण खर्च राज्य शासन करील"

"महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले पाणी सन २००० हजार पर्यंत वापरले नाही तर त्या पाण्यावरील महाराष्ट्राचा हक्क गमावला जाईल" असा धडधडीत असत्य प्रचार मोठ्या गाजावाजाने गेली काही वर्षं महाराष्ट्रात चालू होता व मोठ्या प्रमाणात निधी पळविणे हाच या असत्य प्रचारामागील हेतू होता. हे उघड आहे. प्रत्यक्ष लवादाच्या निवाड्याची प्रत ज्यावेळी आम्ही मिळविली त्यावेळी मला आश्चर्य वाटले. कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत लवादाने जो निर्णय दिलेला आहे त्याच्या सातव्या प्रकरणात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की :-"Failure of any state to make use of any portion of the water allocated to it during any water year shall not constitute forfeiture or abandonment of its share of water in any subsequent water year, nor shall it increase the share of any other state in any subsequent water year even if such state may have used such water" -clause VIII (B) of chapter 7. इतकेच नव्हे तर इ.स.२००० नंतर पुनर्विलोकनाची तरतूदसुद्धा

या निर्णयात पुढील शब्दात नमूद आहे :-"At any time after the 31st May 2000 this order may be reviewed or revised by a competent authority or Tribunal" - clause XIV (A) of chapter 7. गेली अनेक वर्षे सभागृहामध्ये मी हे सातत्याने सांगत आहे. पुरवणी मागणी ही ७१०० कोटी रुपयाची मंजुरीला टाकण्यात आली होती. उर्वरित महाराष्ट्रामध्ये १९९६-९७ पासून तर २००१-२००२ पर्यंत प्रत्यक्ष खर्च १०८२६.९१ कोटी रुपये करण्यात आला व यातून हाती घेतलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तेथे स.न. २००१ मध्ये १८४१६ कोटी रुपयाची गरज आहे असे अधिकृत आकडेवारीत नमूद आहे. नंतरच्या काळात ही रक्कम आणखी वाढणार हे उघड आहे.

५) संघटनेमध्ये काम करीत असतांना अशा प्रकारच्या संदर्भ ग्रंथाचा संग्रह असलेल्या संघटनेच्या लहानशा ग्रंथालयाच्या बांधणीला आपण सुरुवात करावी असे मला नेहमीच वाटत राहीले आहे. २१ डिसेंबर १९८० रोजी झालेल्या नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीसमोर (विषय क्रमांक ३२) मी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने याबाबतचा तपशीलवार प्रस्ताव मांडला होता. तदनुषंगिक बारीक सारिक नियम त्या प्रस्तावामध्ये समाविष्ट होते. त्या नियमात "Book" means a book added to the library as per rule 5 and shall include a paperbook or a compilation or binding of papers or journals." अशी तरतुद नमुद होती व " Association shall have a small library of it's own. This library shall consist of the following books :- (a) Books purchased for adding to the Library. (b) Books, presented to the Association and such presents being accepted by the executive Committee for adding it to the Library. (c) Bindings of volumes of such journals as may be subscribed by the Association. (d) Such other bindings of journals as may be presented to the Association and such presents being accepted by the executive Committee for adding it to the library. (e) Any other paperbook accepted by the President or by the Executive Committee for adding it to the library." अशी एकूण व्यवस्था नमुद करण्यात आली होती. (सन १९८० च्या ईएक्स फाईलच्या पृष्ठ क्रमांक ७९ वर विषय पत्रिका, पृष्ठ ७२ ते ७४ वर नियमांचा मसुदा व पृष्ठ ९९ वर या विषय क्रमांक ३२ चे कार्यवृत्त समाविष्ट आहे.) कार्यवृत्ताचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, त्या दिवशीच्या सभेत या विषयाला कार्यकारी मंडळाची संम्मती मिळू शकली नाही.

६) सन १९८० मध्ये याबाबतचे प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर सन १९९७ मध्ये मी याबाबत पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहिला. १४ सप्टेंबर १९९७ रोजी झालेल्या नुटाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीसमोर (विषय क्रमांक ४६) मी संघटनेचा अध्यक्ष या नात्याने याबाबतचा तपशीलवार प्रस्ताव पुन्हा जसाच्या तसा मांडला होता. (सन १९९७ च्या ईएक्स फाईलच्या पृष्ठ क्रमांक ८४ वर विषय पत्रिका, पृष्ठ ७९ वर नियमांचा मसुदा व पृष्ठ ९७ वर या विषय क्रमांक ४६ चे कार्यवृत्त समाविष्ट आहे.) कार्यवृत्ताचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, त्या दिवशीच्या सभेत या विषयाला कार्यकारी मंडळाची संम्मती मिळू शकली नाही.

७) महाराष्ट् राज्याच्या निर्मितीनंतर निर्माण झालेल्या व सतत वाढत असलेल्या प्रादेशिक असमतोलाचा सर्वात जास्त फटका विदर्भाला बसलेला आहे ही गोष्ट आता सर्व विदित आहे. असमतोलाच्या जाणीवा-जागृतीच्या कामामध्ये १९९० पासून पुढच्या १२ वर्षाच्या काळामध्ये आपल्या संघटनेने केलेले काम निश्चितच स्पृहणीय आहे. या संदर्भात एकामागून एक अर्धा डझनाच्या वर प्रकाशित झालेल्या नुटा बुलेटीनच्या विशेषांकामुळे पांघरुणाखाली झाकून ठेवलेल्या अनुशेषाच्या प्रश्नाचा मोठा बभ्रा झाला. या कामाचे नेतृत्त्व करण्याची संधी मला मिळाली हे खरे असले तरी त्यामागे संघटनेने उभी केलेली मेहनत ही निश्चितच लक्षणीय आहे. एकतर अशा कामासाठीचे तज्ञ मनुष्यबळ इतर कोणत्याही संघटनेपेक्षा आपल्या सारख्या संघटनेजवळ तुलनेने मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते व दुसरे असे की, "शिक्षकांच्या संघटना फक्त आपल्या पुरतेच पहातात" या अपप्रचाराला कोणतेही भाषण न करता प्रत्यक्ष कृतीने सडेतोड उत्तर दिले जाते. या दोन गोष्टी लक्षात घेता प्रादेशिक असमतोलाच्या प्रश्नाबाबत वैचारिक व तात्विक चिंतन तसेच त्याबाबतच्या जाणीवा-जागृतीच्या या कामातील संघटनेचा सहभाग असाच पुढेही सुरू रहावा असे मला वाटते.

८) एका बाजूला संघटनात्मक कामकाजाशी संबंधित असलेली ग्रंथसंपदा व दुसऱ्या बाजूला प्रादेशिक असमतोलाशी संबंधित असलेली ग्रंथसंपदा यांचा समावेश असलेले लहानसे ग्रंथालय उभारण्याच्या कामाला आपण सुरुवात करावी असे मला मनापासून वाटते. १६२ वर्षाची परंपरा असलेल्या नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाने सुरू केलेल्या कै. माधवराव लिमये स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या पहिल्या "कार्यक्षम आमदार" पुरस्कारासाठी यावर्षी माझी निवड झालेली आहे, याची आपणास माहिती आहेच. ५० हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून दिनांक ८ फेब्रुवारी २००३ रोजी नाशिक येथे समारंभपूर्वक हा पुरस्कार मला प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थ मिळालेल्या रोख रकमेपैकी चाळीस हजार (रुपये ४०,०००) रुपयाचा निधी उपरोक्त कामासाठी संघटनेच्या सुपूर्द करण्याचा निर्णय मी घेतलेला आहे. दरवर्षी उपरोक्त ग्रंथालयामध्ये किमान काही पूस्तके दाखल करण्यासाठी या निधीचा संघटनेला वापर करता येईल. नुटाच्या कार्यकारी मंडळाने माझ्या विनंतीचा स्वीकार करावा अशी विनंती आहे.

आपला स्नेहांकित,
(बी.टी.देशमुख)
अध्यक्ष 'नुटा' व विधानपरिषद सदस्य

**सहपत्र :** सोबत स्टेट बँक ऑफ इंडियाचा दिनांक ०८.०३.२००३ रोजीचा रेखांकित धनादेश क्रमांक ४८४९४९ जोडलेला आहे.

******

# ठोकळेबाज उत्तरे

(१)

**आय.टी.आय. निदेशक व इतर कर्मचाऱ्यांना माध्यमिक शिक्षकांप्रमाणे सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करणेबाबत.** : महाराष्ट्र विधान परिषद : तिसरे अधिवेशन २००२ : दिनांक १६.१२.२००२ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक २७३२५ वर झालेल्या अनुपुरक चर्चेत मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी पुढील माहिती दिली.

"त्या संदर्भात कॅबिनेट नोट तयार करण्यात आली होती आणि २३ तारखेच्या बैठकीमध्ये वित्त मंत्र्यांच्या सोबत चर्चा करण्यात आली होती. .त्यानंतर आम्ही दिनांक २९.५.२००२ च्या कॅबिनेटसमोर गेलो होतो. या पूर्वीच्या काळात सुध्दा कॅबिनेटसमोर जाण्याचा आम्ही प्रयत्न केला होता परंतु एकंदर राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कॅबिनेटचे मुख्य सचिवांना असे आदेश आहेत की, अधिक वित्तीय भार ज्यामुळे वाढेल असे प्रस्ताव शक्यतो कॅबिनेटसमोर आणू नयेत." (पृष्ठ - के -१)

(२)

व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाकडील शिक्षक व निदेशकांना सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळण्याची मागणी याबाबत **सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे, गजेंद्र ऐनापुरे** यांनी दिलेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून निवेदन.दिनांक २०.१२.२००२ रोजी नियम ९३ च्या सूचनेवर शासनाने केलेल्या लेखी निवेदनांतील पुढील मजकुर पहा :-

"वेतनाबाबतच्या कोणत्याही प्रकारच्या मागण्यांवर यापुढे मंत्रिमंडळ राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे निर्णय घेवू शकणार नाही व त्यामुळे अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येवू नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे." (पृष्ठ - आर-२)

# SECRETARY'S REPORT ON THE WORKING OF THE ASSOCIATION FOR THE YEAR ENDING ON 31st DECEMBER, 2002.

*Prepared by the Executive Committee of NUTA under article (VI) (b) (ii) of the Constitution of NUTA and presented by Secretary on behalf of the NUTA Executive.*

Dear friends,

(1) It gives me great pleasure to accord you all a cordial welcome on behalf of the Executive Committee of NUTA and my own behalf. It is indeed a proud privilege for me to place before this august body a brief account of our activities and achievements during the year 2002.

(2) Right from its inception, NUTA has been committed to the cause of the welfare of the teachers' community. In keeping with this commitment, the organisation took up several issues concerning teachers during the period of this report.

(3) During the current year, the organisation achieved success in getting a few of our demands fulfilled by the Government. Some important Govt. Resolutions were issued during the reporting year, They include G.R. dated 11th January, 2002 and 15th May, 2002 on increase in D.A. to the government employees and others and G.R.dated 18th May, 2002 on release of D.A. to retired employees.

(4) Though the G.R.dated 18.12.1999 was issued regarding Vth pay-Scales to the teachers working in private Engineering Colleges, the managements were reluctant to implement the same. As a matter of fact, it was Prof. B.T.Deshmukh, President, NUTA and his associates in the Legislative Council with their parliamentary skills and preseverance, who were responsible for getting the relevant orders issued by the State Government. You are aware that now in Maharashtra, 107 private Unaided Engineering Colleges out of 110 have implemented the Vth Pay-Scales to their teachers.

## (5) PARTICIPATION IN ACTION PROGRAMS :

(a) The members of NUTA participated in the various action programmes in response to the call given by AIFUCTO and MFUCTO from time to time to press for the solution of pending problems of the teaching community.

(b) AIFUCTO's Goa Conference.

The 23rd Annual Academic Conference of the AIFUCTO, hosted by the University and College Teachers' Association of Goa was held from 25th to 27th October, 2002 at Panji. Goa Conference was very very successful in all respects. It adopted an important resolution on movement, (circulated on page No. 87 of 2002 NUTA Bulletin) I am glad to report to this august body that thirteen NUTA delegates attended the conference and participated actively in the deliberations. The participant delegates were :- Dr. E.H.Kathale, Prof. A.W.Dhage, Dr.R.B.Golait, Prof. M.D.Misal, Prof. D.R.Satpute, Prof. G.B.Wankar, Prof. S.S.Hajare, Prof. Y.D.Shambharkar, Prof. V.D.Ambade, Prof. P.S.Meshram, Dr. S.C.Waikar, Dr. Sadhana waikar and Prof. M.G.Lomte.

(c) Agitation against the setting up of Deptt. of Karmakand and Vedic Astrology in Nagpur University.

You are aware that NUTA submitted a memorandum to the Vice-Chancellor of Nagpur University on 13th March, 2002 with a request not to place the item regarding Setting Up of Deptt. of Karmakand and Vedic Astrology in Nagpur University on the agenda of the meeting of the Academic Council which was scheduled for 16th March, 2002. However, our request was turned down by the Vice-Chancellor. NUTA had decided to oppose this move and call was given to the teachers of Nagpur University to participate in demonstrations on the 16th March, 2002. Various like minded organizations also supported our move and participated in mass demonstrations. The demonstrations proved to be successful. I thank all my fellow teachers and like minded organizations who participated in this agitation.

(d) **Non-payment of Vth pay arrears in Nagpur Region.** You are aware that though the revised scales of Vth pay have been implemented in Maharashtra, the process of release of arrears on account of revision of pay-scales has been rather very slow.

Prof. B.T.Deshmukh, President, NUTA because of his parliamentary skills succeeded in getting the positive assurances from the Education Minister (H.E.) for making necessary funds available for the payment of remaining amount of arrears. Even after the release of funds, the process of disbursement of arrears was slow in Nagpur University area. NUTA had decided to organize demonstrations in front of Joint Director's Office on 19.09.2002 at Nagpur. Because of our united strength Dr. Sontakke, Joint Director of Nagpur region invited the leaders of NUTA for discussion. He assured that the remaining payment of Vth pay arrears would be disbursed within a week. I am happy to inform the House that the process of payment of arrears has been completed as promised by J.D.

## (6) AGITATION AGAINST VIOLATION OF STATUTE 53 BY THE VICE-CHANCELLOR OF NAGPUR UNIVERSITY :

Friends, you are all aware how the issue of statute 53 is of prime importance to the teachers working in affiliated colleges. According to statute 53, right to grant permission to such termination vests with the Executive Council. The Vice-Chancellor of Nagpur University had granted permission to the termination of teachers by violating the provisions of statute 53. On receiving information, Secretary, NUTA immediately wrote to the Vice-Chancellor on 18.07.2002, requesting him to withdraw such permission. Since, the Vice-Chancellor took no positive steps, NUTA decided to organize mass demonstrations on 19.08.2002 in front of University Office. NUTA office bearers had organized district meetings at district places of college teachers working in Nagpur University area to mobilize for the programme.

NUTA members of Nagpur University area stood firmly with the organization and decided to participate in large numbers in mass demonstrations on 19.08.2002. In the mean time, realizing the strength of the organization, the Vice-Chancellor of Nagpur University issued direction No. 22/2002 restoring the right to grant such permission with the Management Council. The Vice-Chancellor vide his communica-

tion No. Vc/724 dated 13.08.2002 informed the Secretary, NUTA regarding issuance of direction and requested to cancel the proposed agitation. NUTA office -bearers took stock of the situation and decided to cancel the agitation of 19/08/2002.

I congratulate all my teachers fellows for this victory and also thank them for exhibiting solidarity on the issue of prime importance.

**(7) ELECTION TO MFUCTO EXECUTIVE COMMITTEE :**

On 15th September, 2002 election to Executive Committee of MFUCTO was held. I am glad to inform you that the following representatives of NUTA were elected unopposed to the body. They include DR.E.H.Kathale (President), Prof. A.W.Dhage and Dr.D.U.Pochhi (Both Vice-Presidents), Prof. B.T. Deshmukh, Prof.S.A.Tiwari, Prof. A.G.Somvanshi, Dr.R.B.Golait, Prof. M.D.Misal and Prof. V.B.Dhone (Executive Committee Members). I congratulate them on your behalf on their election to this important body.

**(8) 25 YEARS' SERVICE OF NUTA BULLETIN :**

As you already know the general Body of NUTA at its meeting held on 19th September, 1999 had directed the NUTA Executive to publish special issues on important issues and themes concerning our profession during the year 2001. NUTA Executive had appealed to all its members time and again to contribute Rs. 1000/- for this purpose. Though the response to this appeal in the beginning was not very encouraging, the Executive Committee had decided to launch the venture after the receipt of a minimum response in this behalf, and I am happy to inform this august body that we have been successful in brining out as many as 13 NUTA special bulletin issues.

**(9) ELECTION TO THE LEGISLATIVE COUNCIL FROM AMRAVATI DIVISION TEACHERS' CONSTITUENCY :**

You are all aware that the Vidarbha Madhyamik Shikshak Sangh had declared the candidature of Shri.Vansantrao Dadarao Khotre from Amaravati Division teachers constituency. NUTA had already taken a policy decision about mutual understanding for the election of teachers and graduate constituency. Accordingly NUTA had decided to give support to the candidature of Shir Khotre. NUTA office-bearers from Amravati region toured and addressed the meetings of the teachers and appealed to the voters to vote in favour of Shri Khotre. Friends, I am glad to inform to the House that Shri. Vasnatrao Dadarao Khotre was elected with a thumping Majority. I congratulate Shri.V.D.Khotre on his glaring victory.

**(10) PROBLEM OF NET\SET AFFECTED TEACHERS :**

Friends, you are aware that Government of Maharashtra, has issued a G.R. dated 18th October, 2001 whereby teachers' appointed on or after 11.12.1999 were to be terminated before completion of their probation period. Some of the teachers from different Universities of Maharashtra were issued termination orders and other teachers falling in this category were in the process of issuance of termination orders as a consequence of resolution dated 18.10.2001. These teachers had filed petitions before the Mumbai High Court and benches of Mumbai High Court at Nagpur and Aurangabad and they were granted status-quo/stay. Ultimately their petitions were clubbed for final hearing by Hon'ble Mumbai High Court. You are also aware that Mumbai High Court has delivered an important judgment in respect of this bunch of petitions on 18.04.2002. According to this decision of the Mumbai High Court a time bound programme was given to submit the proposals to the UGC for contentions of relaxation by the respective Universities before 18th December, 2002. I am glad to inform you that in both the Universities proposals of these teachers were submitted within prescribed time limit. I am also pleased to inform you that the NUTA representatives elected on different bodies of Amravati and Nagpur Universities were active in framing and finalizing these proposals based on sound footing.

**(11) TASKS AHEAD :**

a) After implementation of the revised scales of pay with effect from 01.01.1996, the scheme of career advancement was required to be implemented in its real spirit. However, Joint Directors of the respective regions are creating hurdles by issuing circular inconsistent with the provision of G.R. The affected teachers will have to see that the C.A.S. is implemented in its true sense and if necessary will have to move the legal forums for compelling the Director of Higher Education to withdraw the contradictory circulars issued by Joint Directors. .

b) The discrimination caused by the Government regarding the date of implementation of fifth pay commission pay scales to the teachers of unaided engineering colleges has also not been done away with. It would be an important task for us to see that justice is done to them.

c) Ambani-Birla report along with the Waghmare Committee Report has posed a serious challenge before the field of Education in general and higher education in particular It will have to be fought tooth and nail in the years to come. The issue pertaining to the librarians and the Directors of physical education will have also to be addressed.

d) The teachers working in the affiliated social work colleges have not been paid their partial amount of arrears of Vth pay as yet. This will be another important task before the organization.

**(12) MEMBERSHIP OF NUTA:**

The NUTA membership has reached upto 4761 at the end of the year. This year the increase in membership is 79.

(a) I am glad to inform you that NUTA bulletin has completed its 27th year of its purposeful existence. This year we have circulated 92 pages of NUTA bulletin. If you go through the NUTA bulletin from first to the last page, you will find that NUTA Executive has tried to give up-to-date information to all its members about their problems and how the NUTA Executive particularly its President Prof. B.T.Deshmukh has focussed them at Maharashtra Govt. level through the Legislative Council.

(b) I am thankful to the press and their representatives both from Nagpur and Amravati areas, for wide coverage of the activities of the Association. This report shall not be complete unless I acknowledge the active cooperation and support of all the members of NUTA and also from non members i.e. University, College and Junior College Teachers in the activities of the Association and response given by them to the various calls given by NUTA from time to time.

Yours,
(Dr.E.H.Kathale)
Secretary, NUTA.

******

# राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वेतनेत्तर अनुदानाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, १८ डिसेंबर २००२ : तिसरे अधिवेशन २००२*

(१) * २७२७७ **श्री धोंडीराम राठोड, श्री.प.म.पाटील, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, श्री.जी.एल.ऐनापुरे, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.वसंतराव खोटरे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान सन २००५ पर्यन्त टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे राज्याच्या शिक्षण क्षेत्रात तीव्र असंतोष पसरला आहे हे खरे आहे काय;

(३) असल्यास, वेतनेत्तर धोरण टप्प्याटप्प्याने बंद करण्याच्या निर्णयाचा फेर विचार शासन करील काय;

(४) नसल्यास, वेतनेत्तर अनुदान बंद करणे बाबत शासनाची भूमिका काय आहे?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : (१) काटकसरीची उपाययोजना म्हणून शासनाने घेतलेल्या इतर अनेक निर्णयांपैकी हा एक निर्णय आहे, हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे. परंतु अंमलबजावणीची कार्यपध्दती व वेळापत्रक याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

(३) व (४) वरील निर्णय घेताना सर्व संबंधितांच्या अडचणींचा विचार करुनच शासन निर्णय घेईल.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनु.क्र.एक वरील प्रश्न आणि अनु.क्र.१५ वरील प्रश्नांचा विषय एकच आहे, तेव्हा हे दोन्ही प्रश्न क्लब करण्यात यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उप सभापती** : मी पाहतो.

**श्री.धोंडीराम राठोड** : सभापती महोदय, याठिकाणी पहिला प्रश्न असा विचारला आहे की, शासनाने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय? तर या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "हे खरे आहे" असे म्हटलेले आहे. वास्तविक सहा ते चौदा वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची शासनाची जबाबदारी आहे असे घटनेमध्ये नमूद केलेले आहे. घटनेप्रमाणे शासनाने ते केले पाहिजे असे संकेत असताना आपण प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळांचे वेतनेत्तर अनुदान टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेत आहात. खरे म्हणजे ग्रामीण भागामध्ये तेथील संस्था चालकांना कशा परिस्थितीत शाळा चालवाव्या लागतात याची सर्वांना कल्पना आहे. ग्रामीण भागातील शाळांकडे कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही. अशा वेळी या शाळा कशा चालवावयाच्या असा मोठा प्रश्न संस्थाचालकांसमोर आहे. तेंव्हा याबाबतीत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो योग्य नाही. तेव्हा मा. मंत्री महोदयांनी याबाबत खुलासा करावा.

**प्रा. रामकृष्ण मोरे** : सभापती महोदय, राजकोषीय सुधारणेच्या संदर्भात वित्त विभागाने काटकसरीच्या उपाययोजना म्हणून केलेल्या सूचनांपैकी ही एक सूचना होती आणि मंत्रिमंडळाने त्या सूचनेला मान्यता दिली आहे ही वस्तुस्थिती आहे. **परंतु अनेक ज्या सूचना करण्यात आल्या, त्यातील ही एक सूचना आहे.** यासंदर्भातील कोणताही आदेश सामान्य प्रशासन विभागाने, वित्त विभागाने किंवा शिक्षण विभागाने निर्गमित केलेला नाही. त्यामुळे विद्यालयांचे वेतनेत्तर अनुदान शासन बंद करणार आहे वगैरे अशा प्रकारचा कोणताही आदेश निर्गमित केलेला नाही. उलटपक्षी १९९९ मार्च अखेरपर्यंतचे वेतनेत्तर अनुदान द्यावे असा निर्णय घेतला आहे.

भविष्यकाळात देखील वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भात हे वेतनेत्तर अनुदान राहिले पाहिजे हिच शिक्षण विभागाची आणि शासनाची भूमिका आहे. उत्तरामध्ये शेवटचे उत्तर दिलेले आहे की, ५ ऑगस्ट रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या महासंघाबरोबर चर्चा झाली असता त्यांनी स्वतः होऊन सांगितले होते की, वेतनेतर अनुदानाच्या संदर्भामध्ये आम्ही आपल्याकडे काही प्रस्ताव देतो. वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भातील प्रस्ताव जास्त असू शकतो. कमी असू शकतो किंवा त्याच्या सुधारणा असू शकतात. त्यामुळे त्या संदर्भातील निर्णय घेत असतांना "सर्व संबंधितांशी चर्चा करुनच निर्णय घेतला जाईल." परंतु शासन हे वेतनेतर अनुदान बंद करणार नाही, हे निःसंदिग्ध शब्दात मी सांगू इच्छितो.

**प्रा.बी.टी.देशमुख** : मा.मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे, हे महाराष्ट्राला ठामप्रकारचे आश्वासन देणारे उत्तर आहे. परवा सभागृहात चर्चा झाली त्यावेळेला असे सांगण्यात आले होते की, यावर्षी ४२ कोटी रुपयांची तरतूद आहे. त्यापैकी २१ कोटी रुपये वितरित केले आहेत आणि आणखी २१ कोटी रुपये वितरित करणार आहात. ६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आहेत. ते पैसेही वितरित करणार आहोत. त्या दिवशी अशीही चर्चा झाली की, हा निधी जसाजसा उपलब्ध होईल तसेतसे १९९८-९९ पर्यंत येईल आणि बाकीचे नंतर देऊ. शालेय शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर स्थायी समितीच्या रिपोर्ट क्रमांक ११ मध्ये याचा उल्लेख आहे. "तसेच वेतनेत्तर अनुदान सन २००५ पर्यत कमी करण्यात येणार आहे असा निर्णय मंत्रिमंडळाने तत्वतः घेतलेला आहे." त्यामुळे हा प्रश्न आला आहे. आम्ही मुद्दाम टाकला. पहिल्या उत्तरामध्ये ते त्यांनी मान्यही केलेले आहे. नंतर मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की, असे शासनाचे धोरण नाही. अशा प्रकारचा कोणताही आदेश निघालेला नाही. सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीत १५ व्या क्रमांकावर प्रश्न आहे. त्यामध्ये हे मान्य केलेले आहे. प्रश्न क्रमांक २ मध्ये "दिनांक ८ जुलै २००२ रोजी व्यवस्थापक मंडळ व मुख्याध्यापक संघाने शाळा बंद आंदोलन केले, हे खरे आहे काय" असे विचारले आहे. त्याला उत्तर "हे खरे आहे" असे देण्यात आले आहे. ग्रामीण भागामध्ये यामुळे अत्यंत वाईट स्थिती येणार आहे. आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी फक्त मुंबईतील विचार करुन असा विचार करणे हे अत्यंत चुकीचे आहे. आपण याबद्दल जे सांगितले त्याबद्दल मी जरुर धन्यवाद देईल की, आपण म्हटले की, असा आदेश निघाला नाही, आणि असा आदेश काढू नये असे शासनाचे धोरण आहे. माझे म्हणणे असे आहे की, असे कोणतेही धोरण बाहेर निघण्यापूर्वी व्यवस्थापक महामंडळ, मुख्याध्यापकांची संघटना, तसेच अधिकृत शिक्षक संघटनांशी चर्चा केल्याशिवाय हा आदेश निघणार नाही असे आपण सभागृहाला ठामपणे सांगावे.

**प्रा.रामकृष्ण मोरे** : सभापती महोदय, 'होय'

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : सभापती महोदय, परवाच्या प्रश्नाला उत्तर देतांना मंत्रिमहोदयांनी असे म्हटले आहे की, चार वर्षाचे थकित अनुदान आहे हे जवळ जवळ पावणे तीनशे कोटी रुपये देणे आहे. १९९७-९८ साठी कमी पडत होते तेवढी ६ कोटीची पुरवणी मागणी मंजुर केली आणि बजेटमध्ये ४२ कोटी मंजुर केले. यापैकी २१ कोटी रुपये राहिलेले आहेत आणि हे ६ कोटी रुपये मिळून २७ कोटी रुपये अजून देणे आहेत. परवा प्रश्नाला उत्तर देतांना हे २७ कोटी रुपये एका महिन्यात देऊ असे म्हटलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. कारण हे ते बर करणार नाहीत. पण चार वर्षाचे वेतनेतर अनुदान दिले नाही यामुळे शाळांची काय अवस्था आहे हे सुध्दा तपासले पाहिजे. लॅबोरेटरी साहित्य घेण्यासाठी पैसे नाहीत. फर्निचरसाठी पैसे नाहीत. स्टेशनरी घेता येत नाही त्यामुळे कुठले शिक्षण आणि कुठले काय, आणि म्हणून आपण काल म्हटले की, रिॲप्रॉप्रिएशनव्दारे जमा झालेला निधी इकडे वळता करु. हा मार्च पर्यंत निम्मा, दोन वर्षाचा निधी इकडे वळविण्याची व्यवस्था केली जाईल काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : मार्च १९९९ अखेरपर्यंतचे वेतनेत्तर अनुदान देण्याच्या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने सभागृहाला जे सांगितले त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल. वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भामध्ये मी अगोदरच भूमिका स्पष्ट केलेली आहे. जसजसा निधी उपलब्ध होईल तो जास्तीत जास्त निधी याच्या संदर्भामध्ये मी ठाम आता काही सांगू इच्छित नाही. आपण ते देणारच आहोत हे बंद करणार नाही. मार्च १९९९ अखेरपर्यंतची व्यवस्था ४२ कोटी रुपयांची होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी ६ कोटी रुपये म्हटले आहेत असे मिळून ४८ कोटी रुपये तरतूद केलेली आहे. आपली प्राथमिकता सुरुवातीला वेतनाची आहे.

तसेच पाचवी ते सातवीच्या तुकड्यांच्या समायोजनाची प्राथमिकता आहे. या गोष्टी आपण पुरवणी मागण्यांव्दारे केलेल्या आहेत. वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात...

**श्री.नितीन गडकरी** : वेतन अनुदानाची प्राथमिकता मान्य आहे. आम्हाला खूप शाळांचे लोक भेटतात. ते म्हणतात की, आमच्याकडे प्लास्टर ठेवलेले आहे आणि अनुदान मिळाले की ते काम करु. आपण कोठे तरी कट करा. आपण वेतनेत्तर अनुदान देणार नाही, तीन वर्षात देऊ असे सांगितले जाते. याबाबतीत नवीन काही फॉर्म्युला द्या. ते देण्याची तुमची कमिटमेंट आहे. कायदेशीर जबाबदारी आहे. म्हणून याबाबतीत स्पष्ट सांगितले तर बरे होईल. नाही तर लोकांची फार अडचण होते.

**श्री.रामकृष्ण मोरे** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी स्पष्ट भूमिका मांडण्यास सांगितलेले आहे. हे वेतनेत्तर अनुदान आहे आणि अनुदान हे निधीच्या उपलब्धतेवर

अवलंबून असते.

**श्री.नितीन गडकरी** : केव्हा उपलब्ध होईल?

**श्री.रामकृष्ण मोरे** : जे उपलब्ध झाले त्याचे वाटप कसे करणार याची सुस्पष्ट कल्पना दिलेली आहे. पुढे कधी करणार हे आताच सांगू शकत नाही. या सभागृहात जे जे शब्द वेतनाच्या संदर्भात, वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात, तुकड्यांच्या समायोजनाच्या संदर्भात, पाचवी ते सातवीच्या संदर्भात, उच्च माध्यमिकच्या संदर्भात दिले गेलेले आहेत ते पाळलेले आहेत. त्यामुळे शब्द देताना देखील सर्व वस्तुस्थितीचा अंदाज घेऊन बोलावे लागेल, त्यामुळे यासंदर्भात मी आता काही सांगू इच्छित नाही.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : परवा माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले त्यामध्ये रिॲप्रोप्रिएशनव्दारे जो निधी उपलब्ध होईल तो पूर्णपणे इकडे वळता केला जाईल असे सांगितले.

**श्री.रामकृष्ण मोरे** : माननीय राज्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने सभागृहाला जे आश्वासन दिलेले आहे ते पाळले जाईल हे मी सांगितलेले आहे. परत माझ्या तोंडातून वदवून घ्यावयाचे आहे काय?

**श्री.धोंडीराम राठोड** : आतापर्यंत वेतनेत्तर अनुदान दिलेले नाही आणि देऊ शकत नाही. आपण ते टप्प्याटप्प्याने देणार आहात परंतु ज्यावेळी शाळेची तपासणी होते त्यावेळी त्या ठिकाणी जर सगळ्या सुविधा उपलब्ध नसतील तर त्या शाळेवर आपण नियमाप्रमाणे कारवाई करता. मग त्या शाळांना या अडचणीना तोंड द्यावे लागते त्यासाठी आपण काय करणार? कारण आपण त्यांची तपासणी करतो आणि ते निकष पूर्ण करु शकत नसतील, त्यांच्याकडे प्रयोगशाळेचे साहित्य नसेल, वाचनालयासाठी पुस्तके नसतील, फर्निचर नसेल, इक्विपमेंट्स नसतील तर त्यांच्यावर कारवाई करतो. हे दुहेरी मापदंड कसे अवलंबिण्यात येते?

**श्री.रामकृष्ण मोरे** : कोणत्याही शाळेला परवानगी देत असताना पूर्वीचे सूत्र चौथ्या वर्षी आणि आताचे सूत्र पाचव्या वर्षी असे आहे. त्यामध्ये असे गृहीत धरले आहे की संस्था चालकांनी वेतन आणि वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भात काही वर्षे जबाबदारी घेणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न महत्वाचा आहे. बऱ्याच वेळेला २० टक्क्यावर, ४० टक्क्यावर, ६० टक्क्याच्या अनुदानावर आलेली जी विद्यालये असतात त्या ठिकाणी वेतनेत्तर अनुदान वेळेत न मिळाल्यामुळे काही असुविधा निर्माण होऊ शकते आणि असतात. त्यामुळे अनुदानाला पात्र होण्यासाठी जे गुणांकन आहे त्या गुणांकनाच्या संदर्भात देखील काही बाबतीत फेरविचार करण्याची शासनाची मानसिकता आहे आणि तो विचार आपल्याला करावा लागेल हे मी निःसंदिग्ध शब्दात सभागृहाला सांगतो.

**श्री.जयंत पाटील** : वेतनेत्तर अनुदान शाळांना देणार आहात त्याबद्दल धन्यवाद. ज्या शाळांना हे वेतनेत्तर अनुदान दिले जाते त्या शाळेमध्ये त्या अनुदानाचा वापर योग्यरितीने होतो की नाही हे बघण्याची आपल्याकडे यंत्रणा आहे काय? असल्यास त्या यंत्रणेने केव्हा आणि किती तपासणी केली? हे वेतनेत्तर अनुदान संस्थांना न देता शाळांना दिले जाते. त्या वेतनेतर अनुदानातील सर्व परचेसींग संस्थाचालक करतात. एका शाळेची, एका संस्थेची एक खुर्ची २ हजाराला मिळते तर दुसऱ्या शाळेची खुर्ची २० हजार रुपयाला मिळते. एका शाळेतील बेंच १२०० रुपयाला तर संस्थेमध्ये १२ हजारपर्यंत केलेले आहे ही तपासणी शासन करणार आहे काय. अशा संस्थांविरुध्द आलेल्या तक्रारींची दखल हे शासन घेणार आहे काय. कारण यामुळे निम्मा पैसा वाचू शकेल. याठिकाणी तुम्ही काटकसर करावी.

**प्रा.रामकृष्ण मोरे** : अशा अनेक गोष्टी घडतात, घडू शकतात. याची माहिती मा. सदस्यांनी सभागृहाला दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. हे तपासण्यासाठी व्यवस्था असते, त्याचे ॲसेसमेंट केले जाते.

**श्री.जयंत पाटील** : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी आमदार म्हणून शासनाकडे पत्र दिलेले आहे त्याची अद्याप दखल घेतली गेली नाही. ज्या तक्रारी केल्या आहेत त्याची चौकशी सुरु आहे. लाखो, करोडो रुपये यामुळे वाचतील अशी परिस्थिती आहे. अशा ४-५ संस्था आहेत, आजच्या तारांकित प्रश्नाच्या यादीमध्ये त्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांकडून लाखो रुपये गोळा केले जातात आणि त्याकडे काही पाहिले जात नाही, १०-१५ वर्षे अशा संस्थांचे ऑडिट होत नाही अशा संस्थांविरूध्द कोणती कारवाई करणार आहे?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : सन्माननीय सदस्य जी माहिती देतील किंवा दिलेली माहिती आहे त्याची योग्य चौकशी करुन त्याच्यावर कार्यवाही केली जाईल.

**श्री.नानासाहेब बोरस्ते** : वेतनेतर अनुदानाची चर्चा होत असताना मा.मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. म्हणून मला स्पष्ट प्रश्न विचारावयाचा आहे की, आर्थिक काटकसरीच्या नावाखाली शासन टप्प्याटप्प्याने अनुदान बंद करणार आहे असे यात नमूद कले आहे. शासन इतर क्षेत्रातही काटकसर करणार आहे त्याच्यातून शिक्षण क्षेत्र वगळले जाणार आहे काय, शिक्षणाला प्राथम्यक्रम नंतर बाकी उपक्रम असे धोरण स्वीकारले पाहिजे. शिक्षणासारख्या महत्वाच्या राष्ट्रीय उन्नतीच्या दृष्टीकोनातून या क्षेत्राला वगळण्यात येईल काय? दुसरा प्रश्न असा आहे की, शासनाचे आदेश न पाळणाऱ्या शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करु असे नेहमी शासनाकडून पत्र दिले जाते अशा किती शाळांनी शासनाचे आदेश पाळले नाहीत आणि त्यांचे किती अनुदान कापले आहे?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : शिक्षण विषयक बाबींवरील कोणताही खर्च शासनाने कमी केलेला नाही. किंबहुना, त्याच्यामध्ये वाढच केलेली आहे. वेतनेतर अनुदानाचा प्रश्न आहे हे मान्य आहे. परंतु शिक्षण विषयक बाबींचा विचार करता मग पाचवा वेतन ताबडतोब लागू करण्याची बाब असो, त्याच्या फरकाची रक्कम देणे असो, उच्च माध्यमिक प्राध्यापकांना सुधारित वेतनश्रेणी देणे असो, सातव्या इयत्तेच्या शिक्षकांचा प्रश्न असो याबाबत पूरक मागणी सादर केली आहे. किंबहूना, मागील वेळी पुरवण्या मागण्या मंजूर झाल्या त्यावेळी त्या ५४० कोटीच्या होत्या त्या सर्व शिक्षण विषयक होत्या आणि यावेळीही पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत त्या १५० कोटीच्या आहेत. तेव्हा शिक्षणासंबंधामध्ये वेतनेतर अनुदानाची बाब सोडली तर कोणत्याही बाबीसंबंधी संघटनांमार्फत व लोकप्रतिनिधीही या ठिकाणी प्रश्न मांडले आहेत. त्याच्यामध्ये काटकसरीचा अवलंब केलेला नाही. काटकसरीची बाब अनेक खात्याच्या संदर्भातील बाबीपैकी होती त्याची अंमलबजावणी केलेली नाही. किंबहूना, ६ कोटीची तरतूद केलेली असल्यामुळे मा.मुख्यमंत्री यासंबंधी काटकसरीची भूमिका घेतात असे दिसते काय, प्रयोगशाळेतील बाब असो यासाठी लागणारा निधी आपण उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याच्यामध्ये काटकसरीचा भाग कोणत्याही स्वरुपामध्ये येत नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख** : मा.मंत्री महोदयांनी अगदी ठामपणे सांगितले आहे की, वेतनेतर अनुदान बंद करणार नाही. तशाप्रकारचे कोणतेही आदेश निघालेले आहेत. महाराष्ट्रामध्ये यानिमित्ताने सर्व लोकांना ठाऊक होईल. आता पुरवण्या मागण्या ६ कोटीच्या सादर केल्या आहेत आणि बजेटमध्ये ४२ कोटीची तरतूद केली होती त्यापैकी २१ कोटी दिले आणि हे ६ कोटी रुपये देणार आहे असे सांगितले आहे. मुंबईमध्ये बसून आय.ए.एस.अधिकाऱ्यांनी वेतनेतर अनुदानाच्या प्रश्नाबाबत जो दृष्टीकोन घेतला आहे तो आपण घेतलेला नाही या बाबत मी आपणास धन्यवाद देतो. आपल्या सचिवांनी तसे सांगितलेले आहे हे पहिल्या उत्तरामध्ये आलेले आहे. मा.मंत्री महोदय म्हणतात ते बरोबर आहे की, या ठिकाणी दिलेली आश्वासने पूर्ण झालेली आहेत. आपण २१ कोटी रुपये दिलेले आहेत आणि २१ कोटी रुपये देणार आहात. ६ कोटी रुपये सप्लीमेंटरी डिमांड झाल्यानंतर देण्यात येणार आहेत. हे झाल्यानंतर ९८-९९ पर्यंतची थकबाकी पूर्ण होते. आपल्याला बॅकलॉग भरुन काढावयाचा आहे. पुढच्या म्हणजे २००३-२००४ च्या वर्षीचे अंदाजपत्रक तयार करताना राहिले त्यातील निदान निम्मा बॅकलॉग तरी पूर्ण होईल असे आपण प्रयत्न कराल काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : नक्की प्रयत्न करीन. या प्रश्नावर जर आणखी प्रश्न उपस्थित होणार नसतील तर मी प्रामाणिकपणे तसे प्रयत्न करीन.

**श्रीमती संजीवनी रायकर** : संस्था चालकांच्या बैठकीमध्ये आणि गोविंद महेश श्रॉफ यांच्या उपस्थितीमध्ये शासनाने कबूल केले होते की, यांना ६ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. हे पैसे आपण कोठून आणणार आहात असा मी प्रश्न विचारला होता. त्यावेळी मा.मंत्रि महोदयांनी असे सांगितले होते की, मुख्यमंत्री निधीतून हे पैसे दिले जातील. तसे हे पैसे दिले जाणार आहेत का आणि जे २१ कोटी रुपये दिले गेलेले आहेत त्याचे काय झाले याची माहीती मा.मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी द्यावी.

**प्रा.रामकृष्ण मोरे** : वेतनेतर अनुदानासाठी कॉन्टीन्जन्सी फंडातून रक्कम देता येते. मुख्यमंत्री निधीतून अशी रक्कम देता येत नाही हे मला माहीती आहे. त्यामुळे मुख्यमंत्री निधीतून हे पैसे जातील असे मी सांगितलेले नाही. आता २१ कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे. वेतनेतर अनुदानाच्या संदर्भात अनेक संस्था चालकांच्या थोड्या फार प्रमाणात तक्रारी आहेत की, यासाठी पे यूनीटमध्ये आम्हाला हेलपाटे मारावे लागतात. आपल्या सर्वांना मान्य असेल तर वेतनेत्तर अनुदानाचे चेक संस्था चालकांना बँकेचे कमीशन वजा जाता डिमांड ड्राफ्टने रजिस्ट्रर पोस्टाने पाठविण्याची शासनाची तयारी आहे. जेणेकरुन या सर्व बाबतीत पारदर्शकता येऊ शकेल. यामुळे या, भेटा आणि सुटा असे म्हणण्याची देखील गरज नाही.

**मेजर सुधीर सावंत** : वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्या बाबत मी शासनाचे अभिनंदन करतो. जे रात्र शाळेतून ॲडमीशन घेतात. मी या रात्र शाळांना भेट दिली होती. त्यांच्याकडे स्टेशनरी घेण्यासाठी देखील पैसे नाहीत अशी या शाळांची अवस्था आहे. या शाळेतील ९० टक्के विद्यार्थी हे मागासवर्गीय आहेत. या शाळांकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या शाळांना खास बाब म्हणून वेतनेतर अनुदान देण्याचा प्रयत्न शासन करील काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : होय.

*****

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY APPELLATE SIDE

Order passed by the High court in the case of :-

1.DEVARE S.T. Age : 44 yrs., Occ : Service (Asstt. Teacher), r/o. 19, Anandvan, Nasik – 422 005

2. SMT. DHULE M.N. Age : 42 yrs., Occ : Service (Asstt. Teacher), r/o Survey No. 878, Plot No. 415, Rajiv Nagar, Nasik.

3. SHIRSAT B.D. Age : 46 yrs. Occ : Service (Asstt. Teacher), r/o. NSZ/BE1/22/4, CIDCO, Nasik-422 009.

4. MORE A.Y. Age : 37 yrs. Occ : Service (Asstt. Teacher), r/o N-9/G-1/26/2, New CIDCO, Nasik.

5. SMT. KHER N.P. Age : 43 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o 12, Dhawalgiri Housing Society, Takni Road, Nasik

6. KAZI H.S. Age : 44 yrs. Occ : Service (Asstt. Teacher), r/o ASM- 11, Ashwin Nagar, New CIDCO, NASIK – 422 009.

7. P.V. GAIKWAD, Age : 44 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o N-32/R1/11/7, Maharana Pratap Chowk, New CIDCO, Nasik-422 009.

8. SMT. WAGH R.T, Age : 43 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o 12, N11/N3/5/2, Ganesh Chowk, New CIDCO, Nasik – 422 009.

9. SMT. NIRBHALKAR S.V. Age : 40 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o Sarang, Block No.7, Near Boys Town, Vise Mala, Nasik, 422 005.

10. SMT. DESHPANDE R.P. Age : 50 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o 4 Kaveri Apartment, Mumbai Naka, Kaut Ghat, Nasik

11. SMT. MANKAR R.N. Age : 41 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o Adarsh Society, Block No.8, New CIDCO, Nasik – 422 009.

12. SOW. Gile S.B. Age : 44 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o Subodh, Survey No.878/2, Bungalow No.39, Rajiv Nagar, Nasik

13. SOW UKIDAVE S.D., Age : 48 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o Swanand, Plot No,192, Survey No.36, Khutwad Nagar, Kamathwade, Nasik 422 008.

14. SOW DIVEKAR S.A. Age : 47 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o 38 Sharanpur, Pratibha Niwas, Nasik-422 002.

15. SOW MHATRE S.D., Age : 40 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o "Hirguj" Near I.T.I., Pethe Nagar Road, Indira Nagar, Nasik – 422 009.

16. AHARE K.N. Age : 40 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o "Shribhavan", Municipal Nagar Palika, Near CIDCO MADHYAMIK VIDHYALAYA Gate, Nasik

17. PATIL S.R., Age : 50 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o N- 321/N-3115, Ganesh Chowk, Nasik.

18. DHIKLE S.T., Age : 52 yrs., Occ : Service ( Head Master ), r/o 492, Krishna Nagar, Ambad, Nasik 422 010.

19. SOW TANDLE S.A. Age : 42 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o Utkarsh Colony, Plot No.10, Alhaad Bungalow, Sharanpur Road, Nasik-422 002.

20. WAGH S.T., Age : 47 yrs., Occ : Service ( Asstt. Teacher), r/o Barti Colony, Nasik

...........*PETITIONERS*

***V/S.***

1. THE ACCOUNTS OFFICER, Education Department( Secondary), Nasik

2. THE EDUCATION OFFICER ( Secondary), Zilla Parishad, Nasik

3. DEPUTY DIRECTOR, Education Maharashtra State, Pune,

4. NASIK MUNICIPAL CORPORATION, Nasik,

5. THE STATE OF MAHARASHTRA

.............. *RESPONDENTS*

**(१)**

**वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत**

*तिसरे अधिवेशन २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*बुधवार, १२ डिसेंबर २००१*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ८, पृष्ठ १८ - १९*

(७) * १९१२० **सर्वश्री दिपक सावंत, व्हि.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, सुरेश पाटील, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते :** सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) विना अनुदानित माध्यमिक शाळातील शिक्षक/मुख्याध्यापकांचा सेवाकाळ, बढती, निवृत्ती वेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरल्या जाते परंतु वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरल्या जात नाहीत. याबाबत मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचेशी शिक्षक महामंडळाची दिनांक ७ ऑगस्ट, २००१ रोजी चर्चा झाली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, चर्चेत या मागणीबाबत वित्त मंत्र्याकडे पाठपुरावा करण्यात येईल व या मुद्याबाबत पुढील कार्यवाही त्वरीत करावी असे निर्देश मा.मंत्री, शालेय शिक्षण यांनी शिक्षण विभागाला दिले आहेत, हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.रामकृष्ण मोरे :**(१) होय.

(२) होय.

(३) अद्याप निर्णय झालेला नाही.

(४) प्रस्ताव मा.वित्त मंत्र्यांकडे सादर करण्यात आलेला आहे.

******

**(२)**

**वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवा काळ ग्राह्य धरणे.**

*पहिले अधिवेशन २००२ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*शनिवार, १६ मार्च २००२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२७, क्रमांक ४, पृष्ठ ३३*

(३९) * २२३१९ **सर्वश्री व्हि.यू.डायगव्हाणे,बी.टी.देशमुख,सुरेश पाटील,प.म.पाटील,नानासाहेब बोरस्ते,दिपक सावंत :** तारांकित प्रश्न क्रमांक १९१२० ला दिनांक १२ डिसेंबर २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विना अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांचा सेवाकाळ, वरिष्ठ व निवडश्रेणी साठी ग्राह्य धरला जावा याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय झालेला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

******

**Being Writ Petition No. 4346 of 2000,**

Under Article 226 of the Constitution of India. Praying that :

(a) Rule be issued and record and proceedings of the case be called for ;

(b) this Hon'ble Court may be pleased to issue a Writ of Mandamus or a Writ in the nature of Mandamus or any other writ, order or direction under Article 226 of the Constitution of India be issued to quash and set aside the impugned order dated 08.06.2000 issued by the Respondent No.1, Accounts Officer, Education Department, Nasik cancelling the Petitioners fixation of revised salary in senior pay-scale as well as cancellation of the fixation of their salary in accordance with the 5th Pay Commission and directing recovery of the alleged excess amount;

( c ) pending the hearing and final disposal of the present Writ Petition, the effect, implementation, operation and execution of the impugned order dated 08.06.2000 issued by the Respondent No.1, Accounts Officer, Education Department, Nasik be Stayed;

( d ) Interim and Ad interim relief's in terms of prayer clause (c) above;

(e) any such other and further relief as this Hon'ble Court may deem fit and proper in the facts and a circumstances of the present case.

Mr.Y.S. Jahagairdar for Amit Sale for petitioners

Mr. R.V. More for respondent no.4

Mr. S.P. Nargolkar AGP

**CORAM : A.P. SHAH & V.C. DAGA JJ**
**DATED 14.9.2000**

P.C.

We have heard the learned counsel for the parties. Rule. Respondents waive service. By consent the petition is taken up for hearing.

2. Petitioner nos. 1 to 17. 19 and 22 are serving as assistant teachers in CIDCO Madhyamik Vidhyalaya, CIDCO, Nasik, hereinafter referred to as the said school, Whereas petitioner no.18 is serving as head master in the said school. The said school is a private school conducted by the respondent no.4 Municipal Corporation. It was established in 1980 and was granted approval by the State Government with effect from June 1980. The Petitioners were appointed as assistant teachers in the said school from time to time and the petitioner no. 18 was promoted as head master of the said school. The State Government in Education and Employment Department issued a **Government Resolution dated 2.9.1989** whereby the State Government made applicable revised pay scale to the teaching and non teaching staff in non Government schools, primary schools, secondary schools. In accordance with the Annexure A to E to the Government Resolution dated 2.9.1989. It seems that the Central Government had introduced the senior pay scale and selection pay scale to the teachers as per the recommendation of National Commission appointed under the Presidential Chairmanship of prof. D.P. Chatopadhya. By the said Government Resolution the State Government has made applicable senior pay scale and selection pay scale on the same lines to the teachers in the State of Maharashtra.

3. In the instant case we are concerned with clause 9 of the aforesaid Government Resolution dated 2.9.1989 which speaks about the applicability of the revised pay scales to the employees of the school. Under clause 9 of the said Government Resolution the teachers in non Government Schools, aided primary schools. Secondary schools, higher secondary schools, technical schools etc in the State have been given 3 tyre pay scales with effect from 1.1.1986 in accordance with the Central Government i.e. basic pay scale, senior pay scale and selection pay scale on certain conditions. By **circulars dated 15.1.1990 and 13.9.1990 the State Government issued certain clarifications** in respect of implementation of Government Resolution dated 2.9.1989 and we shall refer to the said circulars shortly.

4. As per the Government Resolution dated 2.9.1989 and after considering the report of the Deputy Commissioner Nasik Municipal Corporation Nasik and the Head Master, CIDCO Madhyamik Vidhyalaya, CIDCO Nasik, the petitioners were given revised pay scale from 1996 vide order dated 18.10.1996 as all petitioners have completed 12 years service in CIDCO Madhyamik Vidylaya. Accordingly the petitioners were paid revised pay scale w. e. f. 18.10.1996 till May 2000. By the impugned order dated 8.6.2000 passed by the Accounts Officer, Education Department Nasik it was held that in order to be eligible for the senior pay scale what is required is 12 years qualified service **and 12 years qualified service should be from the date from which the school was brought on grant basis.** It was further held that since CIDCO Madhyamik Vidhyalaya was brought on grant with effect from 1.6.1991 the petitioners were not entitled for the senior pay scale for the period of 12 years from 1.6.1991 and therefore the pay scale granted earlier was illegal and therefore, **the impugned order was issued for the cancellation of the same and recovery was directed of the excess amount.**

5. Having heared the learned counsel for the parties we are of the opinion the impugned order is exfacie illegal and contrary to various Government Resolutions issued by the State Government. On a bare perusal of the impugned order **it is seen that it is based on clause (c) of the Circular dated 15.1.1990**. Before referring to the Circular dated 15.1.1990 we may examine the scheme under clause 9 of the Government Resolution dated 2.9.1989 which prescribes 3 tyre payscales to the teachers. By clause 9 the teachers were given revised pay scale from 1.1.1996 in accordance with the Central Government i.e. basic pay scale, senior pay scale and selection pay scale on certain conditions. Clause 9 further provides that there will be one class of the head master and after qualified service of 12 years on that post senior pay scale will be given. Clause 9 also puts

**(३)**

**वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत**

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००२*
*बुधवार, १८ डिसेंबर २००२*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या आठव्या यादीतील प्रश्न क्रमांक २४९५८*

(१) २४९५८ (७-८-२००२) **श्रीमती संजीवनी रायकर, श्री.सुरेश भालेराव, श्री.विनोद तावडे, श्री.विजय गिरकर, डॉ.अशोक मोडक, श्री.प.म.पाटील, प्रा. बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.वसंतराव खोटरे, श्री.जी.एल.ऐनापूरे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षक/मुख्याध्यापकांचा सेवाकाळ, बढती, निवृत्ती वेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरला जातो. परंतु वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरला जात नाही हा भेदभाव दूर करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) उक्त प्रकरणी अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.रामकृष्ण मोरे** (११-१०-२००२) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

******

(४)

## राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या मागणीसाठी १२ डिसेंबरला काढलेला राज्यव्यापी मोर्चा.

*महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, १८ डिसेंबर २००२ : तिसरे अधिवेशन २००२*

**सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे, गजेंद्र ऐनापुरे** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

**प्रा.रामकृष्ण मोरे** (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे, गजेंद्र ऐनापुरे यांनी 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या मागण्यांसाठी १२ डिसेंबरला काढलेला राज्यव्यापी मोर्चा' या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### निवेदन

'ज्याअर्थी राज्यातील शालेय शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी, पालकवर्ग यांच्याशी निगडित असलेल्या मागण्या/समस्यांबाबत, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे, प्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षणमंत्री व सचिव यांच्याशी अनुक्रमे दि.९ जुलै व २६ नोव्हेंबर २००२ ला चर्चा केली आहे आणि

ज्याअर्थी, शिक्षक व शिक्षणविषयक मागण्या/समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासन पक्षपाती धोरण स्वीकारीत आहे : आणि

ज्याअर्थी, नवीन नवीन जाचक अटी व धोरण संबंधितांशी चर्चा न करता शिक्षक-कर्मचारी व विद्यार्थ्यांवर लादण्याचे विभागाने सुरु केलेले आहे आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने दिनांक ११ डिसेंबरला बैठा सत्याग्रह व १२ डिसेंबर २००२ रोजी राज्यव्यापी मोर्चाचे आयोजन केले आहे; आणि

ज्याअर्थी, शिक्षण विभागाचे अडेल व अदूरदर्शी धोरणामुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रात नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे;

त्याअर्थी, हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे.'

### मा.शालेय शिक्षणमंत्री यांचे निवेदन

राज्यातील शालेय शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर शासनाने दिनांक ९ जुलै २००२ व २६ नोव्हेंबर २००२ रोजी त्यांच्या मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा केलेली आहे. या बैठकीला संघटनेचे सर्व पदाधिकारी तसेच शासनाचे अधिकारी उपस्थित होते. शिक्षक संघटनेच्या विविध मागण्यांबाबत या बैठकांमध्ये चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे:-

१) विभागीय संघटनांच्या सभा आयोजित करण्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालकांना दिनांक ३०.७.२००२ च्या पत्रान्वये शिक्षण संचालकांनी सूचना दिलेल्या आहेत.

२) वेतनविषयक थकित रकमांचा आढावा घेऊन आवश्यक तरतूद करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

३) वर्धा जिल्ह्यातील ११ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांपैकी १० शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदांना मान्यता देण्यात आली असून एका पदावर जाती प्रमाणपत्र पडताळणीचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे त्या पदास मान्यता देण्यात आलेली नाही.

४) कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी रुपये २२३६.९७ लक्षची तरतूद उपलब्ध झाली असून त्यांचे वितरण दिनांक २८.८.२००२ रोजी करण्यात आलेले आहे.

५) शाळा न्यायाधिकरणाकडे प्रलंबित प्रकरणांचा संचालकांमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

६) फेब्रुवारी २००१ पासून २० टक्के अनुदानावर आलेल्या माध्यमिक शाळांना नियमित वेतन मंजूर करण्यात आले आहे.

२. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत शासनाकडून अत्यंत सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात आला असून त्यांचे वेळोवेळी निर्माण झालेले प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत विशेष प्रयत्न केलेले आहेत. शासनाचे धोरण निःपक्षपाती व सहकार्याचे आहे तसेच विद्यार्थ्यांच्या हिताचे असून हे सर्व निर्णय चर्चा करुनच घेतले आहेत.

**(सुचनेवरील मा.शालेय शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनानंतर....)**

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी १२ डिसेंबरला नागपूरमध्ये मोर्चा काढला आणि त्या निमित्ताने आम्ही एक निवेदन देखील शासनाला आपल्यामार्फत सादर केले होते. आता त्या संबंधात जे उत्तर या निवेदनाच्या स्वरुपात शासनामार्फत आलेले आहे त्यामध्ये गेल्या ५-६ महिन्यामध्ये ज्या बाबी सुटलेल्या होत्या त्यांचाच केवळ उल्लेख केला आहे. खरे म्हणजे मोर्चा ज्या मागण्यांच्या संदर्भात काढला गेला होता त्यांचा उल्लेख या निवेदनात पाहिजे होता. त्यातील पहिली मागणी अशी होती...

---

conditions before candidate makes himself eligible to the senior payscale. The conditions are as follows :

a) 12 years qualified service with educational qualification.

b) The work of the candidate should be at the satisfaction of the Committee appointed for this purpose.

c) The candidate must have completed training of 3 weeks.

6. It may be mentioned at this stage that the Government **Resolution dated 2.9.1989 nowhere mentions that the qualified service of 12 years should be from the school which is brought on grant basis. It is required to be noted that the qualification prescribed for the aided school are the same in the unaided school and there are no separate rules for unaided school which is receiving grant and school which is not receiving grant. Under the circumstances it is not correct to assume that the 12 years service should be from aided school only.** It is seen that respondent no.1 has relied upon **clause (c) of Government Resolution dated 13.9.1980** which reads as under :

"Whether senior pay scale can be given to teachers who have worked for some years in one secondary school and some years in another school and some years in higher secondary school – totaling 12 years period."

The above provision speaks about the service of teachers in two or more schools which can be clubbed for the purpose of computation of 12 years. Explanation to clause (c) merely states that if both or all the schools are brought on grant then services in these schools can be accounted for the computation of the 12 years qualified service. In the instant case the petitioners have worked in the same school i.e. CIDCO Madhyamik Vidyalaya right from their appointements.Clause (c) is thus clearly inapplicable to the petitioners. **The Government Resolution nowhere prescribes that entire service of 12 years has to be in the aided school** and therefore when the teachers are working in the said schools they are entitled to revised payscale after completion of 12 years. The impugned order dated 8.6.2000 cannot therefore be sustained.

7. **In the result petition succeeds.** Rule is made absolute in terms of prayer (b) with no order as to costs.

14.9.2000

Sd/- P. D. Deogaonkar, 29.9.2000 / For Additional Registrar.
TRUE COPY 30.10.2000

******

**उपसभापती :** सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, प्रश्न विचारण्यापूर्वी मी त्याबाबतची पार्श्वभूमी सांगत होतो, एक ग्राऊंड तयार करीत होतो. पण आता आपण प्रश्न विचारण्यास सांगत आहात म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, विनाअनुदानित शाळांना अनुदान देणे, दोन वर्षापूर्वी येथे आपण यासंबंधात ७५३ शाळांची यादी तयार केली होती. परंतु या वर्षी मात्र अजूनही तशी यादी आपण जाहीर केलेली नाही. त्यासंबंधात जे आपण निकष ठरविले आहे त्यामध्ये म्हटले आहे की, १०० पैकी ९० गुण मिळविणाऱ्या शाळाच अनुदानपात्र होण्यास निकषपात्र ठरतील. याचा अर्थ कोणतीही शाळा निकषामध्ये येणार नाही असेच धोरण आपण ठरविले. तेव्हा निकषपात्र शाळांची यादी आता अधिवेशनाचे २-३ दिवस असले तरी मार्च पूर्वी तरी जाहीर होईल काय? तसेच सी.एल.संबंधातील जी मागणी आहे त्यामुळे कोणताही आर्थिक बोजा आपणावर येत नाही. पहिल्यांदा १५ रजा होत्या त्या आता ८ झालेल्या आहेत. तेव्हा वेतन विषयक मागण्या आपण मंजूर केल्या पण ज्या किरकोळ मागण्या आहेत त्या मात्र मंजूर झालेल्या नाहीत. दुसरे असे की, तिकडे आहे तसेच ते येथेही द्या अशी आमची मागणी आहे. याबाबत ९ मार्च ला जी चर्चा झाली त्यात किरकोळ रजेच्या बाबतीतील मागणी ही तात्विक दृष्ट्या बरोबर आहे, तेव्हा याबाबत मुख्य सचिवांबरोबर चर्चा करण्यात येईल असे आपण म्हटले होते. पण अद्याप त्याबाबत काहीही निर्णय आम्हाला कळलेला नाही. तेव्हा विनाअनुदानित शाळांपैकी अनुदानपात्र शाळांची यादी मार्च पूर्वी जाहीर करणार काय आणि सी.एल.च्या बाबतीत निर्णय घेऊन पहिल्याप्रमाणे १५ सीएल देण्यात येतील काय? असे माझे दोन प्रश्न आहेत त्यांची उत्तरे मिळावीत.

**प्रा.रामकृष्ण मोरे :** अध्यक्ष महाराज, विनाअनुदानित शाळा टप्प्यावर अनुदानास पात्र होतील त्या संदर्भातील यादी मागील वर्षी आपण ७५१ अशी जाहीर केली होती... सब्जेक्ट टू करेक्शन ... आणि ज्या ज्या टप्प्यावर शाळा अनुदानास पात्र होतील त्याप्रमाणे त्यांची यादी जाहीर केली जाते.. आता अशा प्रकारे पात्र होणाऱ्या शाळांची यादी केव्हा जाहीर करणार असा प्रश्न सन्माननीय सदस्यांचा आहे. अध्यक्ष महाराज, एक गोष्ट मान्य करावयास पाहिजे की, विविध शिक्षक संघटनांशी झालेल्या चर्चेमध्ये अनुदानास पात्र होण्यासाठी ९० गुण हे फारच डिस्टींक्ट होतात त्यामध्ये कमी गुण करण्याची शासनाचीही इच्छा आहे, जेणेकरुन जास्तीत जास्त शाळा त्या नियमात, निकषात बसू शकतील. तेव्हा या दृष्टीने या ९० गुणांच्या बाबतीत शासन फेरविचार करणार आहे. दुसरा प्रश्न हा सी.एल. च्या बाबतीतील आहे. याबाबत सुध्दा विविध शिक्षक संघटनांशी चर्चा केली आहे आणि आपली ही जी मागणी आहे ती तत्वतः व्यक्तीशः मला मान्य आहे. पण विविध संघटनांचे याबाबतचे प्रस्ताव वेगवेगळे आहेत. म्हणजे प्रत्यक्ष कामाच्या दिवसातील दिवस कमी करावयाचे की, सुटीच्या दिवसातील कमी करावयाचे. तर याबाबतीत संचालकांना सविस्तर अशी एक टिप्पणी सादर करण्यास आपण सांगितले होते आणि त्यांनी ती टिप्पणी सादर केलेली देखील आहे. तेव्हा याही संदर्भात सगळ्या संघटनाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन... ज्याप्रमाणे अनुदानप्राप्त शाळांची यादी मार्च पर्यंत जाहीर केली जाईल त्याप्रमाणे हाही निर्णय साधारणतः फेब्रुवारी मध्ये सर्वांशी विचारविनिमय करुन जाहीर केला जाईल.

अध्यक्ष महाराज, त्यानंतर एक गोष्ट मला आवर्जून येथे सांगावयाची आहे की, नियम ९३ अन्वये सूचना देताना सन्माननीय सदस्यांनी ती कोणत्या शब्दात द्यावी हा सगळा सदस्यांचा अधिकार आहे. पण शासनाची भूमिका प्रश्न समजावून घेऊन अधिकाधिक सहकार्याची आहे, कर्तव्याची आहे. परंतु या सुचनेमध्ये मात्र जे शब्द वापरले आहेत... यात म्हटले आहे की,'.. विभागाचे अडेल धोरण आहे..' अध्यक्ष महाराज, आपण केव्हाही अडेल धोरण ठेवलेले नाही...

सभापती महोदय, शासनाने या ठिकाणी कोणतेही अडेल धोरण ठेवले नाही. किंवा असहकाराचे धोरण देखील ठेवले नाही. चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याची भूमिका शासनाची आहे. त्यामुळे या ठिकाणी हा जो शब्द वापरण्यात आलेला आहे. त्यामुळे मला दुःख होत आहे, हे मला या ठिकाणी नमुद करावेसे वाटते.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** 'शिक्षण विभागाचे अडेल आणि अदूरदर्शी धोरण' हे शब्द मी मागे घेतो.

**प्रा.रामकृष्ण मोरे :** मी आपला आभारी आहे.

**श्री.नानासाहेब बोरस्ते :** सभापती महोदय, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी मा.मंत्रिमहोदय तसेच संबंधित शासकीय अधिकाऱ्यांबरोबर चर्चा झाली आहे. त्याप्रमाणे शासनाने काही निर्णय घेतले आहेत. मंत्रिमहोदयांनी त्यांना तत्वतः मान्यता दिली आहे. विना अनुदानित शाळेतील सेवा ही अनुदानित शाळेत आल्यानंतर गृहीत धरावी, त्याप्रमाणे त्या शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी मिळावी. या बाबत हायकोर्टाने निर्णय दिला आहे. सिडको येथील माध्यमिक शाळेच्या बाबतीत हायकोर्टाने निर्णय दिला आहे. त्याची प्रत आम्ही मा. मंत्रिमहोदयांना आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांना चर्चेच्या वेळी सादर केली आहे. त्या चर्चेत ही बाब तत्वतः मान्य करण्यात आलेली आहे. आता या बाबतची अंमलबजावणी एक महिन्यात होणार आहे काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** एक महिन्यात याबाबतची अंमलबजावणी केली जाणार नाही. परंतु या बाबतची सविस्तर माहिती घेऊन आणि सर्व संबंधितांशी चर्चा घेऊन या बाबतचा निर्णय देखील मार्चपूर्वी करण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, विना अनुदानातील सेवा धरण्याबाबत आता हायकोर्टानेच निर्णय दिला आहे. एखादा शिक्षक विना अनुदानीत शाळेत काम करतो म्हणजे काही गुन्हा करीत नाही. ती सेवादेखील धरण्यात आली पाहिजे. त्या सेवेचा विचार करण्यात यावा व ती धरण्यात यावी असा हायकोर्टाने निर्णय दिला आहे. त्याप्रमाणे विना अनुदानीत काळात केलेली सेवा ही निवडश्रेणी देताना धरण्यात यावी, अशी आम्ही मागणी करीत होतो, परंतु त्या बाबत अनेक वेळा माननीय मंत्रिमहोदयांनी सहमती व्यक्त केली आहे., पण निर्णय होत नव्हता. त्यामुळे काहींना हायकोर्टात जावे लागले. आता या बाबत हायकोर्टानेच निर्णय दिला आहे. ज्यावेळी या बाबतची चर्चा झाली होती, तेव्हा या निर्णयाची प्रत माननीय मंत्रिमहोदयांना देण्यात आली. म्हणून या बाबतचा निर्णय आता शासन एक महिन्याच्या कालावधीत घेईल काय? तसे आदेश शासन निर्गमित करील काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** शिक्षण सेवकाची सेवा ही पेन्शनला गृहीत धरण्यात आली आहे. सभापती महोदय, आता माननीय सदस्य जी मागणी करीत आहेत, त्या बाबत मला सर्व संबंधीतांशी चर्चा करावी लागेल. कारण चर्चा केली नाही तर तसा आरोप करण्यात येतो. आता माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याबरोबर बसून या बाबत चर्चा करण्यात येईल आणि या बाबतचा निर्णय एक महिन्याच्या कालावधीत घेण्यात येईल.

******

**(५)**

**महाराष्ट्र शासन**

क्र. एसएसएन १०९९/(३०८/०२)माशि-२
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
**दिनांक ७ जानेवारी २००३**

प्रति,
शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य पूणे.

**विषय :-** माध्यमिक शिक्षकांची वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवा ग्राह्य धरण्याबाबत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र. ४३४६/२००० मध्ये मा. उच्च न्यायालयाने विनाअनुदानित शाळेत केलेल्या १२ वर्षाच्या सेवेनंतर सुधारित वेतनश्रेणी देण्यास काही शिक्षकांना पात्र ठरविण्यात आले आहे. याच धर्तीवर शासनाच्या दि. १५ जानेवारी १९९० च्या निवडश्रेणीत पात्रतेच्या अटींमध्ये सुधारणा करण्याचे शासनाने मान्य केले असून यानुसार सर्व अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना त्यांची १२ वर्षाची सेवा निवडश्रेणीसाठी पात्र ठरविण्याचे शासनाने निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने अशाप्रकारचा निर्णय निर्गमित केल्यानंतर एकूण किती शिक्षक यासाठी अंतर्भूत असु शकतील, अशा शिक्षकांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी दिल्यामुळे शासनावर किती आर्थिक भार पडणार आहे, त्याचप्रमाणे या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी किती कालावधी लागण्याची शक्यता आहे इ. माहिती अंतर्भूत करुन सविस्तर प्रस्ताव शासनास एक महिन्याच्या आत सादर करावा, ही विनंती. प्रस्तुत प्रकरणी मा. मंत्रिमहोदयांनी विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनापूर्वी निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या असल्यामुळे हे प्रकरण तातडीचे समजावे.

(मोहन पांढरकामे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

******

(१)

***अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्था व अशासकीय अनुदानित तांत्रिक माध्यमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे***

*चौथे अधिवेशन, १९९९ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*सोमवार, दिनांक २० डिसेंबर १९९९*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२०, क्रमांक ६, पृष्ठ ८१ - ८२*

अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्था व अशासकीय अनुदानित तांत्रिक माध्यमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे यासंबंधी माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्याचे निवेदन.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४६ अन्वये अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्था व अशासकीय अनुदानित तांत्रिक माध्यमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करणे या विषयी पुढीलप्रमाणे निवेदन करतो.:-

पाचव्या केंद्रीय वेतन आयोगानुसार शासनाने शासकीय तंत्र शाळा व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिनांक १० डिसेंबर, १९९८ नुसार सुधारित वेतनश्रेण्या लागू केलेल्या आहेत. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थातील व अशासकीय अनुदानित तांत्रिक माध्यमिक शाळांतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून मंजूर करण्यात येत आहे. या निर्णयामुळे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील अशासकीय अनुदानित संस्था, शाळांमधील एकूण १०,४८३ कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणीचा लाभ मिळणार आहे.

या निर्णयामुळे वेतनातील वाढ व त्यावरील वाढीव भत्ते मिळून अंदाजे रुपये १०.५१ कोटी प्रति वर्ष इतका खर्च शासनास येईल व एकूण थकबाकी रुपये ४४.६३ रु. अदा करण्यात येईल. दिनांक १.१.१९९६ ते ३०.९.९८ पर्यंतची थकबाकी रोखीने अदा करण्यात येईल. या संबंधीचा शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येत आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, नामदार उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी आता जे निवेदन येथे केलेले आहे, त्या संदर्भात मला दोन लहान लहान क्लॅरिफिकेशन्स पाहिजेत. शासकीय शाळांतील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग लागू करणारा जी.आर.डिसेंबर, १९९८ मध्ये निघाला. अशासकीय विद्यालयातील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग लागू करणारा शासन निर्णय १३ मे, १९९९ ला निघाला. मात्र एमसीव्हीसी व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये काम करणाऱ्या 'अधिक दोन' स्तरावरील शिक्षकांच्या बाबतीत मात्र शासन निर्णय अजूनही निघालेला नाही. तो निर्णय आता झालेला आहे हे योग्य झाले. याबाबतीत मला नामदार मंत्र्यांकडून अशी माहिती पाहिजे की, जस्टीस नाईक यांच्या समानीकरण समितीने "व्यावसायिक अभ्यासक्रमातील अधिक दोन स्तरावरील शिक्षक व शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षक यांच्यामध्ये समानता ठेवावी" असा अहवाल दिला होता. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ४ मार्च १९९३ रोजी रिट पिटीशन नं.१८८०/८७ या प्रकरणामध्ये "असा भेदभाव ठेवू नये" असा निर्णय दिलेला आहे. तेव्हा शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील अधिक दोन स्तरावरील शिक्षक यांच्यामध्ये समानताच आपण ठेवली आहे ना? की त्यामध्ये काही बदल केलेला आहे?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, यामध्ये समानता मेंटेन्ड केलेली नाही. कोर्टाचा निर्णय असेल किंवा अन्य काही बाबी असतील तर त्या बाबत माननीय सदस्यांशी बोलून मी या बाबत पुनर्विचार करावयाला तयार आहे.

**श्रीमती संजिवनी रायकर :** सभापती महोदय, किमान कौशल्यावर आधारित शिक्षकांना वेतनश्रेणी दिली आहे काय? की अजून देणार आहात?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** माझे निवेदन स्वयंस्पष्ट आहे.

**श्री.अरुण मेहता :** सभापती महोदय, सभागृहात ज्यावेळी निवेदन वाचले जाते. त्यावेळी ते आमच्या हातात मिळण्याची गरज आहे. आमच्या हातात हे निवेदन न आल्यामुळे आम्हाला काही क्लॅरिफिकेशन विचारता येत नाही.

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभागृहात निवेदन करण्यापूर्वी सभापती महोदय, मी या निवेदनाच्या प्रती आपणाला सादर केलेल्या आहेत.

******

(२)

**किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या त्रुटी दूर करणेबाबत**

*तिसरे अधिवेशन, २००० : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर २०००*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक ४, पृष्ठ २८ - २९*

**(२६) * १०४८८ सर्वश्री गंगाधर पटणे, प.म.पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, नाना बोरस्ते, दिवाकर पांडे, श्रीमती संजीवनी रायकर, सुरेश भालेराव, जगदीश गुप्ता :** तारांकित प्रश्न क्रमांक ७६३९ ला दिनांक १ ऑगस्ट, २००० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय–

(१) किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम (एम.सी.व्ही.सी.) आणि व्दिलक्षी अभ्यासक्रमासाठी नियुक्त निदेशकांना पाचव्या वेतन आयोगानुसार देय असणारी रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी देण्यात आली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, वेतनश्रेणीत उचित सुधारणा करण्यासाठी मागणी करणारे दि.३ ऑक्टोबर २००० चे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाच्या उस्मानाबाद जिल्हा सचिवाने रजिस्टर्ड पोस्टाने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय;

(३) असल्यास, शिक्षण खात्याकडून पाचवी वेतनश्रेणी लागू करणेबाबत झालेला पक्षपात दूर करणेसंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय;

(४) नसल्यास, सदर प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** (१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.टिएसए-१०९९ /(१८८०)/व्याशि२, दिनांक १ जानेवारी २००० अन्वये अशासकीय अनुदानित तंत्रशिक्षण संस्थातील शिक्षक शिक्षकेतर पदाना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी दि.१ जानेवारी ९६ पासून लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार अ २ स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या अशासकीय अनुदानित संस्थेतील पूर्णवेळ निदेशकांना खालील वेतनश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे-

| | |
|---|---|
| रु.५०००-८००० | मूळ श्रेणी |
| रु.५५००-९००० | वरिष्ठ श्रेणी (१२ वर्षानंतर) |
| रु.६५००-१०५०० | निवडश्रेणी (२० टक्के पदाना) (२४ वर्षानंतर) |

(२) होय.

(३) अशासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील शिक्षक व तांत्रिक बहुदेशीय व्यावसायिक माध्यमिक शाळांतील शालेय सहशिक्षक पदास सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभागाने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार खर्चाच्या मंजुरीस विधानमंडळाची परवानगी घेऊन त्यानंतर आदेश निर्गमित करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

(३)

**किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतन श्रेणीत राहिलेल्या त्रुटी दूर करणेबाबत**

*पहिले अधिवेशन, २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
***शुक्रवार, १६ मार्च २००१***
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२४, क्रमांक ५, पृष्ठ ३६ - ३७*

(७१) *** ११९३२. सर्वश्री प.म.पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, नानासाहेब बोरस्ते :** तारांकित प्रश्न क्रमांक १९४८८ ला दिनांक ३० नोव्हेंबर २००० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम (एम.सी.व्ही.सी.) आणि द्विलक्षी अभ्यासक्रमासाठी नियुक्त निदेशकांना पाचव्या वेतन आयोगानुसार देय

असणारी रु. ५५००-९००० ही वेतनश्रेणी देण्यात आली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, वेतनश्रेणीत उचित सुधारणा करण्यासाठी मागणी करणारे दिनांक ३ ऑक्टोबर २००० चे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाच्या उस्मानाबाद जिल्हा सचिवाने रजिस्टर्ड पोस्टाने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय;

(३) असल्यास, शिक्षण खात्याकडून पाचवी वेतनश्रेणी लागू करणेबाबत झालेला पक्षपात दूर करणेसंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय?

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) नाही. निदेशकांना ५ व्या वेतन आयोगानुसार रु.५०००-८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) पाचव्या वेतन आयोगानुसार या निदेशकांना रु. ५०००-८००० ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. त्या ऐवजी रु.५५००-९००० ही सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत संबंधित निदेशक संघटनेने शासनाकडे मागणी केली होती. या मागणीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधीचा प्रस्ताव वेतन त्रुटी समितीला सादर केला होता. वेतन त्रुटी समितीचा अहवाल सध्या वित्त विभागाच्या विचाराधीन आहे.

(४) धोरणात्मक निर्णय असल्याने विलंब होत आहे.

******

## (४)
## व्हिलक्षी व एम.सी.व्ही.सी. शिक्षकांना सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी मिळण्याबाबतचे निवेदन

*दुसरे अधिवेशन, २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*सोमवार, २३ जुलै २००१*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक ६, पृष्ठ ४०*

**(३३) *** १६३९३ **सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, सुरेश पाटील, प.म.पाटील :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाशी समकक्ष समजल्या जाणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमातील (व्हिलक्षी व एम.सी.व्ही.सी.) शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाच्या ३ जून २००० च्या निर्णयाप्रमाणे त्रिस्तरीय सुधारित वेतनश्रेणी रु.७२२५-११०५०, ८०००-१३५००, ९१२५- १४०७५ मान्य न करता या वेतनश्रेणीपासून वंचित ठेवले याबाबतचे एक निवेदन विदर्भ व्होकेशनल कोर्स टिचर्स असोसिएशन (विदर्भ विभाग) यांनी मा.उच्च व तंत्रिशिक्षण मंत्री यांना दिनांक २२ जानेवारी २००१ रोजी किंवा त्या दरम्यान पाठविले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे;

(३) अद्याप कारवाई केलेली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) पूर्णवेळ शिक्षकांच्या सुधारित वेतनश्रेणीबाबत वित्त विभागाशी विचारविनिमय चालू आहे.

(३) धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.

******

## (५)
## किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या त्रुटी दुर करणेबाबत

*दुसरे अधिवेशन, २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*शुक्रवार,दिनांक ३ ऑगस्ट २००१*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली*
*सोमवार, दिनांक १६ जुलै २००१ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक (६) १६८७९*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५, पृष्ठ ५५*

(६) * **१६८७९** सर्वश्री विलास अवचट, विजय वडेट्टीवार, अरविंद सावंत, अनंत तरे, राजेंद्र पाटणी, सुरेश पाटील, प.म.पाटील,बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, नानासाहेब बोरस्ते : **तारांकित प्रश्न क्रमांक ११९३२ ला दिनांक १६ मार्च २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या त्रुटी दूर करणेबाबतचा वेतन त्रुटी समितीचा अहवाल वित्त विभागाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे;

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) अद्याप निर्णय घेतलेला नाही.

(३) धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.

******

## (६)
## किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या त्रुटी दूर करणेबाबत

*तिसरे अधिवेशन, २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*मंगळवार, ४ डिसेंबर २००१*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक २, पृष्ठ ४१*

**(५०) * १९०७७. सर्वश्री सुरेश पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे , नानासाहेब बोरस्ते, यशवंतराव गडाख, हुसेन दलवाई, नतिकोद्दीन खतीब, प्रतापराव सोनवणे, सुभाष देशमुख, सुभाष दापके :** ता.प्र.क्र. १६८७९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या त्रुटी दुर करणेबाबतच्या विचाराधिन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) अद्याप निर्णय झालेला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.

******

## (७)
## व्हिलक्षी व एम.सी.व्ही.सी. शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मिळण्याबाबत निवेदन

*तिसरे अधिवेशन, २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*मंगळवार, दिनांक ४ डिसेंबर २००१*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक २, पृष्ठ ४४ व ४५*

१९५१६ **सर्वश्री. बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, दिवाकर पांडे, श्रीमती. संजीवनी रायकर, सर्वश्री. सुरेश भालेराव, प्रतापराव सोनवणे :** ता.प्र.क्र. १६३९३ ला दि. २३ जुलै २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाशी समकक्ष समजल्या जाणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमातील (व्हिलक्षी व एम.सी.व्हि.सी.) शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाच्या ३ जून,२००० च्या निर्णयाप्रमाणे त्रिस्तरीय सुधारित वेतनश्रेणी रुपये ७२२५-११०५०, ८०००-१३५००, ९१२५-१४०७५ मान्य न करता या वेतनश्रेणीपासून वंचित ठेवणे, याबाबत विचाराधीन प्रश्नावर शासनाचा निर्णय झाला आहे हे खरे आहे काय ;

(२) असल्यास,शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.

******

(८)

*पहिले अधिवेशन, २००२ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*गुरुवार दिनांक १४ मार्च २००२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२७, क्रमांक २, पृष्ठ १५ ते २०*

**श्री.सुरेश पाटील** : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक २२२५६ आणि अनुक्रमांक १७ वरील तारांकित प्रश्न क्रमांक २२४५५ एकाच विषयाचे असल्यामुळे ते एकत्र घेण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : ठिक आहे. तारांकित प्रश्न क्रमांक २२२५६ आणि प्रश्न क्रमांक २२४५५ एकत्र घेण्यात येतील.

## व्दिलक्षी व एम.सी.व्ही.सी. शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी मिळण्याबाबत निवेदन

**(५) * २२२५६ श्रीमती संजीवनी रायकर, सर्वश्री. सुरेश भालेराव, दिवाकर पांडे, प्रतापराव सोनवणे, विजय गिरकर, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री. विलास अवचट, दिपक सावंत** : ता.प्र.क्र. १९५१६ ला दि. ४ डिसेंबर २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाशी समकक्ष समजल्या जाणाऱ्या व्यवसाय अभ्यासक्रमातील (व्दिलक्षी व एम.सी.व्हि.सी.) शिक्षकांना शालेय विभागाच्या ३ जून,२००० च्या निर्णयाप्रमाणे त्रिस्तरीय सुधारित वेतनश्रेणी रुपये ७२२५-११०५०, ८०००-१३५००, ९१२५-१४०७५ मान्य न करता या वेतनश्रेणीपासून वंचित ठेवणे याबाबत विचाराधीन प्रश्नावर शासनाचा निर्णय झाला आहे हे खरे आहे काय ;

(२) असल्यास,सदरहू प्रकरणी कोणता निर्णय घेतला आहे ;

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.

## किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या तुटी दूर करण्याबाबत.

**२२४५५ श्री.सुरेश पाटील, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, श्री.प.म.पाटील, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.प्रतापराव सोनवणे, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.विजय गिरकर, श्री.सुरेश भालेराव, श्री.अशोक मोडक, श्री.यशवंतराव गडाख, श्री.हुसेन दलवाई, श्री.गोविंदराव आदिक, श्री.विलास अवचट, श्री. दिपक सावंत** तारांकित प्रश्न क्रमांक १९०७७ ला दिनांक ४ डिसेंबर, २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय

१) किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या त्रुटी दूर करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे हे खरे आहे काय,

२) असल्यास याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे.

३) अद्याप निर्णय झालेला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.?

**श्री.रोहिदास पाटील, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता**

१) नाही.

२) प्रश्न उद्‌भवत नाही.

३) धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.

**श्रीमती संजीवनी रायकर** : सभापती महोदय, एम.सी.व्ही.सी. च्या शिक्षकाना सापत्नभावाने वागविण्यात येत आहे. त्यांना सुधारित वेतनश्रेणी मिळावी अशी त्यांची मागणी असून २० फेब्रुवारीपासून ते उपोषणाला बसले होते त्यावेळी शिक्षण मंत्री त्यांना भेटावयास आले नाहीत. ८ ते १३ च्या दरम्यान भेटावयास वेळ देऊ असे सांगण्यात आले होते. परंतु भेटीची वेळ दिली गेली नाही. आज सुद्धा माननीय मंत्रीमहोदय या ठिकाणी हजर नाहीत. या प्रश्नाला उत्तर देतांना असे सांगण्यात आलेले आहे की, 'धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.' हे उत्तर काही बरोबर नाही. शाससनाकडे पैसे नाहीत त्यामुळे यासंबंधी निर्णय घेतला जात नाही परंतु तशा प्रकारे स्पष्ट सांगण्यात येत नाही. बाकीच्या कामासाठी शासनाकडे पैसे आहेत परंतु या शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी देण्यासाठी मात्र पैसे नाहीत. तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की, एम.सी.व्ही.सी. च्या शिक्षकांना समकक्ष वेतनश्रेणी केव्हा देण्यात येणार आहे आणि त्यांच्या ज्या इतर मागण्या आहेत त्या केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे.

**श्री.रोहीदास पाटील:** सभापती महोदय, एम.सी.सी.व्ही.सी. आणि बायफोकल शिकविणाऱ्या शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी देण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे आपण वेतनश्रेणी देतो आणि पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयातील जो स्टाफ आहे त्या स्टाफला जी वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे, ती यांनासुद्धा लागू करावी अशा प्रकारचा त्यांचा आग्रह आहे. सर्व विभागांना अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतूद आणि यासाठी करावी लागणारी आणखी जादा तरतूद या सगळ्या गोष्टींचा विचार करुन ही बाब धोरणात्मक असल्याचे उत्तरात सांगण्यात आलेले आहे ही वस्तुस्थिती आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना जी वेतनश्रेणी लागू केलेली आहे ती एम.सी.व्ही.सी. आणि बायफोकलच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याकरता जादा अनुदान किंवा रक्कम उपलब्ध करुन द्यावी लागेल त्याकरता वेगवेगळ्या विभागाची मान्यता मिळविण्याची गरज आहे. शासनाकडे पैसे नाहीत असा आपण उल्लेख केला आहे. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. यासाठी नियोजन विभाग, वित्त विभाग यांची मान्यता घ्यावी लागणार नाही त्यामुळे ही बाब प्रलंबित आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी धोरणात्मक बाब असल्याने विलंब लागतो आहे असे म्हटले आहे. पण खरे म्हणजे शासनाने याच्या उलट निवेदन करण्याची गरज आहे. म्हणजे "या बाबत हायकोर्टाचा निर्णय झाला असल्यामुळे अजिबात विलंब लागण्याची गरज नाही." असे शासनाने म्हटले पाहिजे. अध्यक्ष महाराज, अधिक दोन स्तरावरील जनरल आणि टेक्निकल स्ट्रीम मधील जे लोक आहे त्यांच्याबाबतचा हा प्रश्न आहे आणि दुर्दैवाने टेक्निकल स्ट्रीमच्या लोकांना याचा लाभ मिळालेला नाही. नेहमी तो उशीरा मिळतो. त्यांना जी वेतनश्रेणी आहे ती यांनाही द्यायची असा निर्णय शासनाने घ्यावा यासाठी हे लोक न्यायालयात गेले असता हायकोर्टाने निर्णय दिला आहे की, अशा प्रकारचा भेदभाव शासनाला करता येणार नाही. **या संबंधात ५ एप्रिल, १९९४ रोजी** या सदनामध्ये झालेले प्रश्नोत्तरे मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यावेळी ता.प्र.क्र. ३५५४७ मध्ये असा प्रश्न विचारला होता की, **"इतर शिक्षक व व्यावसायीक शिक्षकांमध्ये असा भेदभाव करणे योग्य नाही अशी शिफारस न्यायमूर्ती श्री. एन.बी.नाईक यांच्या समानीकरण समितीने आपल्या अहवालात केली होती हे खरे आहे काय" त्याला मंत्री महोदयांनी 'होय' असे उत्तर दिले आहे. त्यावर तिसऱ्या प्रश्नामध्ये आम्ही असे विचारले होते की, "मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने दि. ४ मार्च, १९९३ रोजी रिट पिटीशन नं. १८८०/१९८७ या प्रकरणात असा भेदभाव संपुष्टात आणणारा निर्णय दिलेला आहे, हे खरे आहे काय? त्यालाही 'होय' असे उत्तर दिलेले आहे.** त्यावर चौथा प्रश्न असा विचारला आहे की, "हा भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी शासनाने काय कारवाई केलेली आहे.?" त्यावर उत्तर देतांना मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, "अधिक दोन स्तरावरील व्यवसाय शिक्षकांना द्विस्तरीय वेतनश्रेणी देण्याचे आदेश दिनांक २५ मार्च, १९९४ रोजी निर्गमीत केले आहेत." अध्यक्ष महाराज, आठ वर्षे झाली त्यावेळी या लोकांना न्याय मिळालेला नाही म्हणुन या लोकांना शेवटी कोर्टात जावे लागले. आता तुमचा धोरणाचा निर्णय झालेला आहे. हायकोर्टाने देखील निर्णय दिलेला आहे. म्हणुन माझा साधा प्रश्न आहे. मंत्रीमहोदय, हे मंत्रिमंडळातील जेष्ठ मंत्री आहेत. तेव्हा हायकोर्टाचा निर्णय होऊनही यामध्ये विलंब होत असेल तर सर्व विभागांना 'हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे शासन निर्णय काढणे तुम्हाला बंधनकारक आहे' असे आपण कळवाल काय?

**श्री.रोहिदास पाटील** : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख, यांनी अपेक्षा केल्याप्रमामे ज्या विभागांकडून विलंब होत आहे त्यांना निश्चितपणे तसे सांगण्यात येईल.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : अध्यक्ष महोदय, सन्माननीय जेष्ठ सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी येथे हायकोर्टाच्या निर्णयाच्या हवाला दिला आहे. पण मी दुसरा एक हवाला येथे देऊ इच्छितो. चार वर्षापूर्वी द्विस्तरीय वेतनश्रेणी मिळण्यासाठी ४२ दिवसांच्या संपावर गेले होते. त्यावेळी त्यापैकी एका वर्गाला जवळपास ४० हजार शिक्षकांना आपण न्याय दिला पण जो त्यातील छोटा वर्ग आहे, ५-७ हजार शिक्षक साऱ्या महाराष्ट्रात आहेत त्या व्यावसायीक शिक्षकांना मात्र त्यापासून वंचित ठेवले आहे. त्या ४२ दिवसांचा पगारही त्यांना आपण

दिलेला नाही. ते आता उपोषणाला बसले आहेत. अध्यक्ष महाराज, यामध्ये फार मोठा आर्थिक प्रश्न नाही. आतापर्यंतच्या चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगामध्ये या दोन्ही समान वर्गाला समान वेतनश्रेणी वाढवून दिली आहे ती यांनाही मिळाली पाहिजे, ही न्याय बाब आहे. तेव्हा महिना चार महिन्यामध्ये हा निर्णय होणे अत्यंत आवश्यक आहे. कोर्टाचा हवालासुद्धा याबाबत दिलेला आहे. तरी येत्या ३-४ महिन्यात याचा निर्णय घेतला जाईल काय

**श्री.रोहिदास पाटील :** अध्यक्ष महाराज, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना जी वेतनश्रेणी लागू केली आणि ज्यावेळेस त्यांनाही वेतनश्रेणी लागू करण्यात आली, त्याचवेळेस एमसीव्हीसीचे शिक्षक सुद्धा त्या संपामध्ये सामिल होते. एका बाजूला कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना एक वेतनश्रेणी लागू करण्यात आली आणि दुसऱ्या बाजूला त्यांचेबरोबर असलेल्या व्यावसायीक शिक्षकांना मात्र त्यातून वगळण्यात आले ही वस्तुस्थीती आहे. म्हणुन सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी हा जो प्रश्न उपस्थित केला आहे की यामध्ये वेगवेगळ्या विभागामध्ये निर्णय काढण्यास विलंब होते आहे तर तो विलंब निश्चितपणे कमी करुन यांना देखील समानीकरणाच्या न्याय भूमिकेतून न्याय भूमिका स्वीकारली पाहिजे हे आपण निश्चितपणे मान्य करु.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी म्हटले की, दोन विभाग वेगवेगळे आहेत. परंतु शेवटी मंत्रालय एकच आहे. तसेच माननीय उपमुख्यमंत्री यांच्या अधिपत्याखाली हे दोन्ही विभाग आहेत. त्यापैकी एका विभागाला न्याय आपण देता आणि एकाला देत नाही असे का? यासाठी ४२ दिवसांचा संप १९९८ मध्ये केला होता. तेव्हा येत्या दोन तीन महिन्यात आपण यावर पॉझिटिव निर्णय घेतो असे उत्तर आपणाकडून आले तर बरे होईल.

**श्री.रोहिदास पाटील :** लवकरात लवकर करु.

**श्री.प.म.पाटील :** सभापती महोदय, हा प्रश्न या ठिकाणी सहाव्यांदा आला आहे. आता दिलेल्या उत्तरामध्ये आणि सुरुवातीच्या उत्तरामध्ये किती विसंगती आहे, हे मी सभागृहाला सांगणार आहे. यापूर्वी दि. ३० नोव्हेंबर रोजी ता.प्र.क्र. १०४८८ विचारण्यात आला होता. त्यावेळी प्रश्न क्र. ३ ला असे उत्तर दिले आहे की, "अशासकीय तंत्र माध्यमिक शाळेतील शिक्षक व तांत्रिक बहुद्देशिय व्यावसायीक माध्यमिक शाळांतील शालेय सहशिक्षक पदास सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभागाने मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार खर्चाच्या मंजुरीस विधानमंडळाची परवानगी घेऊन त्यानंतर आदेश निर्गमीत करण्यात येतील. "त्यानंतर या बाबतचा प्रश्न दिनांक १६ मार्च, २००० रोजी विचारण्यात आला होता. त्यावेळी देखील प्रश्न क्र. ३ ला असे उत्तर देण्यात आले होते की, "या मागणीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधीचा प्रस्ताव वेतन त्रुटी समितीला सादर केला होता. वेतन त्रुटी समितीचा अहवाल सध्या वित्त विभागच्या विचाराधीन आहे." एका प्रश्नाला उत्तर देत असतांना असे सांगण्यात आले आहे की, वित्त विभागाने यास मंजुरी

---

**प्रा.बी.टी.देशमुख,** दिनांक :८.३.२००३
विधानपरिषद सदस्य, NO. HIND/LC/20
३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालयाजवळ, **अमरावती.**

प्रति,
**मा. कुलगुरू,** अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय :-** डॉ.पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राच्या कामास शुभेच्छा.

मा. महोदय,
स.न.वि.वि.

दिनांक ४ मार्च २००३ रोजी अमरावती विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाच्या वेळी आपण केलेल्या भाषणामधील "विदर्भाच्या आर्थिक समस्या व अडचणी यांचे अध्ययन करणारे तसेच येथील आर्थिक विकासाला चालना देणारे 'डॉ.पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्र' नुकतेच विद्यापीठाने स्थापन केले आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या व दुर्लक्षित असलेल्या विदर्भाच्या आर्थिक प्रश्नांचा व अनुशेषाचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना करण्यासाठी या अध्ययनकेंद्राची निकड महत्वाची ठरते. जेणेकरून विकासाच्या समान संधी प्राप्त होतील व उपलब्ध साधनांचा विवेकपूर्ण वापर करता येईल" हा उल्लेख वाचून अतिशय आनंद वाटला.

२. डॉ. संजय कप्तान व डॉ. किशोर अढावू या दोन विभाग प्रमुखांनी त्यापूर्वी माझी भेट घेऊन विद्यापीठाच्या कुलसचिवांनी दिनांक २८.२.२००३ च्या पत्रान्वये मा. अध्यक्ष, विदर्भ वैधानिक विकास मंडळ यांचेकडे पाठविलेल्या याबाबतच्या प्रस्तावाची एक प्रत माझेकडे सोपविली होती. त्या मंडळाकडून याकामासाठी काही आर्थिक मदत विद्यापीठाला व्हावी अशी त्या प्रस्तावात विनंती असून या कामात मी पाठपुरावा करावा अशी विनंतीही या दोन विभाग प्रमुखांनी मला प्रत्यक्ष भेटून केली होती. या प्रस्तावाचा सर्व स्तरावर पाठपुरावा करण्यात मला निश्चितच आनंद वाटेल.

३. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सर्व भागांचा समतोल विकास झालेला नाही ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. प्रादेशिक असमतोलाचा सर्वात मोठा फटका विदर्भाला बसला असून त्यातल्यात्यात अमरावती विद्यापीठाच्या क्षेत्राखालील अमरावती महसूल विभागाला अशा असमतोलाने जबरदस्त जखमी केलेले आहे.

४. अनुशेष आणि निर्देशांक समितीच्या अहवालाच्या परिच्छेद १२.१३ मध्ये सर्व विकास क्षेत्रात मागे असलेल्या १७ जिल्ह्यांचा एकूण अनुशेष रुपयात, ११६२४.१९ कोटी रुपये दर्शविला असून त्या सतरामध्ये अमरावती जिल्ह्याचा अनुशेष १३६१.५४ कोटी रुपये, अकोला जिल्ह्याचा १२७२.४६ कोटी रुपये, यवतमाळ जिल्ह्याचा १२१०.०७ कोटी रुपये व बुलढाणा जिल्ह्याचा १०८१.१८ कोटी रुपये दर्शविला आहे. या सतरा जिल्ह्यामध्ये एक हजार कोटी रुपयाच्या वर अनुशेष असलेल्या जिल्ह्यांची एकूण संख्या चार असून वर नमूद केलेले ते चारही जिल्हे अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील आहेत. एक हजार कोटी रुपयाच्या वर अनुशेष असलेला महाराष्ट्रात या चारहून वेगळा अन्य दुसरा कोणताही जिल्हा नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे.

५. प्रादेशिक असमतोलाबाबत वैचारिक चिंतन, मनन करण्यासाठीच्या संस्थात्मक व्यवस्थेची महाराष्ट्रातील इतर कोणत्याही भागापेक्षा विदर्भाला तिव्र आवश्यकता आहे. त्यातल्या त्यात अमरावती महसूली विभाग तर अशा अनुशेषाने महत्तम बेजार झालेला विभाग आहे. रविवार, दिनांक १७ मे १९९८ रोजी दुपारी २.३० वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति वैद्यकिय महाविद्यालयाच्या श्रीमती विमलाताई देशमुख सभागृहात "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष 'क्ष' किरण परीक्षा" या मी लिहिलेल्या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी मुख्य पाहूणे म्हणून भाषण करतांना तत्कालीन मा. कुलगुरुंनी अशा प्रकारचे अभ्यासकेंद्र अमरावती विद्यापीठांतर्गत सुरु करण्याची घोषणा आपल्या भाषणामध्ये केली होती. परंतु प्रत्यक्षात त्यानंतरच्या काळात याबाबत काही प्रगती झाल्याचे दिसून आले नाही. मी स्वतः अमरावती विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळामध्ये असतांना आपणच स्वतः ही बाब पुढे रेटावी हे मला त्यावेळी योग्य वाटले नाही.

६. अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिनांक ५ डिसेंबर २००२ रोजी विषय क्रमांक ४७१ अनुसार अमरावती विद्यापीठांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्र स्थापनेबाबतचा एक तपशीलवार प्रस्ताव संम्मत केल्याचे वाचून आनंद वाटला. व्यवस्थापन परिषदेला त्याबद्दल मनापासून धन्यवाद देणे मला अगत्याचे वाटते.

७. विदर्भ वैधानिक विकास मंडळाने या कामी मदत करावी यासाठी प्रयत्न करण्यात मला निश्चितच आनंद वाटेल. पण अनुशेष समस्येने ग्रासलेल्या या भागामध्ये विद्यापीठांतर्गत या समस्येच्या अध्ययन व नियमनासाठी सुरु होत असलेले हे केंद्र सशक्त व मजबूत व्हावे यासाठी सर्वांनीच मदत करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

८. १६२ वर्षाची परंपरा असलेल्या नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाने सुरू केलेल्या कै. माधवराव लिमये स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या पहिल्या "कार्यक्षम आमदार" पुरस्कारासाठी यावर्षी माझी निवड झालेली आहे, याची आपणास माहिती आहेच. ५० हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून दिनांक ८ फेब्रुवारी २००३ रोजी नाशिक येथे समारंभपूर्वक हा पुरस्कार मला प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थ मिळालेल्या रोख रकमेपैकी दहा हजार (रुपये १०,०००) रुपयांचा निधी उपरोक्त कामासाठी विद्यापीठाच्या सुपूर्द करण्याचा निर्णय मी घेतलेला आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने माझ्या विनंतीचा स्वीकार करावा अशी विनंती आहे.

आपला स्नेहांकित,
**(बी.टी.देशमुख)**
अध्यक्ष 'नुटा' व विधानपरिषद सदस्य

**सहपत्र :** सोबत स्टेट बँक ऑफ ईंडियाचा दिनांक ०८.०३.२००३ रोजीचा रेखांकित धनादेश क्रमांक ४८४९५० जोडलेला आहे.

******

दिली आहे. आणि दुसऱ्या वेळी असे सांगण्यात आले आहे की, हा अहवाल वित्त विभागाच्या विचाराधीन आहे. आता याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी तिव्र बुद्धीची गरज आहे. या ठिकाणी मतीमंद असे अधिकारी नसावेत. याबाबत धोरणात्मक निर्णय लवकरात लवकर घेतला जावा. अशी माझी विनंती आहे.

**श्री.रोहिदास पाटील** : होय, सभापती महोदय.

**श्रीमती संजीवनी रायकर** : सभापती महोदय, या ठिकाणी ज्या ज्या त्रुटी आहेत, त्या सर्व वित्त विभागाकडे पडून आहेत. या ठिकाणी धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे या ठिकाणी असलेल्या त्रुटींची पुर्तता वित्त विभाग केव्हा करणार आहे?

**श्री.रोहिदास पाटील :** हे लवकरात लवकर करु.

**श्री.प्रकाश जावडेकर** : सभापती महोदय, या ठिकाणी योग्य प्रकारची उत्तरे मा.मंत्रिमहोदय देत नाही. याबाबतचा निर्णय अगोदरच झालेला आहे. असे असतांनाही याबाबत शासन काहीच करीत नाही. धोरणात्मक बाबीची सबब शासन पुढे करीत आहे.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, या विषयावर हायकोर्टाने निर्णय दिला आहे. हा निर्णय अतिशय स्वयंस्पष्ट आहे. तसेच हा निर्णय शासनावर बंधनकारक आहे. खरे म्हणजे हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. नाही तर ती बाब कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होईल, आता मा.मंत्रिमहोदय असे सांगत आहेत की, हे लवकरात लवकर करु. यासाठी आम्हाला आता मा.सभापती महोदयांकडे संरक्षण मिळाले पाहिजे. हा प्रश्न या सदनात सहा वेळा विचारण्यात आला आहे. आता शासनाची जी अनेक खाती आहेत त्याबाबत शासनाचा तो अंतरर्गत प्रश्न आहे. आता या बाबत हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर आणि तो निर्णय शासनावर बंधनकारक असतांनाही या बाबतची कोणतीही कार्यवाही शासन करीत नाही. न्याय व्यवस्थेने या बाबतचा दिलेला निर्णय आणि या सभागृहात उपस्थित केलेली चर्चा यावर सरकारने कारवाई करण्याची गरज आहे. असे असतांनाही हे शासन काहीच करीत नाही. म्हणुन या बाबत निश्चित कालावधीत शासनाने निर्णय घ्यावा आणि त्या बाबतचे निवेदन या सभागृहात शासनाने करावे, असे आदेश मा.सभापती महोदयांनी द्यावेत अशी माझी विनंती आहे.

**श्री.रोहीदास पाटील** : सभापती महोदय, या संदर्भात एक सारखेच प्रश्न या ठिकाणी विचारण्यात आल्यामुळे मी तसे उत्तर दिले आहे.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार या बाबतची कारवाई शासन करीत आहे. समानीकरणाचे तत्व लागू करण्याबाबत शासनाने कारवाई सुरु केली आहे. या बाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. म्हणुन जितके लवकर होईल, तितक्या लवकर हे काम पूर्ण करण्यात येईल. आता याला महिन्याची अट कशाला हवी? यापूर्वी म्हणजे लवकरात लवकर हे काम करण्यात येईल.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, या सभागृहामध्ये चर्चेद्वारे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही आलो आहोत. हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या बाबतीत अंमलबजावणी न करणे बरोबर नाही. हा कंटेम्प ऑफ कोर्ट आहे हे मंत्रिमहोदयांनी लक्षात घ्यावे. आपण लवकरात लवकर म्हणत आहात याबाबत विचार करण्याचा सरकारला अधिकार नाही. You are supposed to implement the decision of the High Court. चेंडू टोलविल्यासारखे सभागृहामध्ये आपण ऊत्तर देत आहात हे बरोबर नाही. याबाबतीत न्यायालयाच्या जो निर्णय येईल तो तत्वतः आपण मान्य केला आहे. परंतु लवकरात लवकरचा अर्थ आमच्या मते हा पुढील अधिवेशनात देखील येत नाही. लवकरात लवकर या शब्दाची व्याख्या विधीमंडळामध्ये केलेली नाही. त्याचा निर्णय दोन ते तीन वर्ष होत नाही. तेव्हा या सभागृहाच्या आणि आमच्या अधिकाराचे रक्षण करण्याची आपली जबाबदारी आहे. याबाबतीत १५ दिवसाच्या आत आपण आदेश निर्गमीत करा असे आपण आदेश दिले पाहिजेत. याठिकाणी सरकारची करण्याची आणि सांगण्याची भाषा वेगळी आहे. निर्णय टाळण्याचा प्रयत्न करणे हे न्यायदानाच्या आणि लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. याबाबतीत आपण आम्हाला संरक्षण द्यावे, अशी माझी विनंती आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे सांगितले आहे. त्याबाबतीत मी शासनाचे स्पेसिफिक उत्तर याठिकाणी यापूर्वी वाचून दाखविले आहे. हे उत्तर फक्त एकाच शब्दामध्ये आहे. प्रश्न होता **"मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक ४ मार्च,१९९३ रोजी रिटपीटीशन नं. १८८०/१९८७ या प्रकरणात असा भेदभाव संपुष्टात आणणारा निर्णय दिलेला आहे. हे खरे आहे काय?" त्याला "होय" असे उत्तर दिले आहे.** त्यामुळे त्यावेळी हा पॅरिटीचा जी.आर.२५.३.१९९४ ला काढला. प्रश्न हायकोर्टाच्या निर्णयाचा आहे त्याकरिता या विभागाला इतका वेळ लागणे बरोबर नाही. तेव्हा हायकोर्टाच्या निर्णयाच्या बाबतीत आपण काय निर्णय घेतला एवढे तरी सभागृहापुढे ठेवले पाहिजे. त्यासाठी आपण १५ दिवस घ्या. आणि मंत्रिमहोदय जर याबाबतीत काही सांगत नसतील तर आपण यावर निर्णय दिला पाहिजे.

**सभापती** : या संदर्भात उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे त्या निर्णयाच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय केला आहे?

**श्री.रोहीदास पाटील** : सन्माननीय सभापती महोदय, उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे. तो निर्णय समानीकरणावर आणणे आवश्यक आहे. आणि म्हणुन याठिकाणी किती महिन्यात निर्णय घेणार असे सारखे विचारले जात आहे. याबाबत सांगावेसे वाटते की, याबाबत तातडीने निर्णय करणे गरजेचे आहे. आणि म्हणुन तातडीने जितक्या लवकर ...

**श्री.नितीन गडकरी** : उच्च न्यायालयाचा निर्णय किती तारखेला झाला आहे?

**श्री.रोहीदास पाटील** : सभापती महोदय, मा.विरोधी पक्षनेते माझे उत्तर पूर्ण होवू देत नाहीत. मी मघाशी म्हटले होते की, उच्च न्यायालयाने जो निकाल दिला आहे त्यामध्ये जी वेतनश्रेणी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकवृंदाना लागू केली आहे. ती लागू करण्याच्या बाबतीत उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात अजून निर्णय झाला नाही. तो ताबडतोब करावा अशाप्रकारचा आग्रह आहे. मी याठिकाणी सांगू इच्छितो की ....

**सभापती** : मंत्रिमहोदय, लवकरात लवकर वरुन आता ताबडतोब वर आले आहेत.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. आपण याठिकाणी पिठासीन अधिकारी आहात. मुंबई उच्च न्यायलयाने दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार किती दिवसाच्या आत आपुण निर्णय केला पाहिजे. याबाबत आपण माहिती दिली पाहिजे. दुसरे असे की, उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आपल्याला मान्य आहे त्याबाबत लवकरात लवकर आपण निर्णय घेणार आहोत असे मंत्रिमहोदय सांगत आहेत. मी जबाबदारीने सरकारवर आरोप करतो की, उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर ताबडतोब आपण त्यासंबंधीचे आदेश काढणार आहात काय? कारण उच्च न्यायालयाच्या निर्णय तपासण्याचा अधिकार आपल्याला नाही. सरकारी अधिकाऱ्यांनाही नाही, आपल्या विभागाचे डेक्स ऑफिसर त्यांचे ॲनालिसीस करु शकत नाही. उच्च न्यायालयाचा निर्णय हा त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकरता एक आदेश आहे आणि तो त्यांच्यावर बंधनकारक आहे. पण त्यावर अजून निर्णय होत नाही. याचा अर्थ म्हणजे मी अतिशय जबाबदारीने सांगतो की, हा निर्णय घेण्यामध्ये शासन टाळाटाळ करीत आहे. म्हणुन आम्ही सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित केल्यावर ताबडतोब म्हणावयाचे, लवकरात लवकर म्हणावयाचे, तत्वतः मान्य आहे. असे म्हणावयाचे आणि प्रश्नाला बगल द्यावयाची आणि वेळ संपल्यावर निघून जावयाचे हे लोकशाहीच्या तत्वाशी सुसंगत नाही. मग आम्ही पुन्हा दुसऱ्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित करावयाचा असे होत आहे. अशी परिस्थिती निर्माण होत असल्याने आम्हाला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. न्यायालयाने याबाबतीत निर्णय दिला आहे. त्यामुळे त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने १५ दिवसांमध्ये निर्णय झाला पाहिजे. त्यामध्ये न्यायालयाचा सन्मान आहे, या सभागृहाचा सन्मान आहे आणि ज्यांच्यावर अन्याय झाला आहे त्यांनाही न्याय मिळणार आहे.

**श्री.हुसेन दलवाई** : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.नितीन गडकरी यांनी उपस्थित केलेला प्रश्न अगदी बरोबर आहे. उच्च न्यायालयाचा निर्णय बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे अत्युच्च न्यायालयाने दिलेला निर्णयही बंधनकारक असतो. उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा मान राखला पाहिजे ही त्यांची भूमिका मला मान्य आहे.

(काही सन्माननीय सदस्य बोलतात)

**सभापती** : आपल्या समोरील प्रश्न उच्च न्यायालयापूरताच आहे. आपण अत्युच्च न्यायालयापर्यंत पोहोचलेलो नाही. म्हणून मी शासनास असा निर्देश देत आहे की, **उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याची अंमलबजावणी तातडीने होणे आवश्यक आहे. पण ती झाली नाही हे ठीक आहे. पण आता हे अधिवेशन संपण्याच्या आत या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.**

******

(९)

## राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी सुरु केलेले धरणे आंदोलन व उपोषण

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००२*
*मंगळवार, १७ डिसेंबर २००२*

**श्रीमती संजीवनी रायकर, श्री.अशोक मोडक, व श्री.सुरेश भालेराव** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर, श्री.अशोक मोडक व श्री.सुरेश भालेराव यांनी 'राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी सुरु केलेले धरणे आंदोलन व उपोषण' याबाबत नियम ९३ अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

'ज्याअर्थी + २ स्तरावर सुरु असलेल्या व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाकडील शिक्षक निदेशक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेगवेगळ्या न्याय मागण्यांची पूर्तता होण्यासाठी दि.२०.२.२००२ व ५.९.२००२ रोजी आझाद मैदान मुंबई येथे धरणे आंदोलन केले होते, आणि

ज्याअर्थी, दि.१९ व २० मार्च, २३ मार्च, २००२ रोजी मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्यावरील संघटनेने केलेली चर्चा, विधान परिषदेत वेळोवेळी झालेली चर्चा व चर्चेच्या वेळी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी दिलेली आश्वासन आणि,

ज्याअर्थी, गेल्या १०-११ महिन्यात संघटनेने सादर केलेल्या पूर्णवेळ निदेशकांची वेतन श्रेणी ५०००-१५०-८००० च्या ऐवजी ५५००-१७५-९००० व इतर वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी व इतर ५ मागण्यांबाबत पूर्तता न होणे, आणि

ज्याअर्थी, त्यामुळे दिनांक १२.१२.२००२ रोजी पासून महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघाने धरणे आंदोलन व उपोषण सुरु करणे, आणि

ज्याअर्थी, शासनाने तातडीने कारवाई करुन ६ प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता.

त्याअर्थी, या गंभीर विषयाबाबत सभागृह तीव्र चिंता व्यक्त करते.'

### निवेदन

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघाने सादर केलेल्या मागण्यांपैकी दि.१९ मार्च २००२ व दि.२३ मार्च २००२ रोजीच्या चर्चेत विभागाने निम्न मागण्यांच्या संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे मान्य करुन उर्वरित मागण्या मान्य करणे शक्य नसल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणले होते व संबंधित संघटनेने यास सहमती दर्शविली होती.

१) ५ व्या वेतन आयोगात पूर्णवेळ निदेशक या पदास निम्न दर्जाची वेतनश्रेणी लागू केल्याने त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या निराकरणासाठी रु.५,५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी देवून तद्नुषंगाने त्रिस्तरीय वेतनश्रेणी देण्यात यावी.

२) व्यवसाय शिक्षण सेवेतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नतीच्या योजनेमुळे देय वेतनश्रेण्या तातडीने लागू करण्याबाबत.

३) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांप्रमाणे व्यवसाय शिक्षणाकडील पूर्णवेळ शिक्षकांना त्रिस्तरीय वेतनश्रेण्या लागू करण्याबाबत.

४) संघात सहभागी कर्मचाऱ्यांना संपकालीन वेतन त्वरीत मिळणेबाबत.

५) वरिष्ठ वेतनश्रेणी देताना विना अनुदानित संस्थातील सेवा ग्राह्य धरण्याबाबत. उपरोक्त निर्देशित मागण्याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक असल्याने अनुक्रमांक १ ते ४ च्या संदर्भात आवश्यक प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त मागणी क्रमांक ५ च्या संदर्भात नमूद करण्यात येते की, शासनाच्या इतर विभागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतही वरिष्ठ श्रेणी देतांना विना अनुदानीत संस्थातील सेवा ग्राह्य धरत नसल्याने फक्त व्यवसाय शिक्षणाशी संबंधित कर्मचाऱ्यांबाबत असा निर्णय घेणे योग्य होणार नाही.

**श्रीमती संजीवनी रायकर :** अध्यक्ष महाराज, + २ स्तरावरील व्यवसाय शिक्षण म्हणजे ११ वी १२ वी च्या शिक्षणासाठी ज्या सुविधा आहेत त्या सगळ्या व्यवसाय शिक्षणाच्या लोकांनासुध्दा दिल्या पाहिजेत. परंतु शासन त्यामध्ये दुजाभाव करते आहे. या संदर्भात दिनांक १९ व २३ रोजी जी चर्चा झाली त्यावेळी माननीय वित्त मंत्री आणि शिक्षण मंत्री तसेच शिक्षक संघटनेचे पदाधिकारी आणि मी स्वतः उपस्थित होते. त्यावेळी माननीय वित्त मंत्र्यांनी म्हटले होते की, या मागण्या अजूनही व्यवसाय शिक्षणाच्या कर्मचाऱ्यांना का दिल्या नाहीत? खरे तर ११ वी १२ वी च्या शिक्षकांना जे मिळते त्याप्रमाणे या शिक्षकांनाही दिले पाहीजे. तेव्हा याबाबत निवेदन म्हणजे माहिती द्यावी. त्याप्रमाणे त्यांनी माहीती मागविली होती. नंतर कॅबिनेट पुढे हा विषय आलेला होता आणि आता पुन्हा आपण हा विषय कॅबिनेट समोर आणावयाचे म्हणत आहात. तेव्हा मला असे म्हणावयाचे आहे की, जी वेतनश्रेणी तुम्ही ज्युनिअर कॉलजेच्या शिक्षकांना दिली ती या व्यवसाय शिक्षणाच्या शिक्षकांना दिलेली नाही. या व्यवसाय शिक्षण कर्मचाऱ्यांना तुम्ही कालबध्द पदोन्नती देखील दिलेली नाही. वरिष्ठ वेतनश्रेणी देखील त्या शिक्षकाप्रमाणे यांना दिलेली नाही. संपामध्ये यांच्याप्रमाणेच इतरही मंडळी सामील होती, पण इतरांना आपण दिले, मात्र यांना दिलेले नाही...

**सभापती :** माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

**श्रीमती संजिवनी रायकर :** सभापती महोदय, मी या ठिकाणी फक्त वस्तुस्थिती सांगत आहे. या बाबतीत आता हायकोर्टाने निर्णय दिला आहे. सर्वांना ही वेतनश्रेणी लागू झाली पाहिजे. या बाबत शासनाने जी.आर.काढला पाहिजे. आता माननीय मंत्रिमहोदय यासाठी कॅबिनेटसमोर जाणार आहे. माझे असे म्हणणे आहे की, कॅबिनेटसमोर न जाता देखील आपणाला या शिक्षकांच्या बाबतीत जी.आर. काढता येईल. तसा जी.आर.काढून हा प्रश्न आपण केव्हा सोडविणार आहात?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्यांनी पाच मागण्या या ठिकाणी मांडलेल्या आहेत. हा वित्तीय भाराचा प्रश्न आहे. जोपर्यन्त मंत्रिमंडळाचा या बाबतीत निर्णय होत नाही, तोपर्यन्त ही मागणी पूर्ण करणे शक्य होणार नाही. कालही मी एका तारांकित प्रश्नाच्या संदर्भात झालेल्या ३५ मिनिटाच्या चर्चेत या बाबत खुलासा केला आहे. माननीय सदस्यांची मागणी अशी आहे की, एनसीआरटीसीचा पॅटर्न या ठिकाणी स्वीकारण्यात आला पाहिजे. परंतु तो पॅटर्न या ठिकाणी काही स्वीकारता येणार नाही. ही स्पष्ट भूमिका या विभागाने तसेच शासनाने संबंधितांना कळविले आहे. निदेशक आणि शिक्षक यांच्यामध्ये पाचवा वेतन आयोग लागू करताना हा फरक राहिला आहे. आमच्या विभागाने या बाबतीत स्पष्ट भूमिका घेतली आहे. एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला दुसरा न्याय, असे होऊ नये. या बाबत अशा प्रकारची विभागाची भूमिका स्पष्ट आहे. म्हणून या बाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतरच या बाबतचा योग्य तो निर्णय होईल. तसा निर्णय त्यानंतरच घेता येईल. सभापती महोदय, वरिष्ठ वेतनश्रेणी देत असताना विना अनुदान संस्थेतील सेवा ज्येष्ठता धरण्यात यावी. अशी देखील दुसरी मागणी आहे. सभापती महोदय, या बाबतचा निर्णय अजून झालेला नाही. आता या बाबतचा एकत्रितपणाने विचार करता येईल आणि त्यानंतर त्यावर सांगता येईल... (अडथळा) ... या बाबत आता मुळ विभागाने निर्णय घ्यावयाचा आहे. वेतनश्रेणीच्या संदर्भात विभागाने ते मान्य केले आहे. त्याप्रमाणे दोन मंत्रिमंडळासमोर ही बाब ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मला या ठिकाणी स्पष्टपणाने असे सांगावयाचे आहे की, जोपर्यन्त या बाबतचा निर्णय मंत्रिमंडळ घेत नाही, तोपर्यन्त या बाबत काही करता येणे अशक्य होणार आहे.

**डॉ.अशोक मोडक :** सभापती महोदय, फेब्रुवारीमध्ये या बाबतचे आंदोलन झाले होते. त्याप्रमाणे या बाबतची मागणी मार्च महिन्यात मान्य करण्यात आली आहे. परंतु या बाबतचा प्रस्ताव अजून मंत्रिमंडळासमोर नेण्यात आला नाही. या बाबत हायकोर्टाने निर्णय दिला आहे. असे असतानाही कोणतीही कार्यवाही आपणाकडून होत नाही. अशा परिस्थितीत माननीय मंत्रिमहोदयांच्या वक्तव्यावर

कोणी विश्वास ठेवावा. या ठिकाणी नुसत्या वाटाणाच्या अक्षता लावल्या जात आहेत. या ठिकाणी ज्या पाच मागण्या करण्यात आल्या आहेत, त्यातील चार मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. आता प्रत्यक्षात त्यांचे काय होईल, हे परमेश्वराला माहिती आहे. मला या ठिकाणी हा प्रश्न विचारावयाचा आहे की, आपणाला या ठिकाणी १० वर्षाचा कालावधी का लागला आहे? आता या ठिकाणी सुध्दा शिक्षकांनी आत्महत्या करावयाची काय? सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, यामध्ये सर्वात महत्वाचे कारण आर्थिक अडचण ही आहे. ही आर्थिक अडचण सुटल्याबरोबरच या बाबत निर्णय लागेल.

(गोंधळ)

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आता या ज्युनियर कॉलेजमधील शिक्षकांनी दर १० वर्षानी हायकोर्टातच गेले पाहिजे काय? सभापती महोदय, १० वर्षापूर्वी जस्टीस नाईक यांच्या इक्वीवॅलन्स कमिटीसमोर समानीकरण समितीसमोर हे शिक्षक गेले होते. जस्टीस नाईक यांनी जो निर्णय दिला होता. तो त्यांच्या अहवालाच्या पान क्र.२२ वर आहे त्यात असे म्हटले आहे की, "We understand that this improvement was not extended to the Vocational teachers even though they satisfied the prescribed qualifications. We are of the view that this differentiation is not justified and we recommend that both the categories should get the revised pay scale of Rs.1640-2900."

त्यानंतरही न केल्यामुळे ते लोक हायकोर्टामध्ये गेले. आणि हायकोर्टामध्ये गेल्यानंतर हायकोर्टाचा ४ मार्च १९९३ रोजी निर्णय झाला. 1880 of 1987 या याचिकेवरील त्या निर्णयामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, या दोहोंमध्ये भेदभाव करणे चुकीचे आहे. तो निर्णय असा की, "In view of the above report of the equivalence committee it is difficult for the learned counsel for the State to justify the action of the Government in fixing lower pay scale to the teachers in the vocational courses' त्या निर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये 'In the result the instant petition must succeed' असे म्हटले आहे. हायकोर्टाने दिलेला निर्णय त्यावेळी आम्ही तो आपल्याला सांगितला. त्यावेळी माननीय श्री.दिलीप वळसे पाटील हे सभागृहामध्ये नव्हते. त्यांच्यावतीने त्यावेळी मा.श्री.रोहीदास पाटील हे कॅबिनेट मंत्री म्हणून सभागृहामध्ये उत्तर देत होते. माननीय श्री.रोहीदास पाटील यांनी ता.प्र.क्र.२२४५५ ला उत्तर देतांना १४ मार्च २००२ रोजी सभागृहामध्ये असे सांगितले होते की, "कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना जी वेतनश्रेणी लागू केली आहे ती एम.सी.व्ही.सी. आणि बायफोकलच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याकरिता जादा अनुदान किंवा रक्कम उपलब्ध करुन द्यावी लागेल त्याकरिता वेगवेगळ्या विभागाची मान्यता मिळविण्याची गरज आहे. शासनाकडे पैसे नाहीत असा आपण उल्लेख केला आहे परंतु तशी वस्तुस्थिती नाही. यासाठी नियोजन विभाग, वित्त विभाग यांची मान्यता घ्यावी लागणार आहे त्यामुळे ही बाब प्रलंबित आहे." तेव्हा सभागृहामध्ये कॅबिनेट मिनिस्टर मा.श्री.रोहिदास पाटील "वस्तुस्थिती नाही" असे सांगत होते. आपण सभागृहामध्ये गैरहजर असतांना माननीय सभापतींची परवानगी घेवून आपल्या वतीने, आपल्या डिपार्टमेंटच्या वतीने त्यांनी उत्तर दिले आहे. १४ मार्च २००२ रोजी त्यांनी पुढे असेही सांगितले की, "एका बाजूला कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना एक वेतनश्रेणी लागू करण्यात आली आणि दुसऱ्या बाजूला त्यांचेबरोबर असलेल्या व्यावसायिक शिक्षकांना मात्र त्यातून वगळण्यात आले ही वस्तुस्थिती आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी हा जो प्रश्न उपस्थित केला आहे की यामध्ये वेगवेगळ्या विभागामध्ये निर्णय काढण्यास विलंब निश्चितपणे कमी करुन यांना देखील समानीकरणाच्या न्याय्य भूमिकेतून न्याय्य भूमिका स्वीकारली पाहिजे हे आपण निश्चितपणे मान्य करू." अशाप्रकारे त्यांनी शासनाच्या वतीने उत्तर दिले. त्यानंतर मा.विरोधी पक्षनेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनी असे म्हटले की, "उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार या बाबतची कारवाई शासन करीत आहे. समानीकरणाचे तत्व लागू करण्याबाबत शासनाने कारवाई सुरु केली आहे. या बाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. म्हणून जितके लवकर होईल, तितक्या लवकर हे काम पूर्ण करण्यात येईल." त्यावेळी आमच्यापैकी कुणीतरी म्हणाले की, एक महिन्यात करा. त्यावेळी माननीय श्री.रोहिदास पाटील म्हणाले की, "आता याला महिन्याची अट कशाला हवी? त्यापूर्वी म्हणजे लवकरात लवकरच हे काम करण्यात येईल."

सभापती महोदय, या विलंबाला चार-पाच वर्षे होवून गेली आहेत हे बरोबर नाही, या शिक्षकांच्या मनावर काय आघात होत असेल? त्यांनी दर १० वर्षानी हायकोर्टामध्ये जावे असे जर आपण म्हणत असाल तर ते योग्य नाही. हा विषय आपण कॅबिनेटसमोर ठेवा. हायकोर्टाने दिलेला निर्णय असल्यामुळे आपल्याला कदाचित कॅबिनेटपुढे जावून त्याबाबतचा निर्णय टाईम बाऊंड कालावधीत केला पाहिजे, अनेक वर्षे हा विषय पडून आहे, आपण मागच्या वेळी सुध्दा आदेश दिले होते. तेव्हा आपण यासंबंधीचा निर्णय घेवून सभागृहासमोर आले पाहिजे तसे याल काय?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** दोन वेगवेगळ्या सेक्शनमधील शिक्षकांना जी काही समानीकरण तत्वाप्रमाणे वेतनश्रेणी मिळाली पाहीजे त्यामध्ये डिस्पॅरिटी निर्माण झाली आहे ती दूर करण्यासाठी या विभागाला ती भूमिका मान्य नाही असे नाही. मी अनेक वेळा सांगितले आहे की, ही भूमिका आम्हाला मान्य आहे. परंतु आज राज्यामध्ये आर्थिक अडचणीमुळे निर्णय घ्यायला विलंब होत आहे. त्यासाठी एक दोन वेळा कॅबिनेटसमोर हा विषय घेवून गेलो व त्याबाबत कॅबिनेटचा व्हयू घेतला. बाकीचे अन्य प्रश्न प्रॉयॉरिटीचे असले तरी हा विषय देखील प्रायॉरिटीचा आहे. परंतु याबाबत जनरल इंस्ट्रक्शन देण्यात आल्या आहेत की, पगारवाढ आणि वेतनश्रेणीच्या संदर्भात आर्थिक बर्डन असल्यामुळे त्याबाबत थोडा विचार करावा. माननीय सदस्य ज्या हायकोर्टाच्या जज्जमेंटचा उल्लेख करीत आहेत, ते हायकोर्टाचे जज्जमेंटसुध्दा याबाबत विचार करतांना निश्चितपणे विचारात घेवून निर्णय केला जाईल.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, एम.सी.व्ही.सी.आणि बायफोकलच्या प्राध्यापकांच्या बाबतीत प्रश्न विचारला आहे. या प्राध्यापकांनी ४२ दिवसांचा संप केला होता. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक, बायफोकलच्या प्राध्यापकांनी संप केला होता. ३ जून २००० रोजी शालेय शिक्षण विभागाने संपकालीन वेतन देण्याच्या संदर्भात आणि सुधारित वेतन लागू करण्याच्या संदर्भात जी.आर.काढला. महाराष्ट्र राज्यातील एका लहान विभागाने जी.आर.काढला, परंतु जो मोठा विभाग आहे, वरिष्ठ महाविद्यालयाचा विभाग आहे. त्यांनी मात्र अजून यासंबंधात जी.आर.काढलेला नाही. मघाशी सांगण्यात आले की, शालेय शिक्षण विभागाने वरिष्ठ श्रेणीसाठी दिलेले नाही. त्यामुळे उच्चशिक्षण विभागानेही दिले नाही. पण आता आम्ही असे म्हणत आहोत की, शालेय शिक्षण विभागाने जी.आर.काढलेला आहे. मग या विभागाने देखील ४२ दिवसांचे संपकालीन वेतन आणि सुधारित वेतनश्रेणी द्यावयास काय हरकत आहे? त्यांनी जे दिलेले आहे त्यासंदर्भात मी बोलत आहे.

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, द्यावयास हरकत काहीच नाही. जे त्यांना दिले, ते येथील प्राध्यापकांनाही दिले पाहिजे अशी या विभागाची भूमिका आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी राज्याची परिस्थिती समजून घ्यावी. येथे बाकीच्या अडचणी आहेत. प्रत्येकाच्या घरावर सरकारने सोन्याची कौले घातली पाहिजेत हे मान्य आहे पण आज तशी परिस्थिती नाही. त्याला काय करणार.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, यासाठी पात्र ठरणाऱ्यांची संख्या अल्प आहे आणि त्यासाठी येणारा खर्च देखील अल्प आहे. त्या विभागाने ३० कोटी रुपये दिले तर याठिकाणी मात्र अडीच ते तीन कोटीचाच खर्च आहे, हे अल्प आहे. शालेय शिक्षण विभागाने दोन वर्षापूर्वी जी.आर.काढला, पण उच्चशिक्षण विभागाने तसा जी.आर. काढलेला नाही. दोन्ही विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या प्राध्यापकांनी एकाच वेळी संप केला होता. पण याठिकाणी अशा प्रकारे भेदभाव करणे बरोबर होणार नाही. तेव्हा माझे म्हणणे आहे की, एक महिन्याच्या बाबतीत तरी द्यावे, बाकीचे नंतर पुढे काय करावयाचे ते पाहू.

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, यासंदर्भात ज्या आर्थिक स्वरुपाच्या मागण्या आहेत, त्या सर्व एकाच कॅबिनेटच्या नोटमध्ये आहेत. त्यामुळे जेव्हा निर्णय होईल तेव्हा तो सर्वच बाबतीत एकत्रितपणे होईल. त्यातील एखादा विषय वेगळा काढून त्याबाबत वेगळा निर्णय घेता येणार नाही.

**श्रीमती संजीवनी रायकर :** सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने या गोष्टी दिलेल्या आहेत पण तंत्रशिक्षण विभागाने अजून जी.आर. काढलेला नाही. तेव्हा हा विभाग देखील शालेय शिक्षण विभागाकडे सोपवावा म्हणून त्यांना देखील मिळेल. पण शासनाने दोन विभागामध्ये असा दुजाभाव करु नये. तेव्हा आताच्या आता हा विभाग शालेय शिक्षण विभागाकडे सोपवावा. तसे करणार आहात का?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, मला याचा निर्णय घेता येणार नाही. हा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांना घ्यावा लागेल.

******

(९)

# राज्यातील व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील शिक्षक व निदेशक यांना सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळण्याची करण्यात आलेली मागणी

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००२*
*गुरुवार, १९ डिसेंबर २००२*

**सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे व गजेन्द्र ऐनापुरे** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना

**श्री.अनिस अहमद** (उच्चशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे व गजेन्द्र ऐनापूरे यांनी "राज्यातील व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील शिक्षक व निदेशक यांना सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळण्याची करण्यात आलेली मागणी" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### निवेदन

"ज्या अर्थी, राज्यातील व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाकडील (M.C.V.C. व Bifocal) पूर्ण वेळ शिक्षक व निदेशक यांना शालेय शिक्षण विभागाचे शिक्षकांप्रमाणे सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघ यांनी दिनांक १२ व १३ डिसेंबर, २००२ ला नागपूर येथील विधीमंडळासमोर धरणे आंदोलन केले आहे, आणि

ज्या अर्थी, ४ थ्या वेतन आयोगाच्या शिफारशी या शिक्षक व निदेशकांना शालेय शिक्षण विभागाचे शिक्षकांप्रमाणे जशाच्या तशा लागू झालेल्या आहेत; आणि

ज्या अर्थी, या कर्मचाऱ्यांना, दिनांक १०/१२/९८ ते ३०/१/१९९९ दरम्यान ४२ दिवसाचे संपकालीन वेतन मंजूर करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने भेदभाव केलेला आहे; आणि

ज्या अर्थी, महासंघाचे प्रतिनिधींनी यापूर्वी दिनांक २० फेब्रुवारी व ५ सप्टेंबर २००२ रोजी आझाद मैदान मुंबई येथे धरणे आंदोलन केले आहे; आणि

ज्या अर्थी, राज्यातील केवळ या विभागातील शिक्षक निदेशकांना केन्द्राचे व राज्यातील शिक्षकांप्रमाणे समतुल्य वेतनश्रेणी न मिळाल्यामुळे त्यांच्यात नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे;

त्या अर्थी, हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे."

### निवेदन

महाराष्ट्र राज्यातील व्यवसाय शिक्षण संचालनालयांतर्गत किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम (M.C.V.C.) व द्विलक्षीय अभ्यासक्रम (Bifocal) या अ२ स्तरावरील अभ्यासक्रमातील पूर्णवेळ शिक्षक व निदेशक यांना शालेय शिक्षण विभागाच्या शिक्षकाप्रमाणे सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघ यांनी वेळोवेळी शासनास निवेदने दिलेली असून आंदोलनेही केलेली आहेत.

शासनाच्या विविध स्तरावर त्या त्या वेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन मार्ग काढण्याचे प्रयत्न शासनाने केलेला आहे. तसेच औपचारिक बैठकीमध्ये शासनाने त्यांच्या मागण्यांबाबत सहानुभूतीने विचार करुन निर्णय करण्याचा मानसही व्यक्त केलेला आहे.

**वेतनाबाबतच्या कोणत्याही प्रकारच्या मागण्यांवर यापुढे मंत्रिमंडळ राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे निर्णय घेवू शकणार नाही व त्यामुळे अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येवू नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तरीही विभागाने सदर विषयी मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी सादर केलेला होता. परंतु आर्थिक परिस्थितीमुळे मंत्रिमंडळात निर्णय होवू शकलेला नाही. तथापि पुन्हा सदर विषयी मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.**

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे :** सभापती महोदय, हा प्रश्न किती ताणावयाचा असा प्रश्न आहे.

**सभापती :** या विषयावर चर्चा झालेली आहे. ज्या प्रश्नाची चर्चा झालेली नाही असेच प्रश्न आपण विचारावेत.

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे :** माझ्या सूचनेमध्ये मी दोन तीन मुद्दे मांडले होते. या ठिकाणी जे निवेदन केलेले आहे ते छोटासा निबंध लिहिल्यासारखे आहे. यामध्ये दोन प्रकारचे कर्मचारी आहेत. ते म्हणजे शिक्षक आणि निदेशक, चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे हायस्कुल निदेशक आणि हायस्कुल टिचर यांना समान वेतनश्रेणी दिली होती. बरेच असे मुद्दे आहेत की त्याबाबतीत या निवेदनामध्ये स्पर्श केलेला नाही. त्यांनी ४२ दिवस आंदोलन केले त्यासंदर्भात सुध्दा यामध्ये वाच्यता केलेली नाही. आंदोलनाच्या तारखा दिल्या त्याबाबतीत सुध्दा ऊहापोह केलेला नाही. एका वाक्यात संपवून यामध्ये असे म्हटले आहे की, अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे. आता राज्यामध्ये कोणताही आर्थिक प्रश्न असेल, कोणत्याही स्वरुपाचा आणि कोणत्याही विभागाचा प्रश्न असेल तो मंत्रिमंडळासमोर आणावयाचा नाही असा निर्णय घेतलेला आहे काय? दुसरा प्रश्न असा की, १४ मार्च २००२ रोजी आपण या सभागृहात निदेश दिला होता की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी. त्यासंदर्भात काहीही उल्लेख नाही. परवा माननीय मंत्रिमहोदयांनी दुसरेच सांगितले की, आता मंत्रिमंडळाची बैठक आहे. तो आयटीआयचा प्रश्न आहे. ते आणि हे निदेशक एकच आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊ असे सांगितले होते. आपण १४ मार्च २००२ ला जे निदेश दिले त्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे? हे अधिवेशन संपण्यापूर्वी अंमलबजावणी करावी असे निदेश आपण दिले होते त्याबाबतीत मी प्रश्न विचारला तसेच ४२ दिवसाच्या संपाच्या संदर्भातही प्रश्न विचारलेला आहे. शालेय शिक्षण विभागाने दिलेले आहे. आपण देणार की नाही असे माझे दोन प्रश्न आहेत.

**श्री.अनिस अहमद :** सभापति महोदय, मा.सदस्य श्री.डायगव्हाणे जी ने जो सवाल किया है, उसके संबंध में दो दिन पहले इसी सदन में ४० मिनट चर्चा हुई है, अब यह सवाल फिर से यहा उठाया गया है. शिक्षकों ने और इन्सट्रक्टरों ने ४२ दिन की हड़ताल की थी. २ करोड़ ४० लाख रुपये इन्सट्रक्टरों को दिए जाने चाहिए, ऐसी उनकी मांग थी. आपकी मांग पूरी की है. सरकार के पास जैसे ही पैसा उपलब्ध होगा, हम वह जल्द से जल्द वन टाईम देने की कोशिश करेंगे.

**श्री.व्हि.यू.डायगव्हाणे :** जल्द से जल्द म्हणजे काय, मार्च पूर्वी करणार काय?

**श्री. अनिस अहमद :** हमारे विभाग के पास जैसे ही पैसा उपलब्ध होगा वैसे ही हम हड़ताल करने के बाद भी शिक्षकों को पगार देंगे. लेकीन माननीय सदस्य से मेरी गुजारिश है कि अगर कोई हड़ताल पर जाए तो पगार न लें. शिक्षक पढ़ाएंगे भी नहीं और पगार भी लेंगे. सरकार की भी जिम्मेदारी है कि बच्चों को अच्छी शिक्षा मिलनी चाहिए. शिक्षक पढ़ाने के बजाए हड़ताल न करें. शासन को चुनौती का सामना करना पड़ता है और नौजवानों को आगे बढ़ाना है. हम चाहते है की नौजवान आगे बढ़े लेकिन शिक्षक हड़ताल पर भी जाते है और पगार भी चाहते हैं. शिक्षकों को शिक्षा देने पर ध्यान देना चाहिए, १६ लाख विद्यार्थी परीक्षा में बैठते है और उनमें बहुत सारे फेल हो जाते है.

इसलिए शिक्षकों को हड़ताल की बात नही करनी चाहिए.

**प्रा.बी.टी.देशमुख :** मा.मंत्री महोदयांनी शिक्षकांच्या जबाबदाऱ्या काय आहेत हे सांगितल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. आता आपल्या म्हणजे मंत्रिमहोदयांच्या जबाबदाऱ्या काय आहेत ते मी रेकॉर्डवर येण्यासाठी प्रश्न विचारु इच्छितो. परवाच्या निवेदनामध्ये उल्लेख नव्हता जो आजच्या निवेदनामध्ये आहे. हायकोर्टाचा निर्णय त्यांच्या बाजूने झाला तरी तुम्ही त्यांना समान वेतनश्रेणी द्यायची नाही हे तुमचे बरोबर आहे काय? आम्ही आपल्याला या पे-स्केलच्या संदर्भात हायकोर्टाने दिलेल्या जज्जमेंटची प्रत दिली आहे. तरीही आता आपण आजच्या निवेदनामध्ये काय उत्तर दिले आहे ते सांगतो. **"वेतनाबाबतच्या कोणत्याही प्रकारच्या मागण्यांवर यापुढे मंत्रिमंडळ राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे निर्णय घेवू शकणार नाही व त्यामुळे अशाप्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे"** ठीक आहे. निर्णय घेण्याचा मंत्रिमंडळाचा तो अधिकार आहे. पण तुम्ही मंत्रिमंडळाला याबाबत हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे हे तेथे सांगावयास नको काय? परवा मंत्री महोदय बोलता बोलता म्हणाले (अडथळा) तुम्ही बसल्या बसल्या कंटेम्प्ट करा म्हणता. कंटेम्प्ट करावयाचा की ४२ दिवस संप करावयाचा हे ते ठरवतील.. ते तुम्ही किंवा आम्ही ठरविणार नाही. आम्ही फक्त ही बाब तुमच्या लक्षात आणून देणार आहोत. ते आमचे कर्तव्य आहे. हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतरही तुम्ही मानत नाही म्हणजे तुमचे हे अत्यंत दुर्दैवी उत्तर आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, (अडथळा) हायकोर्टाचा निर्णय असला तरी ऐकावयाचेच नाही असा मंत्रिमंडळात निर्णय झाला आहे काय?

(सभापतीस्थानी : मा.उपसभापती)

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, सभागृहात काय चालले आहे?

**उपसभापती :** खाली बसून बोलले जाते त्याची दखल घ्यावयाची नसते हे आपल्याला ठाऊक आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** ही दुर्दैवाची गोष्ट आहे की, दर १० वर्षांनी त्या लोकांना हायकोर्टामध्ये जावयास आपण सांगता. एकदा ते हायकोर्टामध्ये गेले आहेत. हायकोर्टाचा धोरणात्मक निर्णय झालेला आहे.(अडथळा) सभापती महोदय, मा.राज्यमंत्री महोदय बसून जे उद्‌गार काढत आहेत ते चांगले नाहीत. शासनाची चूक झालेली आहे हे तुम्ही मान्य केलेले आहे. आणि तरीही आजच्या निवेदनामध्येही तेच सुरु आहे. आपण बसून काहीही बोलत असले तरी त्याची दखल घेत नाही. कारण आताच मा.पीठासीन अधिकाऱ्यांनी तसे सांगितले आहे. माझा अतिशय सोपा प्रश्न असा आहे की, शासनाच्या निवेदनातील शेवटचा परिच्छेद हा सेल्फ कॉन्ट्रॅडीक्टरी आहे. त्या ठिकाणी असे म्हटले आहे की, "वेतनाबाबतच्या कोणत्या प्रकारच्या मागण्यांवर यापुढे मंत्रिमंडळ राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे निर्णय घेऊ शकणार नाही आणि त्यामुळे अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्री मंडळापुढे सादर करण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे." त्याच परिच्छेदामध्ये पुढे हे काय म्हणतात की "विभागाने तरीही सदर विषय मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी सादर केलेला होता. परंतु आर्थिक परिस्थितीमुळे मंत्रिमंडळात निर्णय होऊ शकलेला नाही. तथापि, पुन्हा सदर विषय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे." या पूर्वी देखील मी दोन-चार वेळा या सभागृहामध्ये हे सांगितलेले आहे. या बाबत हायकोर्टाचा जो निर्णय झालेला आहे तो मंत्रि मंडळासमोर मांडल्याशिवाय त्यांच्या लक्षात कसे येणार? हायकोर्टाचा वेतन समानतेचा निर्णय आहे ही बाब आपण मंत्रिमंडळासमोर मांडलेली आहे काय?

**श्री.अनिस अहमद :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ने जो सवाल पूछा है, उसका जबाव देने के लिए मैं खड़ा हूँ. महाराष्ट्र सरकार शिक्षकों और इंसट्रक्टरों को एक साल में ९९ करोड़ रुपये पगार के रुप में दे रही है. महाराष्ट्र में कई गरीब विद्यार्थी है, आदिवासी विद्यार्थी है, अनुसूचित जाति के विद्यार्थी है, जिनको ठीक प्रकार से शिक्षा नही मिल रही है....

**श्री.बी.टी.देशमुख :** आपणाला हा अधिकार आहे का असे हायकोर्टाच्या निर्णयाच्या विरूध्द सांगण्याचा? आपल्याला जे बौध्दिक सांगावयाचे आहे त्यासाठी आपण नियम ४६ अन्वये निवेदन करा.. किंवा वेगळे व्याख्यान ठेवा.

**उप सभापती :** मी सदर निवेदन राखून ठेवण्याचा निदेश देत आहे.

******

**(११)**

## किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीत राहिलेल्या त्रुटी दूर करणेबाबत.

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन,२००२*
*शुक्रवार,दिनांक २० डिसेंबर २००२*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या*
*अतारांकित प्रश्नोत्तरांच्या सोळाव्या यादितील*
*प्रश्न क्रमांक (३) २४९५७*

(३) २४९५७ (५-८-२००२). **श्री.नानासाहेब बोरस्ते,प्रा.बी.टी.देशमुख , श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, श्री.प.म.पाटील, श्री.सुरेश भालेराव, श्री.प्रतापराव सोनवणे,डॉ.अशोक मोडक,श्रीमती संजीवनी रायकर,श्री.विजय गिरकर,श्री.विनोद तावडे, श्री.मधुकर सरपोतदार, श्री.नितीन गडकरी,श्री.विजय गिरकर,श्री.सुधीर जोशी,श्री.विलास अवचटः** ता.प्र.क्र.२२४५५ ला दिनांक १४ मार्च,२००२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयाने अधिक दोन स्तरावरील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगांच्या लागू केलेल्या वेतन श्रेण्या तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय निर्गमित न केल्यामुळे अधिक दोन स्तरांवरील व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षकांना लागू करण्यात आलेल्या नाहीत, अशी तक्रार करणारे एक निवेदन विदर्भ व्होकेशनल कोर्स टिचर्स असोशिएशनच्या अध्यक्षांनी दि.३० सप्टेंबर १९९९ रोजी किंवा त्या दरम्यान मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना पाठविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व व्यावसायिक शिक्षकांमध्ये असा भेदभाव करणे योग्य नाही अशी शिफारस मा.न्यायमूर्ती श्री.एन.बी.नाईक यांच्या समानीकरण समितीने आपल्या अहवालात केली होती, हे खरे आहे काय,

(३) मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दि.४ मार्च १९९३ रोजी रिट पिटीशन नं.१०८०/१९८७ असा भेदभाव संपुष्टात आणणारा निर्णय दिलेला आहे, हे खरे आहे काय;

(४) असल्यास, सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे?

(५) अद्याप उपाययोजना केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** (२५-११-२००२): (१),(२) व (३) होय.

(४) संघटनेच्या दि.३०-९-१९९९ च्या निवेदनात मागणी केल्याप्रमाणे शालेय शिक्षण विभागाच्या दि.१३-५-१९९९ च्या शासन निर्णयाने कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे लागू करण्यात आलेल्या रु.६५००-१०५०० व रु.७५००-१२००० ह्या वेतनश्रेण्या व्यवसाय अभ्यासक्रम शिकविणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दि.१.१.२००० च्या आदेशान्वये लागू करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## जिल्हा बैठकांचे आयोजन

संघटनेच्या वतीने जिल्हा बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठका जिल्हा अधिवेशनांच्या स्वरुपात होतील. या बैठका यशस्वी करण्यासाठी सर्व स्थानिक, तालुका व जिल्हा युनिटच्या सभा घेण्यात याव्यात. या बैठकीच्या स्वतंत्रपणे सूचना काढून या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत अशी त्यांना विनंती आहे.

आपला विनित
**डॉ. एकनाथ कठाळे,**
सचिव 'नुटा'

(१२)

# व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाकडील शिक्षक व निदेशकांना सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळण्याची मागणी

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, २० डिसेंबर २००२ : तिसरे अधिवेशन,२००२*

**सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे, गजेंद्र ऐनापुरे** यांनी दिलेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून निवेदन.

**श्री.दिलीप वळसे-पाटील** (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे, गजेन्द्र ऐनापुरे यांनी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाकडील शिक्षक व निदेशकांना सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळण्याची मागणी या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

"ज्या अर्थी, राज्यातील व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाकडील (M.C.V.C. व Bifocal) पूर्ण वेळ शिक्षक व निदेशक यांना शालेय शिक्षण विभागाचे शिक्षकांप्रमाणे सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघ यांनी दिनांक १२ व १३ डिसेंबर २००२ ला नागपूर येथील विधीमंडळासमोर धरणे आंदोलन केले आहे, आणि

ज्या अर्थी, ४ थ्या वेतन आयोगाच्या शिफारशी या शिक्षक व निदेशकांना शालेय शिक्षण विभागाचे शिक्षकांप्रमाणे जशाच्या तशा लागू झालेल्या आहेत; आणि

ज्या अर्थी, या कर्मचाऱ्यांना, दिनांक १०/१२/९८ ते ३०/१/१९९९ दरम्यान ४२ दिवसाचे संपकालीन वेतन मंजूर करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने भेदभाव केलेला आहे; आणि

ज्या अर्थी, राज्यातील केवळ या विभागातील शिक्षक निदेशकांना केन्द्राचे व राज्यातील शिक्षकांप्रमाणे समतुल्य वेतनश्रेणी न मिळाल्यामुळे त्यांच्यात नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे;

त्या अर्थी, हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे"

**निवेदन**

महाराष्ट्र राज्यातील व्यवसाय शिक्षण संचालनालयांतर्गत किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम (M.C.V.C.) व द्विलक्षीय अभ्यासक्रम (Bifocal) या अ२ स्तरावरील अभ्यासक्रमातील पूर्णवेळ शिक्षक व निदेशक यांना शालेय शिक्षण विभागांच्या शिक्षकाप्रमाणे सुधारित वाढीव वेतनश्रेणी मिळावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण कर्मचारी महासंघ यांनी वेळोवेळी शासनास निवेदने दिलेली असून आंदोलनेही केलेली आहेत.

शासनाच्या विविध स्तरावर त्या त्या वेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन मार्ग काढण्याचे प्रयत्न शासनाने केले आहे. तसेच औपचारिक बैठकांमध्ये शासनाने त्यांच्या मागण्यांबाबत सहानुभूतिने विचार करून निर्णय करण्याचा मानसही व्यक्त केलेला आहे.

वेतनाबाबतच्या कोणत्याही प्रकारच्या मागण्यांवर यापुढे मंत्रिमंडळ राज्याच्या आर्थिक परिस्थितीमुळे निर्णय घेवू शकणार नाही व त्यामुळे अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येवू नये असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तरीही विभागाने सदर विषय मंत्रिमंडळासमोर मान्यतेसाठी सादर केलेला होता. परंतु आर्थिक परिस्थितीमुळे मंत्रिमंडळात निर्णय होवू शकलेला नाही. तथापि पुन्हा सदर विषय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

*(कामकाजाच्या व्यवस्थेबद्दलच्या काही चर्चेनंतर)*

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मी आपले आभार मानतो. ही ९३ स्विकृत केल्याबद्दल व त्याचबरोबर माननीय उपसभापतींचे सुध्दा आभार मानतो. नियम ९३ ची सूचना काल राखून ठेवल्याबद्दल. ९३ ची नोटीस दिल्यामुळे निवेदनात शेवटच्या परिच्छेदात जी माहिती आलेली आहे ती त्यातून महत्वपूर्ण अशा माहिती सभागृहासमोर आलेली आहे. परवा आय. टी. आयच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले म्हणून सगळी मंडळी त्याबद्दल आनंद व्यक्त करीत गेली. या बाबतीत विचार करण्यात येणार आहे असे त्यावेळी त्यांनी चांगले उत्तर दिले होते. या निवेदनामध्ये आता धोरणात्मक निर्णय आलेला आहे. हायकोर्टाने निर्णय दिलेला असतांना सुध्दा माननीय राज्यमंत्री खाली बसून असे म्हणाले की, "आपण कटेम्प्ट ऑफ कोर्ट करा" म्हणून माननीय उपसभापतींनी ही ९३ ची सूचना राखून ठेवली होती. आपण म्हणालात तेच मी आपल्याला सांगू इच्छितो की सूचना मान्य करणे, राखून ठेवणे या बाबतचे निर्णय माननीय सभापती करीत असतात आणि त्या बाबतीत आपण त्यांना आपली बाजू सांगावयास पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, प्रश्न सुटतच नसल्यामुळे तो पुन्हा पुन्हा येतो हे क्रेडीटेबल नाही हायकोर्टाचा निर्णयसुध्दा मंत्रिमंडळासमोर आपण ठेवत नाही किंवा ठेवला किंवा नाही त्या बाबतीत माहिती होत नाही. सभागृहामध्ये इतक्या वेळा सांगूनही त्याचे उत्तर जर आलेले नाही तर त्यामुळे या विषयाच्या संदर्भात येथे प्रश्न उपस्थित करणे याशिवाय दुसरा पर्यायच रहात नाही.

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, १८ क्रमांकाचे निवेदन सुध्दा या विषयावर असल्यामुळे ते सुध्दा एकत्र केले तर दोनदा चर्चा होणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** त्या बाबतीत आपण माननीय सभापतींना विनंती करावी.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांच्या दृष्टीने महत्वाचे प्रश्न असतात त्यातील कोणते स्वीकारले जातील याची अगोदर सन्माननीय सदस्यांना कल्पना नसल्यामुळे ते तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना देतात. विषय आणखी गंभीर असेल, तातडीचा असेल आणि त्याला जवळचा काही संदर्भ असेल तर नियम ९३ च्या सूचना देत असतात. या तीनही ठिकाणी ते मान्य केले जाते किंवा स्वीकृत केले जाते. परंतु त्या तिन्ही मार्गांनी विषय येथे लागणे हे दिसायला आपण म्हणता त्याप्रमाणे वरकरणी चुकीचे आहे पण आपण जर नीट त्या सुचनांचे वाचन केले, म्हणजे तारांकित प्रश्न, नियम ९३ अन्वये दिलेली सूचना आणि लक्षवेधी सूचना, तर त्यामध्ये वेगळ्या अशा प्रकारे स्वतंत्रपणे एखाद्या विषयावर, मुद्यावर एका अँगलवर जोर दिलेला असतो. आताही जसे सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, हायकोर्टाचा निर्णय. या निर्णयाची अंमलबजावणी करणार किंवा नाही आणि का केली नाही इतक्या दिवसामध्ये.. हे प्रश्न यामध्ये आलेले असतातच असे नाही. आता एखाद्या विषयावर चर्चा झालेली असेल, पण त्यावर स्पष्टपणे आपण म्हणजे शासनाने काय केले आहे याचे स्पष्ट असे उत्तर सदस्यांना पाहिजे असते आणि त्यांची ती अपेक्षा असणे चुकीचे नाही. म्हणूनच काल या ठिकाणी माननीय उपसभापती यांनी ही नियम ९३ खालील सूचना राखून ठेवली असेल आणि आज ती वरील निवेदन आलेले आहे आणि राखून ठेवलेली सूचना असल्याने ती पहिल्यांदा आपण घेत असतो. तेव्हा आपण म्हणता तोही भाग आहे की, अशा प्रकारे सारखे सारखे येणे आणि त्यासाठी सारखा सभागृहाचा वेळ जाणे हेही बरोबर नाही तसेच सारखे सारखे येऊनही निश्चित स्वरूपाचे, काँक्रीट स्वरूपाचे असे उत्तर न मिळणे हेही बरोबर नाही. आता आज यावर पाहू की, काँक्रीट असे उत्तर येते की नाही. तेव्हा सदस्य सारखे सारखे एकच विषय वेगवेगळ्या मार्गाने देत असताना ते स्वीकारले जातात आणि ते स्वीकारले गेले आहे तेव्हा आपण ते घेत आहोत.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, आताच नामदार मंत्र्यांनी सांगितले की, याच विषयावर दुसरेही एक आणखी निवेदन आहे क्र.१८ वर पण ते आयटीआय वरील आहे आणि क्र.१६ वरील निवेदन हे एम.सी.व्ही.सी. वर आहे. हे मंत्री महोदयांनी जरा समजून घ्यावे. अध्यक्ष महाराज, मला या संदर्भात असा प्रश्न विचारावयाचा आहे. कालच यावर चर्चा झाली आणि हा विषय राखून ठेवला गेला त्यावेळेस माझ्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, ४२ दिवसांचा जो संप एम.सी.व्ही.सी.चे शिक्षक आणि निदेशकांनी केला होता त्यांना त्यांच्या संपकालीन वेतन देण्यासाठी २ कोटी ४० लाखाची तरतूद केलेली आहे असे कालच्या उत्तरात आहे. तर ही स्पष्ट तरतूद केलेली आहे किंवा काय आणि नसेल तर मार्च पूर्वी करण्यात येईल काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** अध्यक्ष महाराज, या सभागृहामध्ये मी ज्या ज्या वेळेस या विषयावर चर्चा झाली त्यावेळेस एकत्रित चर्चा या दोन्ही विषयांची, म्हणजे एम.सी.व्ही.सी.चे शिक्षक असतील, आयटीआयचे निदेशक असतील वा दोन्ही विषयामध्ये असणारे आयटीआयचे निदेशक, बायफोकल निदेशक वा

पूर्ण वेळ शिक्षक असतील या तिघांच्याही बाबतीत वेतनामध्ये तफावत निर्माण झालेली आहे आणि हे तिन्ही विषयांबाबत मंत्रिमंडळामध्ये निर्णय व्हायचा आहे आणि तसा तो निर्णय घेतल्या नंतरच तरतूद करण्यात येईल असे सांगितलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माझा या संदर्भात नेमका प्रश्न आहे. दर १० वर्षांनी शिक्षकांच्या एखाद्या वर्गाला अशा प्रकारे कोर्टामध्ये जा म्हणणे हे काही बरोबर नाही. किती वेळा आम्ही याबद्दल विचारले पण त्यावर आम्हाला ते काहीच उत्तर देत नाहीत. कालसुध्दा राज्यमंत्री म्हणाले. अध्यक्ष महाराज, एक साधी गोष्ट सांगतो की, शालेय शिक्षण विभागातील ११ वी व १२ वी चे शिक्षक आणि उच्च शिक्षण विभागातील व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षक यांचे वर त्यावेळचे जे कोणी साहेब होते त्यांनी अन्याय केला. त्यावर ते लोक कोर्टात गेले आणि कोर्टाने धोरणात्मक निर्णय दिला. १९८६ च्या वेतनानंतर हे सुरू झाले. ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांनी रिट पिटीशन नं. 1880 of 1987 हे कोर्टामध्ये लावले. त्याच्या निर्णय दि.४.३.१९९३ रोजी लागला. हायकोर्टाचा निर्णय आहे, आणि तो पॉलीसी डिसीजन आहे. या निर्णयात असे म्हटले आहे की, "In view of the above report of the equivalence Committee it is difficult for the learned Counsel for the State to justify the action of the Government in fixing lower scales for the teachers in the Vocational courses with effect from 1.6.1982" शेवटी या निकालात असे म्हटले आहे की, "In the result, the instant writ petition must succeed." आणि त्यांना ते दिले पाहिजे, असा निर्णय त्यावेळी देण्यात आला होता. त्यांची अंमलबजावणी झाली. आता पुन्हा तुम्ही लोअर स्केल दिले पून्हा आता ते कर्मचारी कोर्टात जातील, त्याची काळजी करु नका. पण हे योग्य आहे काय? शासनाने आपला जो काही निर्णय असेल तो घ्यावा व तो हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे घ्यावा. या ठिकाणी जी माहिती आली आहे, ती अशी आहे, हे मी मा.मंत्रिमहोदयांना आदरपूर्वक सांगत आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "वेतनाबाबतच्या कोणत्याही मागण्यावर यापुढे मंत्रिमंडळ राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेऊ शकणार नाही व त्यामुळे अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येऊ नये. असा निर्णय शासनाने घेतला आहे." हा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. हा निर्णय चुकीचा आहे, असे काही जण म्हणणार. मला ते पटत नसेल तरी मंत्रिमंडळाला तो निर्णय घेण्याचा अधिकार आहे, हे मी मान्य करतो. या निवेदनाच्या पुढे असेही म्हटले आहे की, "तथापि पुन्हा सदर विषय मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे." मी या ठिकाणी आयटीआयचे विचारीत नाही. मी एम.सी.व्ही.सी.च्या लोकांपुरताच मर्यादित प्रश्न ठेवीत आहे. या ठिकाणी आता मंत्रिमंडळाने जो काही निर्णय घेतला आहे. तो जनरल आहे. मी त्या विषयी बोलत नाही. गेले दोन वर्षे मी हा हायकोर्टाचा निर्णय या ठिकाणी कोट करीत आहे. आता आपण समानतेच्या प्रस्तावाला विरोध दर्शविला तर आम्ही या लोकांना कोर्टात जावयाला सांगायचे काय? या ठिकाणी आपण "नाही" म्हटले तर आम्हाला आंदोलने करणे किंवा कोर्टात जाणे या शिवाय दुसरा मार्ग राहत नाही. असे शास्त्र आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, हायकोर्टाचा हा निर्णय विचारात घेऊन, तो निर्णय मंत्रिमंडळासमोर ठेवून या बाबतचा निर्णय घेण्यात आला आहे काय? असेल तर या बाबतीत "हो" म्हणा. नसेल तर माझे याबाबत असे म्हणणे आहे की, एमसीव्हीसीच्या बाबतीत हायकोर्टाने स्पेसिफिक निर्णय दिला आहे. हा हायकोर्टाचा निर्णय मंत्रिमंडळासमोर ठेवून या बाबतचा आपण निर्णय घेणार आहे काय?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : सन्माननीय सदस्य वारंवार हायकोर्टाचा निर्णयाचा ठिकाणी उल्लेख करीत आहेत. अनिलकुमार बाळकृष्ण सोनावणे विरुध्द राज्य सरकार अशी ही केस आहे काय? मला या ठिकाणी माननीय सदस्यांनी

## IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, NAGPUR BENCH, NAGPUR,

## WRIT PETITION NO 1880/1987

1. Aniruddha Balkrishna Gawande Lecturer, Shri Shivaji Arts, Commerce Junior College, Amravati
2. Vijaykumar Nanalal Rathi, Lecturer Govt. Junior College, Wardha.
3. Harshwardhan Vidyadhar Gokhale, Lecturer, G.S. Junior College of Commerce and Economics, Nagpur

................*Petitioers*

***Versus***

1. State of Maharashtra, Education and Employment Department, Mantralaya Extension Bhavan, Bombay-32.
2. Director of Technical Education, Maharashtra State, Bombay-32.
3. Equivalence Committee, Through the Joint Secretary, Finance Department, Room No. 325 (Ext) 3rd floor, Mantralaya, Bombay-32.

.............. *Respondents*

*Shri. J.N. Chandurkar Counsel for the petitioners, Shri. B.R. Gawai A.G.P. for the State,*

**CORAM : H.W.DHABE & G.D.PATIL JJ.**
**DATED : 4-3-1993**
**ORAL JUDGMENT (PER H.W.DHABE J.) :**

The Petitioners are Lecturers taking vocational courses for higher secondary classes in the Secondary/Junior Colleges in the State of Maharashtra. They are given pay-scale of Rs. 500-900. The grievance of the petitioners is that the pay scale paid to the other lecturers in the Junior Colleges is Rs.600-30-750-EB-1030 from 1st June, 1982, although prior to 1-6-1982 their pay scales were identical. The submission thus that the treatment given to the lecturers taking vocational courses is arbitrary and discriminatory and violative of Articles 14 and 16 of the Constitution. In support of the above submission, reliance is placed upon the report of the Equivalence Committee consisting of Mr. Justice N. B. Naik, Chairman, Mr. P. C. Kasbekar, Member and Mr. S .Ramakrishna, Member, in which the view taken by the Committee is that differentiation between the teachers in the vocational courses and the other teachers by fixing separate pay-scales for them is not justified. The said committee has re-commended that both the categories should get revised pay-scale of Rs.1640-2900 which is actually revised to Rs. 2000-3200 with effect from 1-1-1986.

2. In view of the above report of the equivalence committee it is difficult for the learned counsel for the State to justify the action of the Government fixing lower pay scale to the teachers in the vocational courses with effect from 1-6-1982. The petitioner are thus entitled to get the scale of Rs. 600 to Rs. 1030 which is the revised scale applicable to the other teachers in the Junior College with effect from 1-6-1982. It is not in dispute that the revised scale of Rs.2000 to Rs.3200 is given to the petitioners on the basis of the report of the equivalence committee from 1.1.86.

3. In the result the instant writ petition must succeed. The respondents 1 and 2 are directed to grant pay-scale of Rs.600-1030 to the petitioners with effect from 1-6-1982 till 1-1-1986 on which date new revised pay-scale of Rs. 2000-3200 is given to them and pay all arrears arising therefrom within six months from the date of this order. Rule made absolute in the above terms. No order as to costs.

अर्जदार सांगावेत.

**श्री.बी.टी.देशमुख :** अनिरुध्द बाळकृष्ण गावंडे आणि इतर अनेक यामध्ये आहेत.

**श्री.दिलीप वळसे पाटील :** सभापती महोदय, जर ही केस असेल तर या बाबत हायकोर्टाने निर्णय दिला आहे. त्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य सरकारने ३ सप्टेंबर १९९३ रोजी एक जी.आर.काढला आहे. त्याप्रमाणे जी वेतनश्रेणी कोर्टाने या लोकांना द्यावयाला सांगितली होती. ती या शिक्षकांना ऑलरेडी दिली आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, या शिक्षकांना १० वेळा झटके देवून या बाबतची वेतनश्रेणी या शिक्षकांना त्यावेळी दिली आहे. तेच तर मी सांगत आहे. हा पॉलीसी डिसीजन आहे. मोरे साहेबांकडील ज्युनिअर कॉलेज शिक्षक आणि वळसे पाटील साहेबांकडील ज्युनिअर कॉलेज शिक्षक यांना वेगवेगळे वागविता येत नाही, हा हायकोर्टाचा धोरणात्मक निर्णय आहे. त्याप्रमाणे तो निर्णय या ठिकाणी यावेळी सुध्दा लागू झाला पाहिजे. हे मी अनेकवेळा सांगितले आहे. या ठिकाणी जे कोर्टात गेले होते. ते एकटे कोर्टात गेले नाहीत. त्या संघटनेचे अध्यक्ष म्हणून ते कोर्टात गेले होते आणि कोर्टाकडून त्यांनी हा निर्णय मिळविला आहे. याचा आपण मंत्रिमंडळामध्ये विचार तरी केला आहे काय? या बाबतचा विचार केला नसेल तर निदान आपण ही केस समोर ठेऊन मी आता जो पॉलीसी डिसीजन वाचून दाखविला, तो विचारात घेऊन जो काही निर्णय घ्यावयाचा आहे, तो तरी निर्णय आपण घ्याल काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, मा.सदस्य या ठिकाणी हायकोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख करीत आहे. त्यापूर्वी वेतनश्रेणीमध्ये तफावत निर्माण झाली होती. ही तफावत दूर करण्यासाठी हे शिक्षक हायकोर्टात गेले. हायकोर्टाने निर्णय दिला. १९९३ साली याबाबत सरकारने निर्णय घेतला आणि निर्णय घेतल्यानंतर ती वेतनश्रेणी देण्यात आली. काल परवा देखील यावर चर्चा झाली आहे. स्कुल एज्युकेशन, हायर एज्युकेशन आणि टेक्निकल एज्युकेशन याचा एकत्रितरित्या मंत्रिमंडळामध्ये विचार व्हावयाला पाहिजे होता. एका केसमध्ये हे सरकार येण्यापूर्वीच निर्णय झाला होता. हे सरकार आल्यानंतर एका केसमध्ये निर्णय झाला आहे. मग ४२ दिवसाच्या संपाचे वेतन असो किंवा या शिक्षकांना किंवा निदेशकांना त्यांनी मागितलेली वेतनश्रेणी असो हे दोन्ही देण्याच्या संदर्भात या विभागाने त्यामध्ये पॉझिटीव्ह दृष्टीकोन स्वीकारला आहे. तो देण्याची आमची तयारी आहे. जे इतरांना मिळाले आहे ते या शिक्षकांना, निदेशकांना मिळाले पाहिजे अशी आपली मागणी आहे. हायकोर्टाचा निर्णय त्यानंतरचा नाही, हायकोर्टाचा निर्णय १९९३ पूर्वीचा आहे. हायकोर्टाच्या निदेशाप्रमाणे ही वेतनश्रेणी दिली आहे. तो निर्णय त्या पर्टिकुलर केसबाबत आहे. हायकोर्टाच्या त्यासंबंधी जनरल डायरेक्टीव्हज नाहीत. तरीसुध्दा हायकोर्टाचा निर्णय काही जरी असला तरी या विभागात जी वेतनश्रेणी दिली आहे तीच वेतनश्रेणी दुसऱ्या विभागात देण्याच्या संदर्भात शासनासमोर त्यामध्ये कोणतीही अडचण नाही. त्यावर आपण पॉझिटीव्ह विचार करीत आहोत. परंतु प्रश्न आर्थिक अडचणीचा आहे. या सभागृहामध्ये मी एकदा नाहीतर दहावेळा स्पष्ट केले आहे की, राज्याच्या मंत्रिमंडळासमोर आर्थिक प्रस्ताव आणण्यापूर्वी मधल्या काळात राज्य सरकारने काही बंधने घातली होती. त्यामुळे हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर येवू शकला नाही. तरीसुध्दा सभागृहामध्ये मागच्या वेळी चर्चा झाली आहे आणि आपणही याबाबत निदेश दिले आहेत. त्यानंतर मा.मुख्यमंत्र्यांची विशेष परवानगी घेवून मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव घेऊन गेलो. परंतु त्यावेळी राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून ७० ते ८० टक्के बोजा राज्याच्या तिजोरीवर येत असेल तर त्याबाबत थोडे दिवस थांबून त्यावर पुनर्विचार करावा अशी त्याठिकाणी चर्चा झाली. व त्यावेळी तो प्रस्ताव मंत्रिमंडळाने विथड्रॉ केला. मंत्रिमंडळासमोर आलेला कोठलाही प्रस्ताव फेटाळण्याची पध्दत नाही. म्हणून यासंबंधी आलेला तारांकित प्रश्न किंवा नियम ९३ अन्वये आलेली सूचना असेल त्यावेळी मी उत्तर दिले आहे की, शासनामध्ये त्या संदर्भात चर्चा केली आहे. पुन्हा एकदा विशेष बाब म्हणून हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेवून त्यावर योग्य निर्णय घेण्याच्या संदर्भात विचार करणार आहोत. हे लक्षात घेता या विभागाची हीच भूमिका आहे की, जे इतर शिक्षकांना मिळाले आहे त्यापासून हे शिक्षक वंचित रहाता कामा नये. त्यांना देखील त्याचा लाभ मिळावा यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, एका गोष्टीचा निर्णय झाला नाही. ज्या अर्थी, तुम्ही अर्जदाराचे नाव वाचून दाखविले आहे त्या अर्थी, तुमच्याजवळ ती केस आहे. मंत्रिमंडळासमोर तुम्ही प्रस्ताव नेतो असे म्हणता. नियम ९३ ची ही सूचना असल्यामुळे मी यावर आणखी प्रश्न विचारीत नाही. तो एका व्यक्तीबाबत निर्णय नाही तर मी आपणास पॉलीसी डिसीजन वाचून दाखविला. तेव्हा मंत्रिमंडळासमोर जातांना आपण हायकोर्टाचा निर्णय मंत्रिमंडळासमोर ठेवाल काय, त्यामध्ये अडचण काय? तेव्हा तसा तो आपण ठेवाल काय?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** होय.

******

## (१३)

## व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाकडील शिक्षक व निदेशकांना सुधारितवाढीव वेतनश्रेणी मिळण्याची मागणी

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००३*

*बुधवार, १९ मार्च २००३*

(१) * ३०२५५ **श्री.प.म.पाटील, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.अैनापूरे :** सन्माननीय तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) "शालेय शिक्षण विभागातील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांपेक्षा कमी दर्जाची वेतनश्रेणी व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील शिक्षकांना देणे समर्थनिय नाही" असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ४ मार्च १९९३ रोजी १८८० ऑफ १९८७ या प्रकरणात दिला हे खरे आहे काय?

२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या ३ जुन २००० च्या शासननिर्णयाने अधिक दोन स्तरावरील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्या वेतनआयोगाच्या लागू केलेल्या वेतनश्रेण्या तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासननिर्णय निर्गमित न केल्यामुळे अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षकांना लागू करण्यात आलेल्या नाहीत, अशी तक्रार करणारे एक निवेदन विदर्भ व्होकेशनल कोर्स टिचर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनी दिनांक २२ जानेवारी २००१ रोजी किंवा त्यादरम्यान मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना पाठविले हे खरे आहे काय?

३) असल्यास, सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे?

४) अद्याप उपाययोजना केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) धोरणात्मक बाब असल्याने विलंब होत आहे.

******

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Licenced to post without pre-payment **LICENCE NO. NR/ATI/78/2003** Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **31.03.2003**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

To,........................................................................
........................................................................
........................................................................
........................................................................
........................................................................